
ISSN 0973 - 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर अश्विन – पौष १९३०
आक्टोबर – डिसेंबर २००८ / खंड ३२ अंक ३




- जागतिकीकरणाचा दलित समाजावरील परिणाम
- ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजातील बालमृत्यूची समस्या
- भारतीय सार्वजनिक व्यापारी बँकांमधील ई–बँकिंग सेवांचा विकास
- महाराष्ट्रातील तेलबियांची वृध्दी व अस्थिरता
- जल–पणन व्यवस्थेतील जल–मूल्य निर्धारण प्रक्रिया
- जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात
- पॉल कूगमन – बहुआयामी अर्थतज्ज्ञ
- ग्रामिण महिला सबलीकरण आणि पंचायत राज्य
- सहकारी संस्था आणि पर्यावरण संरक्षण

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ।।
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

ऑक्टोबर-डिसेंबर २००८,/खंड ३२,अंक ३

प्रमुख संपादक
जगन्नाथ शामराव पाटील

सहायक संपादक
संतोषकुमार बबनराव यादव

सल्लागार मंडळ
(२००६-०९)
अवधूत नाडकर्णी
अ.ब.देवगिरीकर
किशोर वाघमारे
जयश्री देवदत्त खांबेटे

संपादकीय पत्रव्यवहार
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी-९,
८८०/८८१, शनिवार पेठ.
सातारा. ४१५ ००२
मो.९४२३२६१७१६
फोन:(०२१६२)२३३१५२

## । अ नु क्र म णि का ।

* जागतिकी करणाचा दलित समाजावरील परिणाम
रमेश दांडगे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १९५

* ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजातील बालमृत्यूची समस्या
जे.एस.इंगळे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २०३

* भारतीय सार्वजनिक व्यापारी बँकांमधील ई-बँकिंग सेवांचा विकास
कुंभार व्ही.एम. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २१४

* महाराष्ट्रातील तेलबियांची वृध्दी व अस्थिरता
एस.एस.नरवडे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २२३

* जल-पणन व्यवस्थेतील जल-मूल्य निर्धारण प्रक्रिया
वसंतराव जुगळे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २३०

* जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात
पी.एन.जोशी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २४८

* पॉल कूगमन-बहुआयामी अर्थतज्ज्ञ
विजय ककडे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २५५

* ग्रामिण महिला सबलीकरण आणि पंचायत राज्य
श्रीमती सिंधूदेवी कोरे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २५८

* सहकारी संस्था आणि पर्यावरण संरक्षण
मल्लू राजाराम खोत . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २६५

* पीएच्.डी.प्रबंधाचा सारांश
संतोष यादव . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २७०

* अर्थ शब्दांची वाट पाहे
शि.ना.माने . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २८१

* ग्रंथपरिक्षण-आर्थिक संकल्पना
एन.बी.कुलकर्णी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २८८

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ(२००८-०९)

अध्यक्ष
विनायक भगवानराव भिसे (औरंगाबाद)

कार्याध्यक्ष
ज. फा पाटील(कोल्हापूर)

कार्यवाह-खजिनदार
अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक अर्थसंवाद
जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

सदस्य
१) हिरालाल चव्हाण(जळगाव)
२) प्रशांत काटोले (अमरावती)
३) अविनाश निकम (शहादा)
४) कृष्णराव पाटील (नागपूर)
५) सुभाष टकले (हिंगोली)
६) माधव गायकवाड (औरंगाबाद)
७) तानाजी गिते (पुणे)
८) बाळासो पाटील (सांगली)
९) बबनराव खामकर (सिंधुदुर्ग)
१०) अंभोरे एस.एस. (औरंगाबाद)
११) मोहन चौधरी (पुणे)
१२) आत्माराम पोळ (कडेगांव)

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**
१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

कार्यालयीन पत्रव्यवहार
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह - खजिनदार - मराठी अर्थशास्त्र परिषद,
"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी ४१३ ४११. जि.सोलापूर
दूरध्वनी (०२१८४) २२४२९४ मो.९०११३३९९०६

परिषदेचे प्रमुख कार्यालय :
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस प्लॉट क्र.६ एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

**वर्गणी :**

अ) परिषदेचे सदस्य :

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. १५०० |
| साधारण सदस्य | : रू.३०० (वार्षिक) |

आ) संस्था सदस्य

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था | : रू.२५० (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.२५० (वार्षिक) |

इ) अर्थसंवाद वर्गणीदार

| | |
|---|---|
| ग्रंथालये | : रू.२५० (वार्षिक) |

ई) वर्षगणना — १ एप्रिल ते ३१ मार्च

* संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.

* कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.

* अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.

# जागतिकीकरणाचा दलित समाजावरील परिणाम

**रमेश दांडगे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

भ्रमणध्वनी - 9850567121

**गौतम कांबळे**

अर्थशास्त्र विभाग,

न्यू कॉलेज, कोल्हापूर.

आधुनिक तंत्रज्ञानातील प्रगती आणि मानवी जीवनात होणारे नवनवीन बदल यांच्या परिणामांच्या मुळातून प्रगत होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या सर्व देशांच्या आणि शासनांच्या तसेच सर्व बाजारपेठांच्या जागतिकी एकत्रीकरणांच्या प्रक्रियेला जागतिकीकरण असे समजण्यात येते. परंतु या प्रक्रियेकडे अशा दृष्टिकोनातूनही पाहिले जाते की, एका विकसित विचारधारेच्या लोकांनी हेतूपूर्वक सुरू केलेला हा एक आर्थिक उदारीकरणाचा योजना प्रकल्प आहे की ज्यामुळे सर्व राज्यांना आणि व्यक्तींना अतिशय तीव्र अशा बाजारीकरणाच्या ताणतणावांना सामोरे जावे लागेल. खरे तर जागतिकीकरणाची प्रक्रिया कोणत्या ना कोणत्या स्वरूपात नेहमीच होत राहिली आहे. परंतु गेल्या पन्नास वर्षापासूनच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, जागतिकीकरणाने केवळ आर्थिक क्षेत्रांचेच नव्हे तर राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावेही नियंत्रण करण्याला सुरूवात केली आहे. परंतु पूर्वीच्या काळाच्या तुलनेत आज व्यापार क्षेत्राच्या आणि आर्थिक क्षेत्राच्या सेवा संस्थांचे जाळे खूप मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहे आणि त्यांचे मोठ्या प्रमाणात एकत्रीकरण झाले आहे.

जागतिकीकरणाला दोन मुख्य बदल घडवून आणावयाचे आहेत. 1) आंतरराष्ट्रीय व्यापाराची दारे मोकळी करणे. याचा अर्थ असा की सर्व राष्ट्रांनी त्यांनी पूर्वी घातलेली व्यापार क्षेत्रावरील सर्व नियंत्रणे काढून टाकणे; आणि देशादेशात वस्तुंचा, सेवांचा, भांडवलाचा माहितीचा आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह मोकळेपणाने होऊ देणे. 2) या प्रक्रियेत सर्व देशांनी त्यांच्या अंतर्गत आर्थिक

व्यवस्थेमध्ये बदल करण्याचा देखील समावेश आहे. तसेच सर्व देशांनी जागतिक व्यापार यंत्रणेने आखून दिलेले अर्थव्यवस्थेचे नवीन धोरण अवलंबिले पाहिजे; या अटीचाही समावेश आहे. या नवीन अर्थव्यवस्थेमध्ये पुढील गोष्टी अभिप्रेत आहेत. खाजगी बाजारावर आधारलेल्या खाजगी अर्थव्यवस्थेला उत्तेजन देणे. आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रावरील शासकीय नियंत्रणे कमी करणे किंवा सर्वस्वी सोडून देणे हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे कलम आहे.

**जागतिकीकरण, रचनात्मक फेरबदल आणि भारताचा प्रतिसाद :**

आंतरराष्ट्रीय संस्थांचा दबाव आणि अशा संस्थाबरोबर केलेल्या करारांची अंमलबजावणी करण्यासाठी म्हणून भारत सरकारने आपल्या देशाच्या इतर देशांच्याबरोबर व्यापारात खुलेपणा आणणे आणि देशाच्या अंतर्गत आर्थिक रचनेत फेरफार करणे अशा दोन्ही क्षेत्रात नवीन आर्थिक उपाययोजना राबविण्यास सुरूवात केली आहे. या बदलांना काही प्रमाणात 1980 च्या दरम्यान सुरूवात झाली आणि 1990 च्या सुरूवातीपासून त्यांच्या व्यापक अंमलबजावणीला सुरूवात झाली.अजूनही या तथाकथित सुधारणांची प्रक्रिया चालूच आहे. या उपाययोजना आता 'नवीन आर्थिक धोरणे' म्हणून ओळखल्या जातात.

नवीन आर्थिक धोरणाची उभारणी ही देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मुक्त व्यापार, खाजगी उद्योग क्षेत्र आणि खाजगी बाजारपेठ यासंबंधीची आहे. त्यामुळे शासनाची आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रावरील जबाबदारी आणि भूमिका खूप मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

**जागतिकीकरण, आर्थिक क्षेत्रातील उदारीकरणाचे नवीन धोरण आणि दलित समाज :**

जागतिकीकरणाबद्दल दलितांचा काय अनुभव आहे? खाजगी उद्योग क्षेत्र आणि बाजारपेठेतील चढउतार यावर आधारलेल्या नवीन अर्थव्यवस्थेमध्ये दलितांचे भवितव्य काय असणार आहे? दलित समाज हा भारतीय समाजामधील सर्वात उपेक्षित गट आहे. दलित समाज भारतीय समाजातील इतर काही घटकांप्रमाणे गरीब तर आहेच; पण त्यांच्या संबंधातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना आर्थिक क्षेत्रातील बहिष्कार आणि विविध प्रकारच्या भेदभावाच्या वागणुकीचाही त्रास होत आला आहे. त्यांना दिली जाणारी ही भेदभावाची वागणूक बाजारपेठेत आणि बाजारपेठेच्या बाहेरील इतर आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातही दिली जाते. त्यांना त्यांची अनुवंशिकता आणि ते पूर्वापार करत आलेले उदरनिर्वाहाचे व्यवसाय या कारणामुळे असमानतेची वागणूक दिली जाते. असा विचार केला तर भारतीय समाजातील दलित वर्गामध्ये नेपाळी, बांगलादेशी, श्रीलंकेतून आलेले, जपानमधून आलेले बुराकू आणि आफ्रिकेतील देशातून आलेले लोक अशा फार मोठ्या समाजाचा समावेश होतो. 1991 सालातील जनगणनेप्रमाणे भारतात केवळ दलितांची लोकसंख्या 17% म्हणजे 13.82 कोटी एवढी होती.2001 सालातील आकडेवारीवरून दलितांची संख्या 18% असल्याचे दिसून येते. आपण जर ज्यांना भारतीय समाजात भेदभावाची वागणूक मिळते अशा दलित ख्रिश्चन, दलित शीख आणि इतर अनेक गटांचा दलित समाजात समावेश केला तर एकूण दलित

वर्गाची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 25% पर्यंत जाऊन पोहोचते.

**पूर्वीचे धोरण :**

भारतीय शासनाने दलितांचे प्रश्न जाणून घेऊन पुढील दोन महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करून या संबंधातील धोरण विकसित केले (अ) भूतकाळातील बहिष्काराच्या चालीरीतीमुळे दलितांच्या वाट्याला आलेल्या विविध प्रकारच्या वंचनेतून त्यांना बाहेर काढण्यासाठी मदत करणे आणि शक्य तितके त्यांना इतर समाजाच्या बरोबरीला आणून ठेवणे. (ब) त्याचबरोबर त्यांना वर्तमानकाळातील संभाव्य बहिष्कारापासून आणि भेदभावाच्या वागणुकीपासून संरक्षण मिळवून देणे, ते साध्य होण्यासाठी दलितांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवहारात कृतिशील सहभाग मिळवून देण्याला मदत करणे. हा हेतू साध्य करण्यासाठी भारतीय शासनाने पुढील प्रकारे दोन मार्गांनी धोरण अवलंबिले आहे. (अ) भेदभाव विरोधी अथवा त्यापासून संरक्षण देण्याची उपायोजना, (ब) दलितांच्या परिस्थितीत सुधारणा करून त्यांच्या सबलीकरणाची उपाययोजना.

भेदभावाविरोधी उपाययोजनेमध्ये 1955 मध्ये केलेल्या भेदभाव विरोधी कायद्याची अंमलबजावणी (या कायद्याची पुनर्नामांकन नागरी हक्क कायदा असे करण्यात आले) आणि आरक्षित जाती, जमाती कायदा (1989) करण्यात आला. या कायद्याच्या अन्वये सार्वजनिक जागी आणि सार्वजनिक सेवांच्या क्षेत्रात अस्पृश्यता अथवा भेदभावाची वागणूक पाळल्यास ती कृती गुन्हा म्हणून समजण्यात येईल.

सरकारी नोकऱ्या, सरकारी अनुदानावर चालणाऱ्या शैक्षणिक संस्था आणि इतर अनेक राजकीय क्षेत्रातील आणि लोकशाही तत्त्वांवर चालणाऱ्या संस्था यामधील आरक्षणाची तरतूद यांचा समावेश देखील संरक्षणाच्या उपाययोजनेत होतो. ही उपाययोजना करण्यामध्ये शासनाचा आरक्षित जातींना विविध समाजिक क्षेत्रात योग्य प्रमाणात हिस्सा मिळावा असा हेतू आहे. अशी मदत केल्याशिवाय दलितांना अस्पृश्यता आणि भेदभावाची वागणूक यामुळे प्रगती करणे शक्य झाले नसते.

वरील उपाययोजना ह्या केवळ शासनाच्या नियंत्रणाखालील संस्थांना लागू आहेत. त्यामुळे 90% आरक्षित जातीतील कामगार काम करत असलेले खाजगी उद्योग क्षेत्र संरक्षणाच्या बाहेर राहिले आहे. खाजगी क्षेत्रात अशा प्रकारच्या उपाययोजना नसल्यामुळे शासनाने अनुसूचित जातीतील लोकांच्या सबलीकरणासाठी (सर्वसामान्य उपक्रम) सुरू केले आहेत. हे उपक्रम सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात राबविले जात आहेत. हे धोरण आखताना दलितांना स्थावर मालमत्तेच्या मालकीमध्ये मानवी कौशल्यामध्ये घरबांधणी, आरोग्य, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, वीजेची उपलब्धता यामध्ये पुढाकार मिळवून देणे असा शासनाचा मुख्य उद्देश आहे.

1990 सालापर्यंत आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांवर आवश्यक ते नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाचा या क्षेत्रातील व्यवहारात कृतिशील सहभाग असावा या हेतुला केंद्रस्थानी ठेवून शासनाची धोरणे आखलेली होती. त्यामुळे शासनाच्या धोरणात शासनाचा कृतिशील सहभाग, बाजारपेठेतील व्यवहारात हस्तक्षेप तसेच सामाजिक आणि आर्थिक क्षेत्राचे नियंत्रण या प्रमुख मुद्यांचा समावेश होतो.

म्हणजेच सरकारी क्षेत्र आरक्षण आणि शिक्षण, आरोग्य यासारख्या मूलभूत सेवा पुरविणे अशा प्रकारच्या भेदभावाच्या विरोधातील उपाययोजना राबवून दलितांच्यासाठी प्रागतिक धोरण वापरण्यामध्ये कृतिशील होते. त्याचप्रमाणे शासन दलितांना उत्पन्न मिळविण्याच्या साधनसामग्रीमध्ये अधिक मालकी मिळावी म्हणून या क्षेत्रातही हस्तक्षेप करण्याचे धोरण राबवित होते.

**धोरणातील बदल :**

मुक्त व्यापार, खाजगी क्षेत्र आणि बाजारपेठ या वैचारिक पार्श्वभूमीवर नवीन अर्थव्यवस्था उभारलेली असल्यामुळे जिचा परिणाम साहजिकच शासनाने आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील तिचे नियंत्रण काढून घेण्यात झाला. म्हणून 1950 ते 1980 या काळात शासनाने सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रावर आधिकाधिक नियंत्रण ठेवण्यासाठी जी धोरणे आणि कार्यक्रम आखले होते; त्यापासून शासनाने माघार घ्यायला सुरूवात केली आहे. या काळातील काही धोरणे ही कामगार, गरीब लोक आणि समाजातील पददलित गट यांच्या कल्याणाचा दृष्टिकोण नजरेसमोर ठेवून आखण्यात आली होती. ज्याअर्थी सरकार आता जुनी आर्थिक धोरणे मोडीत काढून नवीन आर्थिक धोरणे राबविण्याला सुरूवात करीत आहे. त्याअर्थी त्याचे कामगार, गरीब लोक आणि विशेषत: दलित लोक यांच्या आर्थिक जीवनावर निश्चितच विपरित परिणाम होणार आहेत.

**खाजगीकरण आणि बाजारपेठ:**

खाजगीकरणाकडे जलदगतीने वाटचाल हे नवीन आर्थिक धोरणाचे महत्त्वाचे लक्षण आहे.या धोरणातील सर्वसामान्य आर्थिक तत्वज्ञान बाजारपेठेतील उलाढालीवर आर्थिक धोरण उभे करावे असे शिकविते या धोरणातील गृहित तत्त्व असे की, आर्थिक संस्था शासनाच्या नियंत्रणाखाली असतील तर आर्थिक विकासाच्या साधनांची अनुचित वाटणी होते आणि त्यामुळे त्यांचा अकार्यक्षम वापर होतो.आणि आर्थिक विकास खुंटतो. परंतु काही अर्थतज्ज्ञ असे सांगतात की, नवीन धोरणाच्या अंमलबजावणीमुळे केवळ उत्पादन आणि अंतर्गत रचना यांचेच खाजगीकरण होणार नसून ते शिक्षण, आरोग्य, वीज आणि दळणवळण अशा बहुतेक सामाजिक सेवांच्या क्षेत्रात होणार आहे व त्याचे नियंत्रण हे बाजारपेठेच्या हाती राहणार आहे. याचा परिणाम बाजारपेठेत अनुचित आणि गैरप्रकार सुर होण्यात होईल व त्याचे दुष्परिणाम गरीब लोकांना भोगावे लागतील.

बाजारपेठेत दलितांना जातीमुळे भेदभावाची वागणूक, भांडवलामधील सहभाग आणि उत्पादन प्रक्रियेतील सहभाग यामध्ये मिळत नाहीत. म्हणून नवीन आर्थिक धोरणातील जे मुख्य घटक शासनाने सरकारी उद्योगक्षेत्रातून माघारी घेतले आहेत. आणि आर्थिक क्षेत्राच्या नियोजनातूनही माघार घेतली आहेत. जी क्षेत्रे खाजगी बाजारपेठेच्या हाती सोपविली आहेत. या मुद्यांच्या परिणामांचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. भांडवली मालमत्ता, जमिनीची मालकी, रोजगार माहितीची उपलब्धता वगैरे अनेक क्षेत्रातील भेदभावाच्या वागणुकीमुळे दलितांची या क्षेत्रातील लाभापासून वंचना होणार आहे. क्षेत्रात संधी मिळण्याचे मार्ग दलितांना बंद होण्याचा धोका संभवतो. या प्रक्रियेचे आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या दलित समाजावर गंभीर स्वरूपाचे विपरित परिणाम होणार आहेत.

अंतर्गत रचनेतील बदलाच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून भारतीय शासनाने कृषिक्षेत्र, शेतजमीन,

कामगार क्षेत्र, शिक्षण, आरोग्य क्षेत्र, उद्योग क्षेत्र, आर्थिक क्षेत्र अशा अनेक क्षेत्रातील धोरणात महत्त्वाचे बदल करण्याला सुरूवात केली आहे. आपण यापैकी काही बदलांचा आणि त्यामुळे दलित समाजावर होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांचा विचार करणार आहोत.

**भूधारणेचे धोरण आणि जमीन उपलब्धतेची दलितांना संधी :**

1991 मध्ये 13% अनुसूचित जाती च्या कुटुंबाकडे स्वत:च्या मालकीची जमीन नव्हती. आणि 87% कुटुंबांच्याकडे थोडीफार जमीन होती. थोडीफार जमीन असलेल्या कुटुंबांच्यापैकी 56% कुटुंबांच्याकडे 1 एकरापेक्षा कमी जमीन होती. अशा प्रकारे 1991 मध्ये अजिबात जमीन नसलेल्या आणि थोडीफार जमीन असलेल्या आरक्षित जातींतील कुटुंबाचे प्रमाण 70% होते. अगदी अलीकडची म्हणजे1999-2000 मधील आकडेवारी हे प्रमाण 75% असल्याचे दाखविते. अशा प्रकारे जवळजवळ अनुसूचित जातींतील तीन चतुर्थांश कुटुंबे ही अजिबात जमीन नसलेली किंवा अल्प जमीन असलेली अशी असल्यामुळे मोलमजुरी हेच त्यांचे उदर उदरनिर्वाहाचे मुख्य साधन राहिले आहे. पूर्वापार जमिनीच्या उपलब्धतेपासून वंचित राहिलेल्या दलित समाजाला स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने अंमलात आणलेल्या कमाल जमीन धारणा आणि दलितांना जमिनीची वाटणी अशा प्रकारच्या जमीन सुधारणेच्या धोरणामुळे काही प्रमाणात जमीन मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

कृषिक्षेत्रात थोड्या प्रमाणात का होईना दलित कुटुंबे शेतीचे उत्पादन करू लागली होती. परंतु शासनाने स्वीकारलेल्या जागतिकीकरण आणि रचनात्मक फेरबदल या धोरणांच्यामुळे शेतजमिनीचे एकत्रिकरण, संयुक्त औद्योगिक संस्थांना शेती करण्यासाठी कराराने जमीन देणे, कमाल जमीन धारणेची बंधने दूर करणे, पाण्यावरील शेती वगैरे बदल सुरू केले आहेत. मागील दशकात शासनाने जमिनीच्या फेरवाटणीची प्रक्रिया बंद केली आहे. सध्याची जमीन मालकी स्थगित केली आहे आणि जमिनीच्या बाजारात दलितांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जात नाही. अशा प्रकारे पुन्हा दलितांच्यावर जमीन मालकीच्या संदर्भात बहिष्कार टाकण्यात येत आहे. शासनाने जमिनीची बाजारपेठ आणि जमिनीची फेटवाटणी या कार्यक्रमातून माघार घेतल्यामुळे आणि हस्तक्षेप काढून घेतल्यामुळे दलितांना जमिनीच्या मालकीची उपलब्धता होण्यावर गंभीर स्वरूपाचा अनुचित परिणाम होणार आहे. तसेच कमाल जमीन धारणेवरील मर्यादा काढून घेण्यासाठी आणि संयुक्त औद्योगिक संस्थांना शेती कसण्यासाठी उत्तेजन देण्याकरिता जे प्रयत्न चालू आहेत त्याचा परिणाम दलितांचे आणि गरीबांचे उत्पन्नाचे साधन घटण्यावर होईल.

**दलितांचा रोजगार :**

जमिनीची अपुरी उपलब्धता असल्यामुळे अनुसूचित जातीतील कुटुंबाचे उपजिविकेचे साधन म्हणून शारीरिक श्रमावर अवलंबून राहण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. सन 2000 मध्ये सुमारे 65% अनुसूचित जमातीतील कुटुंबे (शहरी आणि ग्रामीण मिळून) मोलमजुरी करीत होती. 1990 पूर्वीच्या आणि 1990 नंतरच्या परिस्थितीची तुलना केली तर 1990 नंतरच्या काळात विशेषत: दलित समाजाच्या रोजगाराची स्थिती अधिक वाईट झाली असल्याचे दिसते. 1980 च्या काळात शेती किंवा बिगरशेती क्षेत्रात स्वत:चा व्यवसाय करणाऱ्या दलित कुटुंबांच्या संख्येत थोडी वाढ झाली होती.

या सुधारणेच्या तुलनेत 1990 नंतर या परिस्थितीत उलट दिशेने बदल झालेला दिसून येतो. 1990 नंतरच्या काळात स्वत: ची जमीन कसणाऱ्या स्वयंपूर्ण दलित कुटुंबांच्या संख्येत घसरण झाली आणि शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबाची संख्या वाढलेली दिसते. जी कुटुंबे स्वत:ची जमीन कसत होती; ती कुटुंबे शेती पिकविणे परवडत नसल्यामुळे त्यातून बाहेर पडली आणि त्यांनी शेतीमध्ये मोलमजुरी करण्याला किंवा बिगरशेती उद्योगात व्यवसाय करण्याला सुरूवात केलेली दिसते.

शहरी भागात रोजगाराच्या परिस्थितीत लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येते.नियमित पगाराची नोकरी करणाऱ्या अनुसूचित जातींच्या कामगारांच्या संख्येत घसरण झाल्याचे दिसते. हे कामगार स्वत:च्या व्यवसायाकडे किंवा प्रासंगिक मोलमजुरीकडे वळलेले दिसतात.1980 मध्ये प्रासंगिक मोलमजुरी करणाऱ्या आणि स्वत:चा व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या प्रमाणात जी घट झाली होती; त्याच्या तुलनेत आता चक्र उलट दिशेने फिरू लागल्याचे दिसून येते. 1990 च्या सुमाराला प्रासंगिक करारावर काम देण्याची जी प्रक्रिया सुरू झाली; तिच्यामुळे अनुसूचित जातींना मिळणाऱ्या कामाचा दर्जा कमी झाल्याचे दिसून येते. या निरीक्षणातून असे म्हणता येईल की, 1990 च्या उदारीकरणाच्या काळात अनुसूचित जातीतील कामगारांना नियमित पगाराच्या नोकरीमध्ये समान प्रमाणात संधी मिळाली नाही.1980 च्या दशकात (1977-78) शहरी भागात बेकारीच्या प्रमाणात हळूहळू घट होत होती. परंतु 1990 च्या दशकात (1993-1999) चक्र उलट दिशेने फिरताना दिसते. कारण या काळात सर्व क्षेत्रात बेकारीचे प्रमाण वाढलेले दिसते. तसेच शहरी भागाच्यापेक्षा ग्रामीण भागात 1990 च्या दशकात बेकारीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. यावरून असे निश्चितपणे म्हणता येईल की, उदारीकरणाच्या पूर्वी जी विधायक साक्षरतेचे प्रमाण खूप कमी म्हणजे 23% होते, हे प्रमाण इतर जातीतील महिलांच्या स्वरूपाची आणि प्रागतिक स्वरूपाची प्रक्रिया सुरू झाली होती. ती उदारीकरणानंतर थंडावल्याचे चित्र दिसते.खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर सरकारी क्षेत्रातील नियमित पगाराच्या नोकऱ्या लक्षणीय प्रमाणात कमी होत असल्याचे दिसत होते.

**शिक्षण आणि आरोग्याची परिस्थिती :**

आजही दलितांना शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत मानवी हक्कांच्यापासून वंचित रहावे लागत आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपल्याला जागतिकीकरणाचा दलितांच्या शिक्षण आणि आरोग्य यांच्या उपलब्धतेविषयी काय परिणाम होणार आहे हे समजून घेतले पाहिजे. भारतात दलित समाज आणि इतर समाज यांच्यात साक्षरतेचे प्रमाण आणि शिक्षणाची पातळी याबाबतीत फार मोठी तफावत आहे. अनुसूचित जातींना शिक्षणाविषयीचे जे प्रश्न भेडसावत आहेत. त्यापैकी अर्धवट शिक्षण सोडून देणाऱ्यांचे अधिक प्रमाण, शिक्षणाचा निकृष्ट दर्जा आणि शिक्षणाच्या संदर्भात मिळणारी भेदभावाची वागणूक असे काही महत्त्वाचे प्रश्न आहेत .अगदी अलीकडच्या म्हणजे 1191 सालातील माहितीप्रमाणे अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण 37% होते. या तुलनेत इतर जातीमध्ये ते 58% होते. विशेषत: महिलांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण खूप कमी म्हणजे 23% होते हे प्रमाण इतर जातीतील महिलांच्या तुलनेत खूपच कमी होते. अनुसूचित जातींतील मुलांचे शाळेतील गैरहजेरीचे प्रमाण इतर जातींतील मुलांच्यापेक्षा 10% नी अधिक होते.

जागतिकीकरणाच्या धोरणामुळे सामाजिक सेवांच्या क्षेत्रातून शासन माघार घेऊ लागले आहे. त्याचा दलितांच्या जीवनावर सर्वात जास्त आणि थेट परिणाम होणार आहे. दलितांची उन्नती

साधण्यासाठी शिक्षण हाच एक महत्त्वाचा मार्ग आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवरील शिक्षण खाजगी संस्थाकडे सोपविण्याच्या प्रक्रियेमुळे दलितांना शिक्षण मिळविणे दुरापास्त होईल. शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे ते महागडे शिक्षण घेणे दलितांना अशक्य झाले आहे. सर्व सामाजाला रास्त दरात शिक्षण घेण्याची संधीच उपलब्ध होणार नाही. सर्वसाधारण साक्षरता हा मूलभूत मानवी अधिकार तर आहेच पण पददलित समाजाला तळागाळात असणाऱ्या अवस्थेतून वर काढण्याचा तो एक महत्वाचा मार्गदेखील आहे.

**दलित स्त्रिया :**

दलित स्त्रिया हा भारतीय समाजातील सर्वात उपेक्षित समूह आहे. त्यांचे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सर्वात जास्त नुकसान होणार आहे. 71% दलित महिला शेतमजूर म्हणून काम करतात. त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण देशात सर्वात कमी आहे. 1991 च्या जनगणनेनुसार दलित स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण केवळ 23% होते. तसेच शिक्षण अर्धवट सोडून शाळा सोडून जाण्याचे प्रमाण त्यांच्यात सर्वाधिक होते. भारतीय स्त्रियांच्यामध्ये काम करणाऱ्या स्त्रियांच्यामध्ये अनुसूचित जातींच्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्याचप्रमाणे त्यांना घरच्या संसारात कमी सोयी मिळतात. आरोग्याच्या सोयीदेखील कमी असतात. त्यांना नेहमी उच्च जातीतील पुरूषांच्याकडून त्रास सहन करावा लागतो. त्यामुळेच शासनाने सामाजिक सेवांच्यावरील खर्च कमी केला तर त्याचा थेट सर्वाधिक दुष्परिणाम दलित स्त्रियांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि एकूणच जगण्यावर होईल. म्हणून शासनाने हस्तक्षेप करून गरीबीविरोधी उपक्रम राबवून; तसेच जात आणि लिंग यांचा विचार करून जरूर तेथे उपेक्षित समाजाला संरक्षण देण्याची नितांत गरज आहे.

खेदाची गोष्ट अशी आहे की, आजदेखील भांडवली मालमत्तेची मालकी, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य सेवांची उपलब्धता या संदर्भात अनुसूचित जातींच्या कुटुंबांना भेदभावाची वागणूक दिली जाते. भांडवली मालमत्तेच्या मालकीच्या बाबतीत मधल्या काळात थोडीफार सुधारणा झाली असली तरी आजदेखील अनुसूचित जातींची कुटुंबे फार मोठ्या संख्येने त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या मोलमजुरीच्या व्यवसायावरच उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहेत. वरील सर्व परिस्थितीचा विचार केला तर विषमता आणि परंपरागत व्यवसाय करण्याची सक्ती या गोष्टी पूर्वापार चालत आलेल्या बहिष्काराचा परिणाम आहेत? की बाजारपेठेतील आणि बाजारपेठेव्यतिरिक्त इतर व्यवहारात आजही अस्तित्वात असलेल्या भेदभावाच्या आणि बहिष्काराच्या वागणुकीचा परिणाम आहे? हा एक फार महत्त्वाचा प्रश्न आहे.

**गरीबी निर्मूलनाच्या कार्यक्रमाला बसलेली खीळ :**

अनुसूचित जातींच्या कुटुंबाना नियमित उत्पन्नाची साधने उपलब्ध नसल्यामुळे त्यांना मोलमजुरीच्या कामावर अवलंबून रहावे लागते. त्याचबरोबर त्यांना मिळणाऱ्या वेतनाचा दरदेखील कमी असतो. तसेच त्यांच्यामध्ये बेकारीचे आणि अर्धबेकारीचे प्रमाणही जास्त आहे. याचा एकत्रित परिणाम म्हणून त्यांच्यामध्ये गरिबीचे प्रमाण अधिक आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये दलित कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे. यावरून वरील गोष्ट सिध्द

होते. सन 2000 मध्ये अनुसूचित जातीतील शहरी आणि ग्रामीण भागातील मिळून 43% लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते. इतर जातीतील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण 23% होते. म्हणजेच तुलनेने अनुसूचित जातीतील लोकांच्यात गरिबी अधिक प्रमाणात होती असे दिसते.

**समारोप :-**

जागतिकीकरणाचे धोरण राबविण्यापूर्वीच्या आणि नंतरच्या आकडेवारीचा अभ्यास केला तर जागतिकीकरणाचा समाजातील गरिबी वाढण्यामध्ये कसा परिणाम होत आहे हे समजणे सोपे जाते. 1983-८४ सालापासून शहरी भागात आणि ग्रामीण भागात अनुसूचित जातीमधील आणि इतर जातीमधील देखील गरिबीचे प्रमाण कमी होण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.परंतु 1990 च्या दरम्यान अनुसूचित जातीमधील गरीबीचे प्रमाण कमी होण्याच्या गतीला खीळ बसल्याचे दिसते. या वस्तुस्थितीवरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, नवीन आर्थिक धोरण राबविण्याला 1990 च्या दरम्यान सुरूवात झाल्यानंतर गरिबी कमी होण्याची प्रक्रिया मंदावली आहे.

**संदर्भ :**


1. Deshpande, R. S. (2001), "Caste System and Economic Inequality Economic Theory and Evidence" in G. Saha (Ed.), Status of Dalit, Sage Publication, Delhi.
2. New Economic Policy and Dalits, Dalit International, News Letter Waterford (U.S.A.), October, 1977.
3. Economic Status of Scheduled Castes under Five Year Plans, Ambedkar Journal of Social Development and Justice, Vol. V,, 1978.
4. Sukhadeo Thorat (2001), Economic Status of Social Groups in Maharashtra - Emerging Issues, Pravara Rural Development Assocaition, Loni, Maharashtra, 2001, p. 317.
5. National Commission for Scheduled Castes and Scheduled Tribes, Fourth Report, 1996-97, 1997-98, Vol. I & II, Delhi.
6. New Economic Policy and its Impact on Employment and Poverty of Schedule Castes in India, Occasonal Paper (DSA) Department of Sociology, University of Pune, June, 1997.


## शुध्दीपत्र

अर्थसंवादच्या जुलै-सप्टें.२००८ या अंकात माझ्या ''जागतिक मानव विकास अहवाल २००६ भारतापुढील आव्हाने'' या लेखात मानव विकास प्रसिध्दीची सुरूवात १९५५ साली झाली असे अनवधानाने लिहिले गेले. नंतर माझ्या मित्रांनी ती चूक लक्षात आणून दिल्यानंतर ते वर्ष १९९० होते हे स्पष्ट झाले.अनवधानाने झालेल्या या चुकीबद्दल मी दिलगीर आहे. कृपया हे त्या चुकीचे शुध्दीपत्र समजावे.

**-सर्वोत्तम न.कुलकर्णी**

# ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजातील बालमृत्यूची समस्या

**जे.एस.इंगळे**
मंचर
मो.9767520482

**१.० प्रास्ताविक:**

विकसित राष्ट्रापेक्षा अविकसित आणि विकसनशील राष्ट्रात बालमृत्युचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. उदाहरणार्थ सन 1999 मध्ये विकसित देशात एक वर्षाखालील बालकांचा मृत्यू दर प्रतिहजारी 06, भारतात 70, पाकिस्तानात 84 आणि चीनमध्ये 33 इतका होता. पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यू दर प्रतिहजारी विकसित देशात 06, दक्षिण आशियात 104, पूर्व आशियात 45 आणि सबसहारण आफ्रिकेत 173 होता[१]. युनिसेफने तयार केलेल्या अहवालानुसार जगात दरवर्षी ६० लक्ष बालके कुपोषणामुळे मृत्यूमुखी पडतात. संयुक्त राष्ट्राच्या सन 2005 च्या मानव विकास अहवालानुसार बालमृत्यू दर प्रतिहजारी भारतात 87, पाकिस्तानात 103, चीन 37 आणि अमेरिकेत 08 इतका होता.[२]

सन 1914 मध्ये भारतातील बालमृत्यु दर प्रतिहजारी ८२ इतका होता. महाराष्ट्राचा तो 52 इतका होता. याच वर्षी ठाणे जिल्ह्याचा बालमृत्यू दर प्रतिहजारी 57, चंद्रपूर जिल्ह्याचा 52 आणि गडचिरोली जिल्ह्याचा ७४ इतका होता.[३] सन 2000 या वर्षातील 0 ते 6 या वयोगटातील बालकांच्या मृत्यूची संख्या अहमदनगर जिल्ह्यात 2740, धुळे जिल्ह्यात 1919, जळगांव 1525, नंदुरबार 1257 आणि नाशिक 830 इतकी होती[४]. महाराष्ट्रातील मेळघाट हा आदिवासी भाग असून 1991 मध्ये तेथील बालमृत्युची संख्या 294 होती. तर 1994 मध्ये ती 919 होती[५]. मार्च 1998 मध्ये महाराष्ट्रातील आदिवासी भागातील अर्भक मृत्यू दर ३५ होता. तर मार्च 1999 मध्ये तो 149 होता.[६] ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील अर्भक मृत्यू दर मार्च 1997 मध्ये 26 होता. तर मार्च 1999 मध्ये तो 47 इतका होता. ठाणे

जिल्ह्यातील आदिवासी बहुल मोखाडा तालुक्यातील अर्भक मृत्यू दर मार्च 1997 मध्ये 28 होता. तर मार्च 1999 मध्ये तो 59 इतका होता[७]. 1998 ते 2000 मध्ये पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यू दर हजारी अमरावती आदिवासी जिल्ह्यात 94.4, मेळघाट आदिवासी जिल्ह्यात 126.9, गडचिरोली जिल्ह्यात 104. यवतमाळ आदिवासी जिल्ह्यात 91.3, नाशिक आदिवासी जिल्ह्यात 92.4, रायगड आदिवासी जिल्ह्यात 108.7 आणि एकूण आदिवासी विभागात 92.1 इतका होता[८].

**2.० बालमृत्यूची संकल्पना :**

बालमृत्यूची संकल्पना खालील तीन प्रकारात सांगितली जाते.

**अ)बालमृत्यू -** साधारणपणे 0 ते 6 या वयोगटातील बालकांच्या मृत्यूस बालमृत्यू (Child death) असे म्हणतात.

**ब) नवजात अर्भक मृत्यू** - एक महिन्याच्या आतील बालकांच्या मृत्युस नवजात अर्भक मृत्यू (Infant death) असे म्हणतात.

**क) उत्तरकालीन नवजात अर्भक मृत्यू-** एक महिन्यापेक्षा जास्त परंतु एक वर्षापेक्षा कमी वयात मृत्यू झाल्यास त्याला उत्तरकालीन नवजात अर्भक मृत्यू (Naonatal death ) असे म्हणतात.

**3.0 अभ्यासपध्दती**

ठाणे जिल्ह्यात एकूण 14 तालुके असून त्यापैकी 'मोखाडा' तालुका हा आदिवासी बहुल असून अतिदुर्गम भागात वसलेला आहे. मोखाडा तालुक्यातील आदिवासींची लोकसंख्या 93 टक्केपेक्षा जास्त आहे. या तालुक्यात प्रस्तुत अभ्यासकाने काही वर्षापूर्वी दोन-अडीच वर्षे अध्यापनाचे काम केले होते. तसेच या तालुक्यातील आदिवासी समाजातील बालमृत्युचा दरही खूप जास्त आहे. म्हणून बालमृत्यूच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी मोखाडा तालुक्याची निवड केली. बालमृत्यूच्या घटना उद्भवलेल्या तालुक्यातील विविध जमातीतील 75 आदिवासी कुटुंबांच्या घरोघरी जाऊन चर्चा, मुलाखती इ. संशोधन पध्दतीच्या सहाय्याने बालमृत्यूच्या प्रश्नाचा अभ्यास केला.

**4.0 मोखाडा तालुक्यातील बालमृत्यूच्या प्रश्नाचा अभ्यास :**

सन 2004 मध्ये प्रस्तुत अभ्यासकाकडून करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात 1990 ते 2004 या काळात बालमृत्यूच्या घटना उद्भवलेल्या 75 आदिवासी कुटुंबात 103 बालमृत्यू उद्भवल्याचे आढळून आले. बालमृत्यूबाबत मिळालेली माहिती आणि तिचे अर्थनिर्वचन थोडक्यात खालीलप्रमाणे दिले आहे.

**4.1 वयोगटानुसार बालमृत्यूचे प्रमाण :**

खालील कोष्टकात सर्व्हेक्षण केलेल्या मोखाडा तालुक्यातील विविध सात जमातीतील बालमृत्यूच्या घटना उद्भवलेल्या 75 आदिवासी कुटुंबातील 0 ते 6 या वयोगटातील मृत बालकांची संख्या आणि शेकडा प्रमाण दर्शविले आहे.

कोष्टक क्र. ४.१

वयोगटानुसार बालमृत्यूचे प्रमाण

| अ.क्र. | वयोगट | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | 0 (जन्मतः मृत) | 12 | 11.70 |
| 2) | 1 दिवस ते 1 वर्ष | 46 | 44.70 |
| 3) | 1 वर्ष ते 2 वर्ष | 16 | 15.56 |
| 4) | 2 वर्ष ते 3 वर्ष | 15 | 14.56 |
| 5) | 3 वर्ष ते 4 वर्ष | 08 | 7.66 |
| 6) | 4 वर्ष ते 5 वर्ष | 04 | 3.88 |
| 7) | 5 वर्ष ते 6 वर्ष | 02 | 1.94 |
| | एकूण | 103 | 100 |

संदर्भ :- प्राथमिक सर्वेक्षण

वरील कोष्टकावरून असे दिसते की, 103 मृत बालकापैकी 12 बालके (11.70 टक्के ) जन्माला येण्यापूर्वीच मृत पावली होती. एकूण 103 बालक मृत्यूपैकी सर्वात जास्त मृत्यू 1 दिवस ते 1 वर्ष या कालावधीत उद्‌भवले असून त्याचे एकूण 103 बालमृत्यूशी शेकडा प्रमाण 44.70 इतके आहे. तर सर्वात कमी बालमृत्यू 5 ते 6 वर्ष या कालावधीत उद्‌भवले असून त्याचे एकूण 103 बालमृत्यूशी शेकडा प्रमाण 1.94 इतके आहे. बालके वयाने जसजसी मोठी होत जातात तसतसे त्यांचे मृत्यूचे प्रमाण कमी होत जाते. हे वरील कोष्टकावरून स्पष्ट होते.

### 4.2 लिंगभेदानुसार बालमृत्यूचे प्रमाण :

खालील कोष्टकात अभ्यासक्षेत्रातील 0 ते 6 या वयेगटातील मृत पावलेल्या बालकांचे प्रमाण लिंगभेदानुसार दर्शविले आहे.

कोष्टक क्र. 4.2

लिंगभेदानुसार बालमृत्यूचे प्रमाण

| अ.क्र. | लिंग (Sex) | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | पुरूष जातीच्या (Male) बालकांची संख्या | 56 | 54.36 |
| 2) | स्त्री जातीच्या (Female) बालकांची संख्या | 47 | 45.64 |
| | एकूण | 103 | 100 |

4.2 कोष्टकवरून असे दिसते की, एकूण बालमृत्यूमध्ये सर्वात जास्त मृत्यू पुरूष जातीच्या **बालकांचे** असून त्याचे एकूण 103 बालमृत्युशी शेकडा प्रमाण 54.36 इतके आहे. तर स्त्री जातीच्या बालकांच्या मृत्युचे प्रमाण तुलनेने कमी असून ते 45.64 टक्के इतके आहे.

### 4.3 बालकांचे जन्माचे ठिकाण

कोष्टक 4.3 मध्ये मृत पावलेल्या 103 बालकांच्या जन्माचे ठिकाण आणि बाळंतपण कोणाकडून केले याची माहिती दिली आहे.

**कोष्टक क्र. :- 4.3**

**बालकांचे जन्माचे ठिकाण**

| अ.क्र. | बालकांचे जन्माचे ठिकाण व बाळंतपण करणाऱ्यांची माहिती | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | घरात बाळंतपण :- (आदिवासी समाजातील स्त्रियांकडून बाळंतपण) | 102 | 99.03 |
| 2) | दवाखान्यात बाळंतपण :- (दवाखान्यातील तज्ज्ञ कर्मचाऱ्यांकडून ) | 01 | 0.97 |
| | एकूण | 103 | 100 |

संदर्भ :- प्राथमिक सर्वेक्षण

बाळंतपणासाठी सरकारी दवाखान्यात दाखल होणे आदिवासींना आवडत नाही असे अभ्यासात आढळून आले. मृत्यू पावलेल्या एकूण 103 बालकांपैकी केवळ एका बालकाचा जन्म दवाखान्यात झाला होता. तर 102 बालके (99.03 टक्के ) घरीच जन्मली होती व बाळंतपण आदिवासी समाजातील स्त्रियांकडून केले होते. त्यांना 'सुईरिण' असे म्हणतात. जे बालक दवाखान्यात जन्मले व जन्मत: मृत पावलेले हाते; त्या बालकाची आई गरोदर असल्यापासून अशक्त व कुपोषित होती अशी माहिती संबंधित कुटुंबाकडून मिळाली. अशा कुपोषित किंवा आजारी स्त्रियांचे बाळंतपण सुईरिणी शक्यतो करीत नाहीत. अशा स्त्रियांना दवाखान्यात प्रसूतिसाठी जाण्याचा सल्ला दिला जातो. वारली जमातीतील जी स्त्री दवाखान्यात बाळंत झाली होती ती कुपोषित व आजारी असल्याने घरात बाळंत झाल्यास तिच्या जीवाला धोका उद्‌भवेल या भीतीने तिच्या कुटुंबियांनी तिला प्रसुतिसाठी दवाखान्यात दाखल केले होते.

### बालकांचे मृत्यूचे ठिकाण

खालील कोष्टक 4.4 मध्ये मृत पावलेल्या 103 बालकांच्या मृत्युचे ठिकाण दर्शविले आहे. यावरून बालमृत्युच्या कारणावरही प्रकाश पडतो.

वरील कोष्टकावरून असे दिसते की, 94.18 टक्के बालकांचा मृत्यू त्यांच्या घरात झाला होता. 4.85 टक्के बालकांचा मृत्यू दवाखान्यात झाला होता. तर एका बालकाचा (0.97टक्के) पाण्यात बुडून तेथेच

**कोष्टक क्र. 4.4**

**बालकांचे मृत्यूचे ठिकाण**

| अ. क्र. | मृत्यूचे ठिकाण | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | घरी | 97 | 94.18 |
| 2) | दवाखान्यात | 05 | 4.85 |
| 3) | नदीत बुडून | 01 | 0.97 |
| | एकूण | 103 | 100 |

संदर्भ :- प्राथमिक सर्वेक्षण

झाला होता.

**4.5 सर्वेक्षित विविध जमातीतील बालकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेले घटक :-**

कोष्टक 4.5 मध्ये सर्वेक्षित विविध आदिवासी जमातीतील बालकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या घटकांची माहिती दिली आहे.

आदिवास्तेचा करणी, जादूटोणा, इ. अंधश्रध्दावर प्रचंड विश्वास आहे. काही आजार करणीमुळे होतात असे आदिवासींना वाटते . काही लोक दुसऱ्यांचे वाईट करण्यासाठी करणीसारखे

**कोष्टक क्र.- 4.5**

**सर्वेक्षित विविध जमातीतील बालकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेले घटक**

| अ.क्र. | बालमृत्यूची कारणे | एकूण बालमृत्यू | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | माता अशक्त किंवा कुपोषित | 19 | 18.45 |
| 2) | अपुऱ्या दिवसांत बाळंतपण | 03 | 2.91 |
| 3) | बालक आजारी पडल्याचे समजले नाही त्यामुळे उपचार केले नाहीत. | 02 | 1.94 |
| 4) | बाळंतपण नीट करता आले नाही | 01 | 0.97 |
| 5) | अंधश्रध्दा | 11 | 10.67 |
| 6) | भगताने केलेले चुकीचे व अयोग्य उपचार (दवाखान्याऐवजी भगताकडे उपचार ) | 14 | 13.59 |
| 7) | भगताकडे चुकीचे व दवाखान्यात अपूर्ण उपचार घेतले | 25 | 24.30 |
| 8) | भगताकडे उपचार त्यामुळे दवाखान्यात उशीरा उपचार | 14 | 13.59 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9) | भगताकडून दवाखान्यात जाण्यास विरोध , भगताचे उपचार घेतले त्यामुळे मृत्यू | 01 | 0.97 |
| 10) | दवाखान्यात बालकास ॲडमिट करण्यास आदिवासीकडून (पालकाकडून)नकार | 01 | 0.97 |
| 11) | डॉक्टरवर अविश्वास (अगोदर डॉक्टरकडे दाखवले. विश्वास नसल्याने भगताकडे दाखवले त्यामुळे मृत्यू) | 01 | 0.97 |
| 12) | डॉक्टरांचे दुर्लक्ष (डॉक्टरांनी दुर्लक्ष केल्याने भगताकडे उपचार घेतले) | 01 | 0.97 |
| 13) | शेतीतील कामाचा व्याप (गरीबी/दारिद्रय) | 01 | 0.97 |
| 14) | पालकांचे दुर्लक्ष, हेळसांड किंवा निष्काळजीपणा | 04 | 3.88 |
| 15) | स्थलांतर | 04 | 3.88 |
| 16) | व्यसनाधिनता व घरगुती भांडण | 01 | 0.97 |
| | **एकूण** | **103** | **100** |

**संदर्भ** :-प्राथमिक सर्वेक्षण

प्रकार करतात अशी आदिवासींची समजूत आहे. भगत करणी काढून टाकण्याचे काम करतो. करणीचा संशय आला की आदिवासी दवाखान्यात न जाता भगताकडे जातात. साधारणपणे पोटदुखी लवकर थांबली नाही तर कोणीतरी करणी केली असे आदिवासींना वाटते. अशाप्रकारे करणीसारख्या अंधश्रध्दांवर विश्वास ठेऊन दवाखान्यात न दाखवल्याने व भगताचे अघोरी उपचार (अंगारा, मंत्र-तंत्र, कोंबड्या, बकऱ्यांचा बळी इ.) केल्याने 11 बालके (10.67 टक्के) मृत्यू पावल्याचे वरील कोष्टकावरून दिसून येते.

अंधश्रध्दा, स्त्रिया किंवा माता कुपोषित असणे, आजारी बालकास दवाखान्यात उशीरा उपचारासाठी घेऊन जाणे, आदिवासी समाजावर असलेला भगतांचा जबरदस्त प्रभाव ही आदिवासी समाजातील बालमृत्युची कारणे असल्याचे वरील कोष्टकावरून दिसून येते.

### 4.6 बालमृत्यूस कारणीभूत ठरलेले आजार:

एकुण 103 मृत बालकापैकी 12 बालके जन्मत: मृत होती. तर 91 बालके आजारी पडल्याने तसेच भगताने चुकीचे उपचार केल्याने किंवा त्यांना दवाखान्यात उशीरा नेल्याने मृत पावली. या बालकांना झालेले आजार खाली दर्शविले आहेत. कंसात आजाराने मृत पावलेल्या बालकांची संख्या दर्शविली आहे.

बालक अशक्त किंवा कुपोषित (20), पोटदुखी(13), पोटात जंत किंवा कृमी (01), ताप(19), ताप व पोटदुखी (01), ताप व खोकला (01), झाडा-वांती(05), दमा (08), सर्दी व खोकला (01), देवी(01), ताप व आकडी (01), न्यूमोनिया (03), टी.बी. (03), गोवर(01), अशक्तपणा व ताप(02), हातापायाला सूज(01),

धनुर्वात(01), नाका-तोंडातून रक्त (01) डोक्याला गाठ (01), पाण्यात बुडून (01), सर्पदंश (01) डोक्याचा मोठा आकार (01), आजार माहित नसणे (02)इ.

**4.7 कुपोषणामुळे मृत्यू पावलेल्या बालकांचे प्रमाण :**

खालील कोष्टकात कुपोषणामुळे मृत्यू पावलेल्या 22 बालकांची माहीती दिली असून कुपोषणाची कारणेही दर्शविली आहेत.

कोष्टक 4.7 वरून असे दिसते की, विविध पाच कारणामुळे 22 बालके कुपोषित होऊन मृत्यूमुखी पडली. बालकांच्या आया म्हणजेच स्त्रिया अशक्त अथवा कुपोषित असल्याने त्यांच्या पोटी जन्माला

**कोष्टक क्र. :-4.7**

**कुपोषणामुळे मृत्यू पावलेल्या बालकांचे प्रमाण**

| अ.क्र. | कुपोषणाची कारणे | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | आई अशक्त किंवा कुपोषित असल्याने बालक अशक्त आणि कुपोषित | 13 | 59.10 |
| 2) | पालकांची व्यसनाधिनता, आई वडिलांचे भांडण यामुळे नवजात अर्भकाकडे दुर्लक्ष, हेळसांड त्यामुळे बालक अशक्त आणि कुपोषित | 01 | 4.54 |
| 3) | बालकांना आजारपणामुळे आलेला अशक्तपणा , आजाराकडे पालकांचे दुर्लक्ष, निष्काळजीपणा, आजारपणावर कोणतेही उपचार केले नाहीत त्यामुळे बालके अधिकच अशक्त व कुपोषित होऊन मृत्युमुखी . | 02 | 9.09 |
| 4) | बालक आजारी पडल्याचे समजले नाही, त्यामुळे उपचार केले नाहीत त्यामुळे बालक अशक्त व कुपोषित झाले. | 01 | 4.54 |
| 5) | पालकांचे बालकांच्या पालन पोषणाकडे , आहाराकडे दुर्लक्ष; त्यामुळे कुपोषित किंवा अशक्तपणा . | 05 | 22.73 |
| | एकूण | **22** | **100** |

संदर्भ :-प्राथमिक सर्वेक्षण :-

आलेली बालकेही अशक्त व कुपोषित राहून मृत्यू पावल्याचे वरील कोष्टकावरून दिसून येते. स्त्रिया अशक्त व कुपोषित असल्याने त्याच्या पोटी जन्मलेली 59.10 टक्के बालके कुपोषित राहून मृत्यू पावली. तर 22.73 टक्के बालकांच्या कुपोषणाचे कारण त्यांच्या पालकाकडून त्यांच्या पालन पोषणाकडे, आहाराकडे झालेले दुर्लक्ष हे असल्याचे वरील कोष्टकावरून दिसून येते. वरील घटकाबरोबरच

पालकांची व्यसनाधिनता, बालक आजारी पडल्याचे पालकांना न समजणे इ. कारणामुळेसुद्धा बालके कुपोषित होऊन मृत्यू पावतात असे वरील कोष्टकावरून दिसते.

कोष्टक 4.8 मध्ये बालके जन्मत: मृत असण्याची कारणे दर्शविली आहेत.

**4.8 बालके मृत असण्याची कारणे :**

**कोष्टक क्र. :- 4.8**

**बालके जन्मत: मृत असण्याची कारणे**

| अ.क्र. | बालके जन्मत: मृत असण्याची कारणे | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | माता अशक्त किंवा कुपोषित | 07 | 58.34 |
| 2) | अपुऱ्या दिवसात बाळंतपण | 03 | 25.00 |
| 3) | बाळंतपण नीट करता न येणे. | 01 | 8.33 |
| 4) | गरोदर स्त्रीच्या पोटदुखीवर भगताकडून चुकीचे उपचार | 01 | 8.33 |
|  | एकूण | **12** | **100** |

संदर्भ :-प्राथमिक सर्वेक्षण :-

माता अशक्त किंवा कुपोषित असणे आणि अपुऱ्या दिवसात स्त्री बाळंत होणे ही बालके जन्मत: मृत असण्याची कारणे असल्याचे वरील कोष्टकावरून दिसून येते. या दोन कारणामुळे 80 टक्क्यापेक्षा अधिक बालके जन्मत:च मृत पावली होती हे वरील कोष्टकावरून दिसून येते. गरोदर स्त्रीची पोटदुखी हा करणीचा आजार समजून भगताने मंत्र-तंत्र, अंगारा आणि औषधी वनस्पती असे विविध उपचार काही दिवस केले. त्यामुळे पोटदुखी थांबण्याऐवजी गरोदर स्त्रीचा गर्भच गळून पडला अशी मरहिती संबंधित कुटुंबांच्या मुलाखतीतून मिळाली.

**4.9 बालकांवर करण्यात आलेले उपचार:**

14 बालके आजारी असूनही त्यांच्या पालकांनी त्यांच्यावर कोणतेही उपचार केले नाहीत. 12 बालके जन्मत: मृत अवस्थेत असल्याने त्यांच्यावर उपचार करता आले नाहीत. एक बालक पाण्यात बुडून मृत पावल्याने त्याच्यावर उपचार करता आले नाहीत. अशा प्रकारे एकूण 103 बालक मृत्यूपैकी उपचार न केलेली 27 बालके वगळून 76 बालकावर ती मृत पावू नयेत यासाठी त्यांच्या पालकांनी कोणाकडे उपचार केले होते याची माहिती 4.9 मध्ये कोष्टक दिली आहे.

**कोष्टक क्र.4.9**

**बालकांवर करण्यात आलेले उपचार**

| अ. क्र. | उपचार | मृत बालकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | भगत | 25 | 32.90 |
| 2) | दवाखाना | 02 | 2.63 |
| 3) | भगत आणि दवाखाना | 47 | 61.85 |
| 4) | घरगुती उपचार | 01 | 1.31 |
| 5) | घरगुती उपचार व भगत | 01 | 1.31 |
| | एकूण | 76 | 100 |

संदर्भ :-प्राथमिक सर्वेक्षण :-

कोष्टक 4.9 असे दिसते की, भगत आणि दवाखाना अशा दोन्ही ठिकाणी उपचार केलेले बालकांचे प्रमाण 61.85 टक्के एवढे मोठे आहे तर केवळ भगताकडे उपचार केलेल्या कुटुंबांचे प्रमाण 32.90 टक्के आहे. एकूण 76 बालकापैकी 73 बालकांना (96.05 टक्के) भगताकडे उपचारासाठी नेले होते; यावरून आदिवासींची भगतावरील श्रध्दा स्पष्ट होते. भगत बालरोगतज्ज्ञ नसल्याने आणि आजार विकोपाला गेल्यानंतर बालकांना दवाखान्यात आणले जात असल्याने आजारी बालके मृत्यूची शिकार होतात असे आदिवासी समाजात काही वर्षे केलेल्या वास्तव्यात दिसून आले आहे.

### 4.10 योग्य काळजी घेतली तर वाचू शकली असती अशा बालकांचे प्रमाण:-

कोष्टक 4.10 मध्ये योग्य काळजी घेतली असती तर मृत पावलेल्या एकूण 103 बालकांपैकी किती बालके वाचू शकली असती याची माहीती दिली आहे.

**कोष्टक क्र. :- 4.10**

**योग्य काळजी घेतली असती तर वाचू शकली असती अशा बालकांचे प्रमाण**

| अ.क्र. | घटक | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | दवाखान्यात बाळंतपणे झाली असती तर वाचू शकली असती अशा बालकांची संख्या | 15 | 17.04 |
| 2) | दवाखान्यात त्वरित व संपूर्ण उपचार दिले असते तर वाचू शकली असती अशा बालकांची संख्या | 73 | 82.96 |
| | एकूण | 88 | 100 |

संदर्भ :-प्राथमिक सर्वेक्षण :-

वरील कोष्टकावरून असे दिसते की, दवाखान्यात बाळंतपणे झाली असती तर आणि दवाखान्यात आजारी बालकांना संपूर्ण उपचार दिले असते तर 103 बालमृत्युपैकी 88 मृत्यू (85.44 टक्के) उद्भवले नसते. याचा अर्थ बालमृत्यूचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी आदिवासींची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

**5.0 काही शिफारशी :**

बालमृत्यू उद्भवू नयेत तसेच बालमृत्युचे प्रमाण कमी व्हावे यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

1. जन्मलेल्या बालकापैकी काही बालके जगणार तर काही मरणार असा बहुसंख्य आदिवासींचा दृष्टीकोण आहे. म्हणून बालकांची योग्य आणि वेळीच काळजी घेतली, आजारी बालकांना त्वरित दवाखान्यात दाखवले तर जन्माला आलेली सर्व बालके जगू शकतात असा आशावाद आदिवासींच्या मनात निर्माण केला पाहिजे. तरच बालमृत्युचे प्रमाण कमी होईल.
2. अशुध्द किंवा गढूळ अथवा दूषित पाण्यामुळे पोटदुखी, गॅस्ट्रो, थंडी-ताप यासारखे आजार उद्भवून काही बालके मृत्यू पावतात. यासाठी आदिवासींना वर्षभर शुध्द किंवा स्वच्छ पाणी पुरवले पाहिजे. तसेच पाणी गाळून आणि उकळून पिण्याचे महत्त्व आदिवासींना पटवून दिले पाहिजे.
3. पावसाळ्यात आदिवासी भागात बालमृत्यूचे प्रमाण जास्त असते. अशा काळात सेवाभावी संस्थांनी जास्तीत जास्त वैद्यकीय पथके व सुविधा पुरवल्यास बालमृत्युचे प्रमाण खूपच कमी होईल.
4. आदिवासींनी भगताऐवजी दवाखान्यात आजारी बालकांना दाखवले आणि डॉक्टरवर विश्वास ठेऊन डॉक्टर सांगतील तेवढे दिवस दवाखान्यातील संपूर्ण उपचार घेतले तर बालमृत्युचे प्रमाण बरेचसे कमी होईल. सरकारी दवाखान्यात आदिवासींनी जावे यासाठी दवाखान्यात पुरेशी औषधे ठेवणे आणि आदिवासींना चांगली वागणूक देणे आवश्यक आहे.
5. स्त्री किंवा माता कुपोषित असणे हे सुध्दा बालमृत्यूचे प्रमुख कारण आहे. स्त्रियांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने काही योजना किंवा उपाय योजले आहेत. परंतु बहुसंख्य स्त्रियांना त्याचा लाभ घेता येत नाही. उदाहरणार्थ गरोदर स्त्रियांना अंगणवाडीत पूरक आहार दिला जातो; पण आदिवासी स्त्रियांना गरिबीमुळे शेतात, जंगलात दिवसभर गरोदरपणापासून आठव्या, नवव्या महिन्यापर्यंत काम करावे लागते. त्यामुळे पूरक आहाराचा लाभ काही स्त्रियांना घेता येत नाही. त्यासाठी आदिवासी स्त्रिया त्यांच्या पाड्यावर जेव्हा उपलब्ध असतील तेव्हा त्यांना पूरक आहार उपलब्ध करून देणे तसेच लसीकरणाच्या सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शासनाने कर्मचाऱ्यांची सोय न बघता ज्यांच्यासाठी योजना आहेत त्या आदिवासींची सोय पाहिली पाहिजे.
6. करणीसारख्या अंधश्रध्दा नष्ट झाल्याशिवाय बालमृत्यूचे प्रमाण कमी होणार नाही. म्हणून आदिवासींना विश्वासात घेऊन त्यांच्यातील विविध अंधश्रध्दा नष्ट केल्या पाहिजेत.
7. बाळंतपणे दवाखान्यात झाली आणि दहा ते

पंधरा दिवस आदिवासी स्त्रिया दवाखान्यात राहिल्या तर अर्भक मृत्युचे प्रमाण खूपच कमी होईल. कारण एकतर नुकतेच जन्मलेले मूल आजारी पडले तर त्यांच्या पालकांना समजून येत नाही. जरी समजून आले तरी पाडा ते दवाखाना हे अंतर लांब असल्याने अर्भक मृत्यू उद्‌भवतात. म्हणून आदिवासी पुरूष आणि स्त्रियांना विश्वासात घेऊन सर्व बाळंतपणे दवाखान्यात व्हावीत यासाठी शासन, सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

8. बहुसंख्य आदिवासी गरीब असल्याने त्यांना गावापासून दवाखान्यापर्यंतचा प्रवास खर्च परवडत नाही. त्यामुळे आजारी बालकांना दवाखान्यात घेऊन जाण्यास ते टाळाटाळ करतात आणि घरगुती तसेच भगताकडे उपचार घेतात. यासाठी आजारी बालकांच्या पालकांना आजार बरा होईपर्यंत मोफत प्रवास सेवा उपलब्ध करून द्यावी. त्यामुळे बालकांच्या मृत्युचे प्रमाण कमी होईल.
9. अशक्त व कुपोषित बालके जगणारच नाहीत असे बहुसंख्य आदिवासींना वाटते. त्यामुळे ते अशा बालकांच्या उपचाराकडे दुर्लक्ष करतात. परंतु अशक्त व कुपोषित बालके सुध्दा योग्य काळजी घेतली तर जगू शकतात; असा आत्मविश्वास आदिवासींच्यात निर्माण केला पाहिजे. त्याशिवाय कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होणार नाही .

वरील शिफारशीबरोबरच गरीब गरोदर स्त्रियांना दावखान्यात कामे देणे, बाळंतपणाची कामे करणाऱ्या आदिवासी स्त्रियांना सरकारी दवाखान्यात बाळंतपणे करण्यासाठी नोकऱ्या देणे, पाळणा लांबवण्याचे महत्त्व पटवून देणे, जबाबदारीची जाणीव आदिवासींमध्ये निर्माण करणे इ. शिफारशी प्रस्तुत अभ्यासकाला बालमृत्युचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सुचवाव्याशा वाटतात.

**संदर्भ:**


1. अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर 2002, खंड -26 , अंक -2
2. योजना, नोव्हेंबर 2005 , पृ. क्र. 23
3. दै. लोकसत्ता, पुणे, 31/10/2000
4. दै. केसरी, पुणे, 19/04/2008
5. दै. म. टा. 21/02/2008
6. दै. म. टा. 1999
7. तत्रैव
8. अर्थसंवाद, जाने-मार्च 2007, खंड -30 , अंक 4


***

# भारतीय सार्वजनिक व्यापारी बँकांमधील ई-बँकिंग सेवांचा विकास

**श्री. कुंभार व्ही. एम्.**
अधिव्याख्याता,
आबासाहेब मराठे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय,
राजापूर (जैतापूर) जि. रत्नागिरी
मोबा.9860176059

**प्रास्ताविक -**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषत: भारतीय व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर (1969) या बँकांनी शेती व ग्रामीण विकासामध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. एवढेच नाही तर बदलत्या परिस्थितीनुसार भारतीय व्यापारी बँकांनी आपल्या व्यवसायामध्ये, ध्येयधोरण व ग्राहक सेवांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केलेले आहेत. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारतीय व्यापारी बँकांनीही आपली आधुनिकता सिद्ध करण्याचे विविध प्रयत्न केलेले आहेत. भारतातील सर्व सार्वजनिक व्यापारी बँका इलेक्ट्रॉनिक बँकिंगचा (ई-बँकिंगचा) अवलंब करु लागलेल्या आहेत. या बदलांचा अभ्यास करुन सार्वजनिक व्यापारी बँकांमधील इलेक्ट्रॉनिक बँकिंगचे स्वरुप व दिशा मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आलेला आहे.

**1. ई-बँकिंगची संकल्पना**

ई-बँकिंग ही एक आधुनिक बँकिंग व्यवहाराची पद्धती आहे. ई-बँकिंग (E-Banking) म्हणजेच Electronic Banking हा शब्दप्रयोग मराठीमध्ये इलेक्ट्रॉनिक बँकिंग किंवा ई-बँकिंग असा वापरला जातो. ही एक माहिती तंत्रज्ञानावर आधारित असलेली बँक सेवा व बँकिंग उत्पादने (Banking Product) ग्राहकांना उपलब्ध करुन देण्याची पद्धती असून या पद्धतीचा उपयोग बँकेच्या अंतर्गत कार्यसाठीही केला जात असतो.

*** रिचर्ड इन्स्ले** (Richard Insley) **व हसम अल अबेद** (Hussam Al-Abed) यांच्या मते :- ई-बँकिंग ही एक एकात्मिक संकल्पना असून यामध्ये, ग्राहक प्रत्यक्ष बँकेत न जाता इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे बँकिंग व्यवहार करु शकतो. ("E-Banking is an umbrella term for the process by which a customer may perform banking transactions electronically without visitng a brick - and - motar institution.")

*** ट्रेन्ट फ्लेमींग** (Trent Fleming) यांच्या मते :- ई-बँग हा बँकिंग सेवा देण्याचा पर्यायी मार्ग असून अनेक बँका व सेवा देणाऱ्या संस्था यांचा वेगवेगळ्या पद्धतीने वापर करीत आहेत, परंतु जर तुम्ही ऑन लाईन बँकिंग सेवा देत असाल तर तुम्ही ई-बँकिंगमध्ये आहात असे म्हणता येते. ("E-Banking is a term that attempts to broadly describe today's alternate delivery channels. Different banks and vendors will describe this differently, but if you are offering on-line banking, you can say that you are "into" e-banking.")

ई-बँकिंग संकल्पनेमध्ये सामान्यत: बँक व्यवहारांचे संगणकीकरणाचाच प्राधान्याने विचार करण्याचा प्रघात दिसतो. परंतु केवळ बँकांचे संगणकीकरण म्हणजेच ई-बँकिंग नाही तर यामध्ये संगणकाबरोबरच बँकिंग सेवा देण्यासाठी ज्या-ज्या ईलेक्ट्रॉनिक माध्यमांचा किंवा साधनांचा वापर केला जातो त्या सर्वांचा समावेश ई-बँकिंगमध्ये होतो.

## 2. ई-बँकिंगचा इतिहास

ई-बँकिंगचा इतिहास हा माहिती तंत्रज्ञानाच्या इतिहासाइतकाच जुना आहे. कारण माहिती तंत्रज्ञानाच्या सर्वाधिक वापर सेवा क्षेत्रातच झालेला दिसतो व त्यामध्ये विमा, बँकिंग या सेवांचा अग्रक्रम लागतो. उपलब्ध माहितीच्या आधारे असे दिसते की, सन 1967 मध्ये युनायटेड किंगडममध्ये सयंप्रदान पद्धती (Aoutometed Cash Dispenser - ACD) चा वापर बँकिंग व्यवसायामध्ये करण्यात आला. सन 1966 मध्ये ब्रिटनमधील बार्कलाय (Barclays) बँकेने 'बार्कलाय कार्ड' (Barclay Card) या नावाने सर्वप्रथम क्रेडीट कार्ड सेवा सुरु केली. त्यानंतरच्या काळात इतर अनेक ई-बँकिंग सेवांचा विकास झालेला दिसून येतो.

भारतातील व्यापारी बँकांच्या आधुनिकीकरणाची किंबहुना यांत्रिकीकरणाची सुरुवात 1983 पासून झालेली दिसते. सन 1983 मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समितीची स्थापना केली या समितीकडे सार्वजनिक बँकांच्या यांत्रिकीकरणासाठी एक योजना तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आलेली होती. या समितीच्या शिफारशींनुसार सन 1985 ते 1989 या कालावधीसाठी भारतीय सार्वजनिक बँकांच्या संगणकीकरणाचा कार्यक्रम आखण्यात आला. सन 1994 मध्येही 'बँकिंग क्षेत्रातील तंत्रज्ञान सुधारणा' (TechnologyUpgradation Committee for Banking Sector) समितीची स्थापना करण्यात आली.

विविध समितीनी केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने भारतीय व्यापारी बँकांचे संगणकीकरण करण्यात आले. तसेच देशातील वित्तीय संस्थांसाठी आवश्यक असणाऱ्या विविध प्रकारच्या माहिती

तंत्रज्ञानविषयक पायाभूत सुविधांची (IT Infrastructure) निर्मिती करण्यात आलेली आहे. सध्या भारतीय बँकांमधील तांत्रिक सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी 'बँकिंग तंत्रज्ञान व विकास संशोधन संस्थे' (Institute for Development and Research in Banking Technology - IDRBT) वर सोपविण्यात आलेली आहे.

## 3.भारतीय बँक व्यसायामधील ई-बँकिंगचे स्वरुप

21 व्या शतकातील माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे परिणाम जगातील सर्व देशातील बँक व्यवसायावर झालेले दिसून येत आहेत. त्यामध्ये भारतीय व्यापारी बँकाही अपवाद नाहीत. भारतीय व्यापारी बँकांच्या परंपरागत बँक व्यवसायाचा चेहरा बदलत असून त्याची जागा ई-बँकिंगने घेतलेली आहे. सध्या भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँकांकडूनही विविध प्रकारच्या उच्च तंत्रज्ञानाधारित सेवा पुरवण्यास सुरुवात केलेली आहे.

### 3.1 बँकांचे संगणकीकरण

भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या कार्यालयात पहिला संगणक सन 1968 मध्ये बसवला परंतु इतर प्रमुख कार्यालयात ते 1980 नंतर बसवण्यात आले. परंतु व्यापारी बँकातील कर्मचारी संघटनांनी मात्र संगणकीकरणास प्रथमत: विरोध दर्शविल्यामुळे संगणकीकरण होऊ शकले नाही. परंतु सप्टेंबर 1983 मध्ये राष्ट्रीय बँक कर्मचारी संघाने (National Confederation of Banking Employees (NCBE)) व इंडीयन बँक असोसिएशन (IBA) 58 बँकांनी सामंजस्य करार केल्यानंतर भारतीय बँकांच्या संगणकीकरणास गती मिळाली. सुरुवातीच्या कालखंडात रोजगार संधी कमी होण्याच्या भितीमुळे कर्मचारी संघटना संगणकीकरणास विरोध करत असल्या तरी सध्या त्यांचा दृष्टिकोण बदललेला असल्याने भारतातील सर्व सार्वजनिक व्यापारी बँकांचे पूर्ण किंवा अंशत: संगणकीकरण झालेले दिसून येते. भारतीय सार्वजनिक व्यापारी बँकातील संगणकीकरणाची सद्यस्थिती पुढील कोष्टकामध्ये दर्शवलेली आहे.


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**जाहिरातीचे दर**

अर्थसंवाद

| | | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|---|
| १) | समोरचे आतील पृष्ठ | रू.४,०००/- | रू.११,०००/- |
| २) | मागील पृष्ठ (आतील) | रू.४,०००/- | रू.११,०००/- |
| ३) | मागील शेवटचे पृष्ठ | रू.५,०००/- | रू.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर - डिझाईन - (१/५ = १५० द २१० ग) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नांवे काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच तो अंक आपल्याला मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद, कळावे.

आपले विश्वासू

**अनिल बाबुराव सूर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,बार्शी-४१३४११
जि.सोलापूर फोन:(०२१८४)२२४२९४
भ्रमणध्वनी:९०११३३९९०६

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक
शांती प्लाझा,बी-९,८८०/८८१,शनिवार पेठ,
सातारा. ४१५००२ फोन :(०२१६२)२३३१५२
भ्रमणध्वनी:९४२२३२६१७९६

### तक्ता क्र. 1

### भारतातील बँकांमधील संगणकीकरणाची स्थिती (टक्केवारी)

(31 मार्च 2007)

| अ.नं. | बँक प्रकार | कोअर बँकिंग खालील शाखा | पूर्ण संगणकीकृत (कोअर बँकिंग शिवाय) | पूर्ण संगणकीकृत शाखा | अंशत: संगणकीकृत शाखा |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (3+4) 5 | |
| 1) | सार्वजनिक व्यापारी बँका | 44.4 | 41.2 | 85.6 | 13.4 |
| 2) | राष्ट्रीयकृत व्यापारी बँका | 35.4 | 44.5 | 79.9 | 18.8 |

संदर्भ :- रिपोर्ट ऑन ट्रेन्ड अॅन्ड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडीया, 2006-07

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 2007 मधील अहवालानुसार देशातील 44.4 टक्के सार्वजनिक व्यापारी बँका कोअर बँकिंग खाली आलेल्या आहेत तर पूर्ण संगणकीकृत झालेल्या मात्र कोअर बँकिंग खाली नसलेल्या बँक शाखांचे प्रमाण 41.2 टक्के आहे.तर 13.4 टक्के बँक शाखांचे अंशत: संगणकीकरण झालेले आहे. पुर्ण संगणकीकरण झालेल्या सार्वजनिक व्यापारी बँकांमध्ये आंध्रा बँक, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॉर्पोरेशन बँक, पंजाब नॅशनल बँक, विजया बँक व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सर्व सहाय्यक बँकांचा समावेश होतो. सर्वाधिक कमी संगणकीकरण झालेल्या सार्वजनिक बँकांमध्ये पंजाब अॅन्ड सिंध बँक, युको बँक, युनायटेड बँक ऑफ इंडीया व युनीयन बँक ऑफ इंडीयाचा समावेश होतो.

### 3.2 ए. टी. एम्. सेवा (Automated Teller Machine - ATM)

स्वयंप्रदान पद्धती म्हणजेच ए. टी. एम्. सेवेची भारतातील सुरुवात सर्वप्रथमबँक ऑफ इंडीया या बँकेने मुंबई येथे सन 1988 मध्ये केली. त्यानंतर 1989 मध्ये विजया बँकेने व सध्या सर्वच सार्वजनिक व्यापारी बँकांनी ही सेवा देण्यास सुरुवात केलेली आहे. मार्च 207 अखेर या बँकांकडून 26,217 ए. टी. एम.केंद्रांद्वारे ही सेवा दिली जात आहे.

एटीएम् सेवा देणाऱ्या सार्वजनिक व्यापारी बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या गटाचा हिस्सा सर्वाधिक असून या गटाद्वारे 6,441 ए. टी. एम्. केंद्रे चालवली जात आहेत. अनेक बँका आपली स्वत:ची ए. टी. एम्.. केंद्रे (on-site) व इतर बँकांच्या ए. टी. एम्. शी संलग्न (off-site) ए. टी. एम्. सुविधा उपलब्ध करुन देत आहेत.

सध्या अनेक सार्वजनिक व्यापारी बँकांनी ए. टी. एम्. नेटवर्कमध्ये प्रवेश केलेला आहे. त्यास शेअर्स पेमेंट नेटवर्क सिस्टम (Shared Payment Network System - SPNS) असे म्हटले जाते. या सेवेमुळे कोणत्याही बँकेच्या ग्राहकास इतर कोणत्याही बँकेच्या ए. टी. एम्. सेन्टरमधून पैसे काढण्याची सेवा प्राप्त झालेली आहे.

तक्ता–२

| अ. नं. | बँक प्रकार | ऑन साईट ATMs | ऑफ साईट ATMs | एकूण ATMs |
|---|---|---|---|---|
| 1. | सार्वजनिक व्यापारी बँका | 10,289 | 6,040 | 16,329 |
| 2. | राष्ट्रीयकृत व्यापारी बँका | 6,634 | 3,254 | 9,888 |
| 3. | स्टेट बँक ऑफ इंडियाचा गट | 3,655 | 2,786 | 6,441 |

संदर्भ :- रिपोर्ट ऑन ट्रेन्ड अॅन्ड प्रोग्रेस ऑफ बँकींग इन इंडीया, 2006-07.

### 3.3 क्रेडीट कार्ड (Credit Card)

जागतिक पातळीवरील बँक व्यवसायाचा विचार करता ग्राहकांसाठी क्रेडीट कार्ड सेवा देण्याची सुरुवात 1966 मध्ये युनायटेड किंगडममध्ये झालेली असली तरी भारतात मात्र सेंट्रल बँक ऑफ इंडीया या बँकेने सन 1981 भारतात सर्वप्रथम क्रेडीट कार्ड सेवा देण्यास सुरुवात केली.

क्रेडीट कार्ड हे एक प्लास्टीक कार्ड असून त्याचा उपयोग रोख पैशाशिवाय खरेदी करण्यासाठी व सेवांचा उपभोग घेण्यासाठी करता येतो. भारतात सध्या क्रेडीट कार्डचे तंत्रज्ञान बँकांना उपलब्ध करुन देण्याचे कार्य व्हीसा (Visa) व मास्टर कार्ड (Mastercard) या दोन कंपन्या करीत आहेत.

सध्या भारतातील सर्वच सार्वजनिक व्यापारी बँकांनी क्रेडिट कार्ड सेवा पुरवण्यास सुरुवात केलेली आहे. अनेक बँकांनी मॅग्नेटिक स्ट्रिपमध्ये माहिती संचयन केलेली स्मार्ट कार्ड (Smartcard) देखील पुरवलेली आहेत. इंटरनॅशनल क्रेडीट कार्ड, किसान क्रेडीट कार्ड, लघुउद्यमी क्रेडीट कार्ड इ. विविध प्रकारची क्रेडीट कार्ड ग्राहकांना उपलब्ध करुन दिलेली आहेत.

### 3.4 डेबीट कार्ड (Debit Card)

डेबीट कार्ड हे एक प्लॅस्टीक कार्ड असून या कार्डद्वारे ग्राहकास आपल्या खात्यातील रक्कम वापरण्यासाठी हे कार्ड ग्राहकास प्रदान केलेले असते. क्रेडीट कार्डप्रमाणेच डेबीट कार्डवर ग्राहकाचे नाव, फोटो, सही व इतर आवश्यक माहिती नोंदवलेली असते. वेगवेगळ्या बँकिंग संस्थांनी वेगवेगळ्या नावांनी डेबीट कार्ड सेवा सुरु केलेल्या आहेत. सध्या बहुतांश बँकांनी ए. टी. एम. कम डेबीट कार्ड (A.T.M. Cum Debit Card) देण्यास सुरुवात केलेली आहे. या कार्डचा उपयोग ए. टी. एम्. मध्येही करता येते. डेबीट कार्ड ही ऑन लाईन (Online) आणि ऑफ लाईन (Offline) अशा दोन्ही पद्धतीने वापरता येतात.

### 3.5 ऑनलाईन किंवा इंटरनेट बँकिंग (Online or Internet Banking)

भारतातील व्यापारी बँकांनी ऑनलाईन

बँकिंग सेवा देण्याची सुविधाही सुरु केलेली आहे. सार्वजनिक व्यापारी बँकांच्या शहरी व अर्धनागरी भागातील बहुतांश शाखामधून ही सेवा उपलब्ध आहे. या सेवेला ऑनलाईन बँकिंग, इंटरनेट बँकिंग किंवा वायरलेस बँकींग असे म्हटले जाते. ऑनलाईन बँकिंग किंवा वायरलेस बँकिंग सेवेद्वारे ग्राहक घरबसल्या किंवा ऑफीसमधील संगणकाद्वारे बँकेच्या संपर्कात राहून खात्यातील रक्कम तपासणे, अर्ज करणे, बँकेतील योजनांची माहिती घेणे व इतर आर्थिक व्यवहार पार पाडू शकतात. ही सेवा शहरामध्ये व्यापक प्रमाणात असली तरी ग्रामीण भागात या सेवांची कमतरता दिसून येत आहे. तसेच याचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. भारतातील खाजगी व्यापारी बँका इन्टरनेट बँकिंग सेवेमध्ये सार्वजनिक व्यापारी बँकांपेक्षा पुढे आहेत. खाजगी बँकांनी ही सेवा व्यापक प्रमाणात उपब्ध करुन दिलेली आहे.

### 3.6 कोअर बँकिंग (Core Banking)

कोअर बँकिंग ही देखील नेटवर्क आधारित बँकिंग प्रणाली असून या प्रणालीद्वारे दोन किंवा अधिक बँका अथवा बँकांच्या शाखा एकमेकांशी नेटवर्कद्वारे जोडल्या जातात. कोअर बँकिंगमुळे एका बँकेचा ग्राहक दुसऱ्या बँकेतूनदेखील आपल्या खात्यावर व्यवहार करु शकतो. तसेच एका शाखेतील खातेदार दुसऱ्या शाखेतून देखील आपले खाते व्यवहार करु शकतो. तसेच बँक व्यवस्थापनास ही सोयीस्कर व उपयुक्त पद्धती आहे.

सध्या भारतातील 44.4 टक्के सार्वजनिक व्यापारी बँकांच्या शाखामध्ये कोअर बँकिंग प्रणाली प्रस्थापित करण्यात आलेली असली तरी अजूनही कोअर बँकिंगच्या विस्तारास प्रचंड वाव आहे. स्टेट बँक ऑफ इंडीया ग्रुप, ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स, इंडीयन बँक, कार्पोरेशन बॅंक, आंध्रा बँक, सिंडीकेट बँक यांच्याव्यतिरिक्त इतर सार्वजनिक व्यापारी बँकामधील कोअर बँकिंगचे प्रमाण ५० टक्केपेक्षा कमी आहे.

### 3.7 बँकनेट व इन्फीनेट (Banknet and INFINET)

भारतातील व्यापारी बँकांचा जलद दळणवळण सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सन 1991 मध्ये मुंबई, मद्रास, कोलकत्ता, दिल्ली व नागपुर या महानगरातील बँकांसाठी रिझर्व्ह बँकेने बँकनेट (Banknet) नेटवर्क सुरु केलेले होते. सध्या त्याची व्याप्ती 17 महानगरामध्ये वाढवलेली आहे. तर जून 1999 पासून Indian Financial Network - INFINET या वित्तीय नेटवर्कची सुरुवात करण्यात आलेली आहे, या सुविधांचा लाभ ग्राहकायपर्यंत पोहचवण्याचे कार्य भारतातील सर्व सार्वजनिक व्यापारी बँका करीत आहेत. नेटवर्कमुळे सर्व वित्तीय सेवा अत्यंत जलद गतीने उपलब्ध करुन देण्यास मदत झालेली आहे.

### 3.8 स्विफ्ट (SWIFT) नेटवर्क

स्विफ्ट (Society for Worldwide Interbank Financial Telecommunication - SWIFT) हे एक जागतिक पातळीवरील सहकारी तत्त्वावरील बँकिंग नेटवर्क असून त्याची स्थापना 1970 मध्ये ब्रुसेल्समध्ये झालेली आहे. स्विफ्ट नेटवर्कमुळे भारतीय बँक ग्राहकांना आंतरराष्ट्रीय वित्तव्यवहार करणे सुलभ झालेले आहेत. सध्या भारतातील सर्व सार्वजनिक व्यापारी बँका स्विफ्ट नेटवर्कच्या सभासद झालेल्या असल्याने सार्वजनिक बँकेच्या

प्रत्येक ग्राहकास स्विफ्ट नेटवर्कचे फायदे प्राप्त होण्यास मदत झालेली आहे. स्विफ्टमुळे भारतातून इतर देशास पैसे पाठवणे किंवा मिळवणे सोयीस्कर झाले आहे.

### 3.9 इलेक्ट्रॉनिक डेटा स्टोअरेज व इन्टरचेंज

देशातील व्यापारी बँकांचे संगणकीकरण झाल्यामुळे व बँक शाखा एकमेकांशी जोडलेल्या असल्याने बँकिंग व्यवहारांची माहिती संग्रहीत करणे (Data Warehousing), माहितीचा शोध घेणे (Data Mining) व माहीतीचे आदानप्रदान करणे (Data Interchange) सहज शक्य झालेले आहे. याचा फायदा ग्राहक, व्यवस्थापक, बँक कर्मचारी व भारतीय रिझर्व्ह बँकेला नियंत्रण कार्यासाठी देखील होत आहे. परंतु याचे फायदे वाढवण्यासाठी बँकिंग शाखांची नेटवर्क जोडणी व्यापक करण्याची आवश्यकताही आहे असे दिसते. तसेच डेटा ट्रान्स्फरींग मधील सुरक्षितता देखील वाढवण्याची आवश्यकता आहे.

### 3.10 इलेक्ट्रॉनिक (बिल) पेमेंट व वसुली

देशातील व्यापारी बँकांचे संगणकीकरण झालेले असल्याने आज या बँका इलेक्ट्रॉनिक बिलपेमेंट व बिल वसुलीची जलद व सुरक्षित सेवाही देत आहत. सध्या ही सेवा देशातील महानगरामध्येच उपलब्ध असली तरी तिची व्याप्ती नागरी व अर्धनागरी भागापर्यंत वाढवण्यासाठी प्रयत्न कले जात आहे. अशी सेवा देण्यामध्ये देशातील सार्वजनिक बँकांपेक्षा खाजगी व्यापारी बँका अग्रेसर असल्याचेही दिसून येत आहे. इलेक्ट्रॉनिक पेमेंट व वसुलीमुळे ग्राहकांचा वेळ, श्रम व पैसा याची बचत होत असून बँकांनाही त्याचे फायदे मिळत आहे.

### 3.11 मायकर क्लिअरिंग (MICR Clearning)

मायकर (Magnetic Ink Character Recognition - MICR) तंत्रज्ञानाचा उपयोग धनादेशामध्ये करुन मायकर धनादेश उपलब्ध करुन देण्याची सोय सार्वजनिक व्यापारी बँकांनी केलेली आहे. भारतात ही पद्धती 1987 मध्ये सुरु केलेली असून मायकर चेक क्लिअरींगची सुविधा आज देशातील सर्व मोठ्या 22 महानगरामध्ये उपलब्ध करुन देण्याचे कार्य भारतातील सार्वजनिक व्यापारी बँकांनी केलेले आहे.

### 3.12 रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट (RTGS) :

Real Time Gross Settlement System - RTGS ही एक बँकिंग व्यवहार देणी-घेणी मिटवण्याची (परिपूर्ती करण्याची) इलेक्ट्रॉनिक यंत्रणा असून या यंत्रणेद्वारे ग्राहकांचे व्यवहार व आंतर बँक व्यवहाराची तात्काळ परिपूर्ती केली जाते. सध्या देशातील 28,000 बँक शाखांना RTGS संलग्नता मिळालेली असून दरमहा सुमारे 30,00,000 पेक्षा अधिक व्यवहारांची परिपूर्ती करण्याचे कार्य ही यंत्रणा करीत आहे.

### 3.13 इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (EFT) व SEFT

इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर ही एक निधीच्या हस्तांतरणाची यंत्रणा असून या यंत्रणेद्वारे अत्यंत कमी वेळात एका बँक शाखेतून दुसऱ्या बँक शाखेत पैसे पाठवणे शक्य झालेले आहे. सध्या भारतीय रिझर्व्ह बँकेने RBINET च्या माध्यमातून देशातील 500 शहरात विशेष इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर यंत्रणा (SEFT) कार्यान्वीत केलेली आहे. त्याचालाभ 500 शहरातील

बँक ग्राहकांना प्राप्त होत आहे. सध्या या सुविधेचे रुपांतर (National Electronic Fund Transfer - NEFT) मध्ये करण्यात आलेले आहे.

### 3.14 इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हीस (ECS)

इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हीस (ECS) ही संगणकाधारित समाशोधन यंत्रणा असून ज्या बँक शाखा इलेक्ट्रॉनिपक क्लिअरिंग केंद्रांशी जोडलेल्या आहेत त्या बँक शाखांना आपली देणी-येणी तात्काळ मिटवण्यासाठी या सुविधेचा फायदा होत आहे. देशातील बहुतांश व्यापारी बँका ह्या सुविधांचा लाभ ग्राहकांना उपलब्ध करून देत आहेत.

### 3.15 डिजिटल सिग्नेचर (Digital Signature)

ग्राहकांची ओळख पटवण्यासठी डिजिटल सही किंवा इलेक्ट्रॉनिक सही हा नवीन पर्याय उपलब्ध झालेला असून महानगरातील अनेक बँका आपल्या ग्राहकांची ओळख पटवण्याकरीता जुन्या पद्धतीने सही घेण्याऐवजी डिजीटल सहीचा उपयोग करुन घेत आहेत. परंतु या तंत्रज्ञानाचा वापर अजूनही मर्यादितच आहे. डिजिटल सिग्नेचरमुळे बँक कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या वेळेत बचत होत आहे व ग्राहकांची अचुक ओळख पटवणे शक्य झालेले आहे.

### 3.16 इतर सेवा सुविधा

भारतीय व्यापारी बँका आपल्या ग्राहकांसाठी जास्तीत जास्त उपयुक्तता सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. घरबसल्या किंवा ऑफीसमधून खात्याविषयीची माहीती देण्यासाठी टेलिफोन बँकिंग (Telephone Banking) तर घरपोहच सेवा मिळवण्यासाठी होम बँकिंग (Home Banking) सेवा देत आहेत. तसे महानगरातील व नागरी भागातील बँक शाखाद्वारे ई -टिकीट बुकींग, मोबाईल फोन रिफीलींग, ई-परचेसींग अशा विविध सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

## 4.ई-बँकिंगचे फायदे :-

ई-बँकिंग पद्धती ही केवळ ग्राहकांसाठीच उपयुक्त नाही तर बँकांसाठीही ती फायदेशीर आहे. कारण, संगणक व इतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीच्या वापरामुळे बँकांच्या व्यावसायिक खर्चात घट होत आहे. जरी प्राथमिक पातळीवर मोठी गुंतवणूक करावी लागत असली तरी त्याचे फायदे दिर्घकाळ मिळत असल्याने ई-बँकिंग पद्धती ही बँकेसाठी फायदेशीरच होत आहे. तसेच या आधुनिक सेवा-सुविधांमुळे या बँकांचा नवीन ग्राहकहीं मिळत आहे.

ग्राहकांच्या दृष्टीने विचार केल्यास ई-बँकिंग सेवांमुळे ग्राहकाचा वेळ, पैसा व श्रम यामध्ये खूप मोठी बचत होऊ लागलेली आहे व बँकिंग व्यवहार करणे सुलभ झालेले आहे. ज्या ग्राहकास संगणकीय प्रणालीचे मुलभूत ज्ञान आहे अशा ग्राहकांना ई-बँकिंगचा अधिक लाभ मिळवता येणे शक्य झालेले आहे तर संगणकीय ज्ञानाची कमतरता असणाऱ्या ग्राहकांनाही बँक कर्मचाऱ्यामार्फत दिल्या जाणाऱ्या आधुनिक सेवापद्धतीचा लाभ घेता येत आहे. शिवाय ई-बँकिंगमुळे बँक व्यवसायाचे पारंपरिक स्वरुप बदलून त्यांना एक नवीन चेहरा प्राप्त होण्यास मदत झालेली आहे.

## 5.बँकिंग व्यवसायाच्या आधुनिकी-करणातील समस्या व आव्हाने :-

भारतातील व्यापारी बँकांच्या आधुनिकीकरणाची गती वाढलेली दिसत असली

तरी भारतातच कार्य करणाऱ्या विदेशी बँका व खाजगी व्यापारी बँकांच्या तुलनेत सार्वजनिक व्यापारी बँका अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मागे असलेल्या दिसून येत आहेत. तसेच निधीच्या कमतरतेमुळे अनेक व्यापारी बँका आपले संपूर्ण संगणकीकरण करु शकत नाहीत. तर काही बँकांच्या जास्तीत जास्त शाखा ग्रामीण भागात कार्यरत असल्याने या शाखांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे व ग्रामीण भागातील ग्राहकांना वापरता येतील अशा आधुनिक सेवा उपलब्ध करुन देणे सहज शक्य नाही.

बहुतांश सार्वजनिक व्यापारी बँकांनी ए. टी. एम्. सारख्या सुविधांवर मोठी गुंतवणूक केलेली असली तरी अर्धनागरी व नागरी भागातील ग्राहकांचे ए. टी. एम्. सेवा वापरण्याचे प्रमाण अल्प दिसते. एकूण ग्राहकांच्या 10 ते 15 टक्के ग्राहकच ही सेवा वापरत आहेत. मात्र त्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक मात्र जास्त आहे असे दिसते.

ई–बँकिंगमुळे नवीन ग्राहक मिळत असले तरी ग्राहक व बँक कर्मचारी यांच्यातील संवाद व प्रत्यक्ष संबंध खूप मोठ्या प्रमाणावर घटलेले आहेत. बँक व बँकेच्या ग्राहक यांच्यातील प्रत्यक्ष संबंध हे ग्राहक कायमस्वरुपी बँकेशी जोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात परंतु ई–बँकिंगमध्ये प्रत्येक ग्राहक बँकेपासून दूर चाललेला आहे असे दिसत आहे. या परिस्थितीत ग्राहक कायमचा आपल्या बँकेशी जोडून ठेवण्यासाठी व्यापारी बँकांना प्रयत्न करावे लागणार आहेत.

जागतिकीकरणाच्या परिस्थितीत भारतीय सार्वजनिक व्यापारी बँकांनादेखील जागतिक दर्जाच्या बँकिंग सेवा देण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. तसेच हे तंत्रज्ञान उच्चशिक्षित ग्राहकांच्यासाठी वापरता येईल अशा सुलभ पद्धतीने विकसित करणे आवश्यक झालेले आहे.

**संदर्भ सूची :-**


1) B. Sathish Kumar (2006), Technological Reforms in Clearning System of Banks, (Coimbatore).

2) Chowdari Prasad, Banker's Dilemma - To lend or ----- ? (Manipal, Karnataka).

3) David Whiteley, e-commerce, McGraw Hill Companies, New Delhi.

4) H. R. Suneja, Merchent Banker, Himalaya Publishing House, New Delhi.

5) Mithani and Gordon, Banking and financial system, Himalaya Publishing Houe, New Delhi.

6) Malini Tripathy, Financial Services, Prentice-Hall of India, New Delhi.

7) Ramswamy, Banking in the new Millennium, Himalaya Publishing House, New Delhi.

8) Reserve Bank of India Bulletin - Oct. 2006.

9) Trend and Progress of Banks in India - 2007-08.

10) www . Banknetindia . com.

11) www . rbi. org. in.

# महाराष्ट्रातील तेलबियांची वृध्दी व अस्थिरता

**एस.एस.नरवडे,**
प्रपाठक,अर्थशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

**व्ही.बी.भिसे,**
भूतपूर्व अध्यक्ष-मराठी अर्थशास्त्र परिषद

तेलबियांच्या उत्पादनात भारत जगातील एक अग्रेसर असलेला देश आहे. भारतात शेतजमीन -हवामान विविधता मोठया प्रमाणात असल्यामुळे, तेलबियांच्या अनेक जाती आढळून येतात. आर्थिक सुधारणांची प्रक्रिया सुरू झाल्यानंतरच्या काळात, प्रामुख्याने 1992-93 यावर्षी जगातील तेलबियांच्या उत्पादनात भारताचा हिस्सा 10 टक्के होता तर तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्राच्या 20 टक्के क्षेत्र भारतात होते. तरी सुद्धा तेलबियांची घरेलू गरज भागविण्याकरिता भारताला 1970 च्या दशकापासूनच मोठया प्रमाणात आयातीवर अवलंबून रहावे लागत आहे. जागतिक तेलबियांच्या उत्पादनातील अनिश्चितता व किंमतीतील चढ-उतारामुळे, तेलबियांच्या बाबतीत आयातीवरील अवलंबित्व धोक्याचे आहे. त्याचे वाईट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात.

तेलबियांच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी भारत सरकारने मे 1968 मध्ये ''तेलबिया तंत्रज्ञान आयोगा'' ची स्थापना केली. या अंतर्गत तेलबियांचे उत्पादन वाढविण्यासाठी 180 जिल्हयात आधुनिक तंत्रज्ञान, पीक संरक्षण प्रत्यय व सिंचन सुविधांचा पुरवठा करण्यावर जोर देण्यात आला. तसेच तेलबियांच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताला स्वयंपूर्ण बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले. अजूनही तेलबियांच्या उत्पादन व उत्पादकतेबाबत खूप मोठा पल्ला भारताला गाठावयाचे असल्याचे दिसून येते. तेलबियांचे उत्पादन वाढवणे आवश्यक आहे, याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेलबियांपासून होणारी उष्मांक व प्रथिने उपलब्धता इतर धान्यापेक्षा अधिक आहे (बन्सिल, 1997) भारताचा 2001 मध्ये भुईमूगाच्या उत्पादनात दुसरा तर राई व मोहरीच्या उत्पादनात चौथा क्रमांक होता (भारत सरकार 2004).

भारतात तेलबियांचे 70 टक्यांपेक्षा अधिक क्षेत्र व उत्पादन हे गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक, राजस्थान व मध्यप्रदेश या राज्यांत एकवटले आहे. भारतातील तेलबियांच्या उत्पादकतेची जगातील तेलबियांचे उत्पादन करणाऱ्या प्रमुख देशातील उत्पादकतेशी तुलना केली असता, ती 1/2 ते 1/3 कमी असल्याची दिसून येते. अर्जेंटिना (2.51 मे.टन/हेक्टर), ब्राझील (2.48 मे.टन/हेक्टर) चीन (2.05 मे.टन/हेक्टर), जर्मनी (4.07 मे.टन/हेक्टर), अमेरिका (2.61 मे.टन/हेक्टर) या विकसित व विकसनशील देशातील तेलबियांचे दर हेक्टरी उत्पादन भारतापेक्षा (0.86 मे.टन/हेक्टर) खूप जास्त आहे (भारत सरकार 2007).

भारतात तेलबियांची उत्पादकता व उत्पादन वाढवण्यासाठी जे मोठया प्रमाणात प्रयत्न होत आहेत. ते स्वागतार्ह आहेत, परंतु हे प्रयत्न खाद्यतेलाची मागणी व पुरवठा यामध्ये असणारी तफावत भरून काढण्यासाठी अपुरे असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारताची तेलबियांची आयात मोठया प्रमाणात वाढत आहे. 1995-96 मध्ये तेलबियांची आयात 11.61 लक्ष मे.टन. होती, त्यात वाढ होऊन 2000-01 मध्ये ती 47.70 लक्ष मे.टन झाली (भारत सरकार 2004). भारत खाद्यतेलाचा महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे तेलबियां होय. भारतात खाद्यतेलाची दरमाणशी उपलब्धता 1980-81 मध्ये 3.2 कि.ग्रॅ. होती, ती वाढून 2000-01 मध्ये 8.1 कि.ग्रॅ. झाली.

1960 च्या दशकात भारतात जी हरीतक्रांती घडून आली होती, त्यात तेलबियांच्या उत्पादनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते. तेलबियांच्या उत्पादन वृद्धी दरात हरीतक्रांतीच्या पूर्वार्धात घट झाली. यानंतर 1973-74 ते 1983-84 या काळात तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाल्यामुळे, तेलबियांच्या वृद्धी दरात वाढ झाली (सावंत,1987). 1968-69 ते 1980-81 या काळात तेलबियांचा उत्पादन वृद्धी दर 1.8 टक्के होता, तर त्यापुढील काळात म्हणजेच 1981-82 ते 1994-95 मध्ये तेलबियांचा उत्पादन वृद्धी दर 6.00 टक्क्यांपेक्षा जास्त होता. 1981 नंतरच्या काळात तेलबियांचे उत्पादन वाढीस तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्र व उत्पादकता या दोन्ही घटकात झालेली वाढ कारणीभूत होती. परंतु तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रात (3.41 टक्के) झालेल्या वाढीचे योगदान हे दर हेक्टरी उत्पादनाच्या(2.64 टक्के) योगदानापेक्षा जास्त होते.

1987-88 पर्यंत भारतात तेलबियांचे उत्पादन (12.7) दशलक्ष टन व लागवडीखालील क्षेत्र (18.19 दशलक्ष टन) स्थिर होते. त्यापुढील सहा वर्षाच्या काळात म्हणजेच 1987-88 ते 1993-94 पर्यंत तेलबियांचे उत्पादन (21.5 दशलक्ष टन) व लागवडीखालील क्षेत्रात (26.9 दशलक्ष हेक्टर) मोठया प्रमाणात वाढ झाली. याकाळात सोयाबीन, भुईमूग, राई व मोहरी, सूर्यफूल या तेलबियांच्या उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली. तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रात झालेली वाढ ही काही प्रमाणात कमी उत्पादकाता असलेल्या भरड धान्याच्या लागवडीखालील क्षेत्र व सकल लागवडीच्या क्षेत्रात झालेली वाढ, ही शेतजमीन तेलबियांच्या लागवडीखालील आणल्यामुळे झाली आहे (गुलाटी 1996).

महाराष्ट्र राज्यातील तेलबियांच्या कामगिरीकडे बघितले असता असे दिसून येते की, 1960-61 ते 1984-85 या काळात तेलबियांच्या एकूण उत्पादनात वाढ झाली आहे. एकूण तेलबियांच्या दर हेक्टरी उत्पादनात 1978-79 या वर्षी 428 क्रि.ग्रॅ.

पासून 1984-85 मध्ये 629 कि.ग्रॅ. इतकी वाढ झाली आहे. याच काळात भुईमूग लागवडीखालील क्षेत्रात घट तर सूर्यफूलाच्या लागवडीखालील क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते (आष्टुरकर, 1988).राहणे व जोशी (1993) यांच्या अभ्यासानुसार महाराष्ट्रात 1966-67 ते 1978-79 या काळात तिळाचे उत्पादन दरसाल 2.97 टक्क्याने तर 1968-69 ते 1989-90 या काळात करडीचे उत्पादन दरसाल 8.26 टक्क्याने वाढले. तिळाच्या उत्पादनातील वाढ ही लागवडीखालील क्षेत्रातील वाढीमुळे तर करडीच्या उत्पादनातील वाढ ही दर हेक्टरी उत्पादनातील वाढीमुळे झाली. कान्हेरे (1997) यांच्या अभ्यासानुसार 1968-69 ते 1992-93 या काळात एकूण तेलबियांचे दर हेक्टरी उत्पादन 13.68 टक्क्याने वाढल्यामुळे एकूण तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रातील वाढीमुळे तेलबियांचे उत्पादन वाढल्याचे दिसून आले. 1968-69 ते 1992-93या काळात एकूण तेलबियांची उत्पादन अस्थिरता कमी असल्याचे दिसून आले. साळे, पावार व सेठे (1993) यांच्या अभ्यासानुसार महाराष्ट्रात तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादन 1956-57 ते 1987 ते 88 या काळात मोठया प्रमाणात चढ-उतार झाल्याचे दिसून आले आहे. याच काळात महाराष्ट्रात खरीप भुईमूगाच्या लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादनात घट तर तीळ, करडी, सूर्यफूल, कऱ्हाळ, भुईमूग एकूण तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून आले. आर्थीक सुधारणा नंतरच्या काळात महाराष्ट्रातील तेलबियांच्या वृद्धी व अस्थिरतेचा फारच कमी प्रमाणात अभ्यास झाला आहे. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात आर्थिक सुधारणा नंतरच्या काळातील वृद्धी व अस्थिरतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्यातील 55% श्रमशक्ती उपजीविकेसाठी पूर्णतः शेतीवर अवलंबून आहे. राज्यातील एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी 80 % पेक्षा अधिक क्षेत्र कोरडवाहू आहे. तसेच राज्यात पडणारा पाऊस अपुरा व लहरी आहे. राज्यातील सुमारे 1/3 क्षेत्र पर्जन्यक्षेत्रात येते (महाराष्ट्र सरकार, 2007). महाराष्ट्रात सिंचनाचे स्त्रोत प्रामुख्याने कालवे, विहिर व तलाव आहेत. महाराष्ट्रातील निव्वळ बागायती क्षेत्रात गेल्या दोन दशकात वाढ झाली आहे. महाराष्ट्रात निव्वळ पिकाखालील क्षेत्राच्या तुलनेत, निव्वळ बागाईत क्षेत्र 1980-81 या वर्षी 10.19 टक्के होते. तर त्यात वाढ होऊन 1991-92 या वर्षी 12.21 टक्के वर 1997-98 या वर्षी 17.72 टक्के झाले (भारत सरकार,2004).

महाराष्ट्रातील सकल बागायती क्षेत्राच्या तुलनेने तेलबियांच्या लागवडीखालील सकल बागायती क्षेत्र 1980-89 मध्ये 2.92 टक्के होते. त्यात वाढ होऊन 1990-91 मध्ये ते 111.57 टक्के झाले परंतु त्यापुढील काळात म्हणजे 1997-98 मध्ये महाराष्ट्रातील तेलबियांच्या लागवडीखालील सकल बागायती क्षेत्रात घट घडून ते 72.20 टक्के झाले. महाराष्ट्रात एकूण पिकाखालील क्षेत्राच्या तुलनेने एकूण तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्र 1980-81 यावर्षी 8.78 टक्के होते. त्यात वाढ होऊन 1990-91 मध्ये ते 13.03 टक्के झाले. या पुढील काळात म्हणजे 1997-98 मध्ये त्यात घट होऊन एकूण तेलबियांच्या लावगडीखालील क्षेत्र 12.51 टक्के झाले (महाराष्ट्र सरकार,2004).

आर्थिक सुधारणा नंतरच्या काळातील

महाराष्ट्रातील तेलबियांच्या उत्पादनाच्या वृद्धी व अस्थिरतेच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील भुईमूग, तीळ, राई,आणि मोहरी, जवस, एरंडी, करडी, कऱ्हाळ, नारळ व सूर्यफूल या तेलबियांचा वापर करण्यात आलेला आहे. अभ्यासाचा एकूण कालखंड हा 1981-82 ते 2000-01 असा आहे. या संपूर्ण कालखंडाची विभागणी दोन उपखंडात करण्यात आलेली आहे. खंड –1:1981-82 ते 1990-91 (आर्थिक सुधारणा पूर्वीचा कालखंड) व खंड – 2:11991-92 ते 200-01 (आर्थिक सुधारणा नंतरचा कालखंड). तेलबियांच्या वृद्धी व अस्थिरतेचा अभ्यास करण्यासाठी प्रत्येक पिकाचे लागवड क्षेत्र, दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन यासंबंधीची आकडेवारी ' Centre for Monitoring Indian Ecomony,' Mumbai यांच्या प्रकाशनामधून जमा करण्यात आली आहे. तेलबियांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी प्रत्येक तेलबियांचे लागवड क्षेत्र, दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन यांचे वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर (Annual Compound Growth Rate ) सर्व कालखंडासाठी काढण्यात आले. वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर काढण्यासाठी पुढील अर्धलॉगीचा (Semi log) फल जमा केलेल्या

संगणावर अन्वयोजित करण्यात आले.

Log Y=a + log b

जेथे Y= पिकाचे लागवड क्षेत्र/दर हेक्टरी उत्पादन/उत्पादन

T = काळ (वर्षांमध्ये)

(b-1) x 100 हा वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर दर्शवितो तसेच अभ्यासासाठी निवडलेल्या कालखंडातील तेलबियांचे उत्पादन लागवडीखालील क्षेत्र व दर हेक्टरी उत्पादनातील अस्थिरता बघण्यासाठी त्यांचे विचरण गुणक (Coefficients of Variation ) सर्व कालखंडासाठी काढण्यात आले.

$$C.V.= \frac{\sigma}{x} \times 100$$

C.V.= विचरण गुण

$\sigma$ = पिकाचे लागवड क्षेत्र/दर हेक्टरी उत्पादन/ उत्पादनाचे प्रमाण विचरण

X = पिकाचे लागवड क्षेत्र /दर हेक्टरी उत्पादन / उत्पादनाचे माध्यम 0 ते 25 टक्यांपेक्षा जास्त असलेले विचरण गुणक अती समजले आहेत.

तक्ता क्र.1 च्या विश्लेषणानुसार आर्थिक सुधारणा पूर्वीच्या काळाच्या तुलनेने आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात एरंडी व नारळाच्या उत्पादन वृद्धी दर व अस्थिरता या दोन्हीत वाढ झालेली आहे. 1981-82 ते 1990-91 या कालखंडात एरंडीचे उत्पादन वृद्धी दर दरसाल 2.32 टक्के इतका होता, यात लक्षणीय वाढ होऊन 1991-92 ते 2000-01 याकाळात तो दरसाल 6.23 टक्के इतका झाला. तसेच नारळाचे उत्पादन 1981-82 ते 1990-91 या काळात दरसाल 5.61 टक्के होते. त्यात वाढ होऊन 1991-92 ते 2000-01 या काळात ते दरसाल 8.20 टक्के या दराने वाढले. एरंडीच्या व नारळाच्या लागवडीखालील क्षेत्रात झालेल्या लक्षणीय वाढीमुळे एरंडीचे व नारळाचे उत्पादन आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात मोठया प्रमाणात वाढले. एरंडी व नाराळाच्या दर हेक्टरी उत्पादनात आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात मोठया प्रमाणात घट घडून आली. या दोन्हीही पिकांची उत्पादन अस्थिरता आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात किंचित वाढल्याने दिसून येते.

भुईमूग,कऱ्हाळ, सूर्यफूल या तेलबियांच्या

उत्पादन वृद्धी व अस्थिरतेत आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात घट झाल्याचे दिसून येते. भुईमूगाचा उत्पादन वृद्धी दर १९८१-८२ ते १९९०-९१ या काळात दरसाल ५.०४ टक्के होते. त्यात घट होऊन १९९१-९२ ते २०००-०१ या काळात तो दरसाल -२.७२ टक्के इतका झाला.

### तक्ता क्र.1

### महाराष्ट्रातील तेलबियांचे लागवड क्षेत्र, उत्पादनाचे वार्षिक चक्रवाढ वृध्दी दर व विचरण गुणक

| तेलबिया | | कालखंड-1 1981-82 ते 1980-91 | | | कालखंड-2 1991-92 ते 2000-01 | | | संपुर्ण कालखंड 1981-82 ते 2000-01 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | | A | P | Y | A | P | Y | A | P | Y |
| भुईमूग | CGR | 1.26 | 5.04 | 3.75 | -4.23 | -2.72 | 1.57 | -2.55 | -0.75 | 1.85 |
| | CV | 11.83 | 28.69 | 19.22 | 14.77 | 16.43 | 14.04 | 19.40 | 25.16 | 17.80 |
| तीळ | CGR | 7.12 | 7.94 | 0.79 | -9.62 | -9.54 | 0.09 | -2.06 | -0.76 | 1.34 |
| | CV | 25.70 | 24.86 | 11.59 | 31.39 | 39.20 | 18.16 | 29.43 | 31.48 | 17.72 |
| राई व | CGR | 3.86 | 5.00 | 1.11 | 4.92 | -0.43 | -5.0 | 5.99 | 4.36 | -1.64 |
| मोहरी | CV | 24.42 | 40.06 | 24.76 | 30.90 | 45.23 | 96.11 | 45.12 | 51.24 | 25.81 |
| जवस | CGR | -1.87 | -2.17 | -0.28 | 6.22 | -4.01 | 2.36 | -5.92 | -5.57 | 0.36 |
| | CV | 7.10 | 13.67 | 10.86 | 21.38 | 34.58 | 24.18 | 34.45 | 36.62 | 18.62 |
| एरंडी | CGR | 3.18 | -3.32 | 0.14 | 10.01 | 6.23 | -3.42 | 6.13 | 3.24 | -2.72 |
| | CV | 17.97 | 23.33 | 16.01 | 35.42 | 28.77 | 24.41 | 45.07 | 29.88 | 24.44 |
| करडी | CGR | 1.71 | -0.85 | -2.52 | -4.57 | -6.37 | -1.88 | -2.99 | -4.32 | -1.36 |
| | CV | 8.04 | 18.93 | 20.46 | 24.44 | 47.33 | 32.23 | 22.81 | 35.85 | 26.13 |
| कऱ्हाळ | CGR | 1.23 | 1.99 | 0.75 | -4.57 | -1.74 | 4.03 | -2.26 | -0.98 | 1.32 |
| | CV | 12.04 | 23.75 | 18.09 | 20.48 | 15.34 | 18.00 | 19.23 | 21.63 | 18.25 |
| नारळ | CGR | -4.39 | 5.61 | 10.46 | 11.23 | 8.20 | 2.71 | 2.78 | 7.67 | 4.76 |
| | CV | 19.02 | 20.43 | 28.58 | 34.43 | 25.36 | 16.73 | 33.22 | 45.74 | 31.37 |
| सूर्यफूल | CGR | 12.38 | 11.56 | -0.73 | -2.35 | -2.44 | -0.10 | 3.77 | 4.29 | 0.50 |
| | CV | 32.89 | 44.78 | 27.56 | 16.10 | 31.84 | 18.88 | 27.49 | 40.99 | 22.96 |

टीप : १)CGR = वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर

२)CV = विचरण गुणक

३) A = लागवडीखालील क्षेत्र

४) P = उत्पादन

५) Y = दर हेक्टरी उत्पादन

**स्त्रोत** : वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर व विचरण गुणक खालील स्त्रोतांमधून जमा केलेल्या संचकावर आधारलेले आहे.

1) 'India's Agricultural Sector', Center for Monitoring Indian Economy, Mumbai, 2005.

सूर्यफूलाचे उत्पादन वृद्धी दर 1981-82 ते 1990-91 या काळात दरसाल 11.56 टक्के होते, तर त्यात आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात म्हणजेच 1991-92 ते 2000-01 मध्ये मोठया प्रमाणात घट होऊन दरसाल -2.44 टक्के झाला. भुईमूग, कऱ्हाळ व सूर्यफूलाच्या लागवडीखालील क्षेत्रामध्ये आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात मोठया प्रमाणात घट घडून आली. दर हेक्टरी उत्पादानाच्या बाबतीत फक्त कऱ्हाळाचे (4.03 टक्के) दर हेक्टरी उत्पादन आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात मोठया प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. 1991-92 ते 2000-01 या काळात भुईमूग व कऱ्हाळ यांची उत्पादन अस्थिरता कमी तर सूर्यफूलाची उत्पादन अस्थिरता मध्यम असल्याचे आढळून आले.

आर्थिक सुधारणा पूर्वीच्या काळाच्या तुलनेने आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात तीळ, राई व मोहरी या तेलबियांच्या उत्पादन वृद्धी दरात मोठया प्रमाणात घट घडून आली, परंतु त्यांच्या उत्पादन अस्थिरतेत मात्र मोठया प्रमाणात वाढ झाली. तिळाचा उत्पादन वृद्धी दर 1981-82 ते 1990-91 या काळात दरसाल 7.14 टक्के इतका होतो, त्यात 1991-92 ते 2000-01 या काळात मोठया प्रमाणात घट होऊन दरसाल -9.54 टक्के इतका झाला. तिळाच्या लागवडीखालील क्षेत्रात झालेली लक्षणीय घट ही तिळाच्या उत्पादन वृद्धी दरात घट घडवून आणण्यास मुख्यत्वे कारणीभूत होती. तिळाची उत्पादन अस्थिरता 1981-82 ते 1990-91 मध्ये मध्यम (24.86 टक्के) होती, यात वाढ होऊन 1991-92 ते 2000-01 या काळात ती अती (39.20टक्के) झाली. राई व मोहरी या तेलबियांच्या बाबतीत वृद्धी दर 1981-82 ते 1990-91 या काळात दरसाल 5.0 टक्के इतका होतो, त्यात घट होऊन 1991-92 ते 2000-01 या आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात ती दरसाल 70.43 टक्के इतकी झाली. राई व मोहरी यांच्या लागवडीखालील क्षेत्रात आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात तुलनेने वाढ झाली, परंतु दर हेक्टरी उत्पादनात (-5.09 टक्के) झालेल्या घटीमुळे त्यांच्या उत्पादन वृद्धी दरात आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात घट झाल्याचे दिसून येते.

जवस व करडी या दोन्ही तेलबियांचा उत्पादन वृद्धी दर 1981-82 ते 1990-91 व 1991-92 ते 2000-01 या दोन्ही कालखंडात ऋण असल्याचा दिसून येतो. तसेच जवस (-4.01 टक्के) व करडी (-6.37 टक्के) या तेलबियांचा उत्पादन वृद्धी दर घटीचा वेग हा आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात वाढला आहे. आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात जवसाच्या (-6.22 टक्के) लागवडीखालील क्षेत्रात मोठया प्रमाणात घट घडून आली, तर -करडीच्या बाबतीत लागवडीखालील क्षेत्र (-4.57 टक्के) व दर हेक्टरी उत्पादन (-1.88 टक्के) या दोहोंत घट झाली. जवसाची उत्पादन अस्थिरता 1981-82 ते 1990-91 या काळात कमी (13.67 टक्के) होती, त्यात वाढ होऊन 1991-92

ते 2000-01 या काळात ती मध्यम (34.58 टक्के) झाली. त्याचबरोबर करडीची उत्पादन अस्थिरता 1981-82 ते 1990-91 या काळात कमी (47.33 टक्के) झाली.

महाराष्ट्रातील तेलबियांच्या सुधारणा पूर्वीच्या व नंतरच्या काळातील उत्पादन वृद्धी व अस्थिरतेच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, महाराष्ट्रात तेलबियांच्या उत्पादनात एरंडी व नारळाच्या उत्पादनाव्यतिरिक्त इतर पिकांच्या उत्पादन वृद्धी दरात आर्थिक सुधारणा पूर्वीच्या काळाच्या तुलनेत आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात मोठी घट घडून आली आहे. एरंडी व नारळाच्या उत्पादनात झालेली वाढ ही मुख्यत्वे लागवडी खालील क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे होती. इतर जवळजवळ सर्वच पिकांच्या बाबतीत लागवडी खालील क्षेत्र व दर हेक्टर उत्पादन आर्थीक सुधारणा नंतरच्या काळात तुलनेने घटलेले आहे. फक्त जवस व कऱ्हाळ या तेलबियांची दर हेक्टरी उत्पादन आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात तुलनेने वाढले आहे. तसेच आर्थिक सुधारणा पूर्वीच्या काळाच्या तुलनेने भुईमूग, कऱ्हाळ व सूर्यफूल व्यतिरिक्त इतर तेलबियांच्या उत्पादन अस्थिरतेत आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात वाढ झालेली आहे.

महाराष्ट्रात तेलबियांचे उत्पादन वाढण्यासाठी दर हेक्टरी उत्पादन व लागवडी खालील क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. यासाठी तेलबियांना किंमतीचे संरक्षण देणे व आध[illegible] तंत्रज्ञान मुख्यत्त्वे कोरडवाहू व जैव-[illegible] मदतीने तेलबियांचे उत्पादन वा[illegible] होणे आवश्यक आहे. तसेच खाद्य[illegible] गरज भागविण्यासाठी खाद्य तेलाच्या [illegible] स्त्रोताचा वापर करणे आवश्यक आहे.

## संदर्भ :-


1) Ashturkar, B.W. (1988): Performance of Oilseed Crops in Maharashtra (Project), Agresco Report 1987-88, Mharathawada Agricultural University, Parbhani.
2) Bansil, P.C. (1997): Oilseeds Scenario: Some Issues, EPW, Vol.32,Dec. 27,pp. A-191 to A-200.
3) CMIE (2005): India's Agricultural Sector, Mumbai.
4) Government of India (2007): Economics Survey: 2006- 07,Economic Division, Ministry of Finance, New Delhi.
5) Government of India (2004): Agricultural Statistics At A Glance 2004, Agricultural Statistics Division, Directorate of Economics & Statistic s, Department of Agriculture and Co-operation, Ministry o' Agricultural, New Delhi.
6) Government of Maharashtra Epitome of Agricultural in M[illegible] Directorate of Agricul[illegible]

# जल-पणन व्यवस्थेतील जल-मूल्य निर्धारण प्रक्रिया

**वसंतराव जुगळे**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
भ्रमणध्वनी -9422040684

**प्रस्तावना :**

एखाद्या वस्तुच्या खरेदी-विक्री व्यवहाराला आपण बाजारपेठ असे संबोधतो. वस्तुंचे बाजाराधिक्य (उपभोग वजा जाता शिल्लक राहणारा वस्तुंचा साठा) विक्रीच्या उद्देशाने एका ठराविक ठिकाणी प्रत्यक्ष आणले जाते अथवा एखाद्या ठिकाणाहून पुरवठा करण्याच्या अटीवर अथवा करारावर विक्रीचे व्यवहार केले जातात. अशा ठिकाणी अथवा खरेदीदार असतील त्या ठिकाणाहून विक्रीचे व्यवहार केले जातात. त्यालाही बाजारपेठ संबोधले जाते. प्रसार आणि व्यवहार माध्यमे विस्तारल्यामुळे बाजारपेठेची संकल्पनादेखील विस्तारली आहे. संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स क्रांतीमुळे खरेदी-विक्री व्यवहारामध्ये खूपच आधुनिकता आली आहे. ई-बिझनेस व ई-कॉमर्सद्वारे खरेदी-विक्री व्यवहाराची दिशा निर्धारित झाली आहे. या व्यवहारांच्या प्रभावामुळे शेती व्यवसायामध्ये (अॅग्रो बिझनेस) अनेक बदल होताना दिसतात. प्रमंडळीय शेती तंत्र (Corporate farming), कंत्राटी शेती तंत्र (Contract farming) आणि काटेकोर अथवा अचूक निदानाचे शेती तंत्र (Precision farming) अशा कांही पध्दती गतिमान झाल्या आहेत. [जी.एम. (Genetic Modification] च्या तंत्रज्ञानाने संपूर्ण शेती तंत्र व शेती पध्दतीमध्ये अमुलाग्र बदल होताना दिसतात. शेतमालाच्या खरेदी-विक्री व्यवहाराला ठराविक अशी जागा निर्माण झालेली नाही. हजारो मैलावर असलेल्या खरेदीदाराबरोबर विक्री व्यवहाराची बोलणी, करार, देवाण-घेवाण तसेच ठोक अथवा वायदा व्यवहार (Future trading) करता येतो. मालाचे स्थलांतर न करता त्याची सट्टेबाजी होऊ शकते. यामुळे विशेषत: निर्यात व्यवहार गतिमान झाला आहे. कांही प्रलोभने, फसवाफसवी होऊ नये म्हणून बहुआयामी (Multi-lateral) व्यापारी करार, जागतिक व्यापार संघटनेच्या चौकटीत होत असतात,त्याची

आदर्श अशी आचारसंहिता सध्या निर्माण झालेली आहे. यामुळे विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये सहज खरेदी-विक्री व्यवहार होत असतात.

1960-70 च्या दशकामध्ये अन्नधान्य उत्पादन वृध्दिसाठी सिंचन सुविधा व त्यावरील सरकारी गुंतवणूक आवश्यक असल्यामुळे सरकारी धोरण या अनुषंगाने आधोरेखित झाले. या सोबत हरित क्रांतीची जोड मिळाल्याने अन्नधान्य उत्पादनात वेग आला आहे, अर्थात याचे विपरीत परिणाम कालांतराने दिसू लागले. सिंचनाचे असमान वाटप, सिंचित पट्ट्याच्या विकासावर अधिक लक्ष, रेंगाळणारे प्रकल्प, प्रकल्पांच्या खर्चातील वृध्दी आणि त्यांतील भ्रष्टाचार यासारख्या अनेक प्रश्नांमुळे विकासप्रक्रियेत असमानता आली. अलीकडे पर्यावरणीय संदर्भात समन्यायी पाण्याचे वाटप, लोकांचा सहभाग तंत्र, विकेंद्रित विकास संवर्धन आणि विकासाचे एकात्मिक धोरण, पाणलोट क्षेत्राचा विकास, मागणी आधारित दृष्टिकोण अशा नव्या धोरणाची भर पडते आहे.

या सर्व तंत्राचा आणि शेती पध्दतीचा मूलगामी परिणाम पाण्याच्या पणन व्यवहारावर होणे साहजिकच आहे. त्यामुळे पाणीसाठ्याच्या बाजारपेठा (Water markets) ठिकठिकाणी निर्माण झालेल्या आहेत. पाण्याची व्यापारी अथवा वाणिज्यकीय मागणी (Commercial demand) दिवसेंदिवस वाढत आहे. मागणी-पुरवठ्यातील (प्रत्यक्ष उपयोगात अथवा उपभोगात येणारी प्रक्रिया) तफावतीमुळे पाण्याचे मौद्रिक मूल्य वाढत आहे. त्याचे मूल्य निर्धारण आणि प्रत्यक्ष देवाण-घेवाण ह्या दोन्ही संकल्पना भिन्न आहेत. देवाण-घेवाणीच्या (पुरवठा-मागणी) प्रक्रियेत मूल्य-निर्धारण ओघानेच येते. किंबहुना युक्त मूल्यनिर्धारण(पुरवठादार व मागणी करणारे) झाल्याशिवाय विक्री-व्यवहार होऊच शकत नाही. मूल्यनिर्धारण प्रक्रिया हा एक या व्यवहारातला अविभाज्य भाग आहे. या सर्वांचा परिणाम सिंचन व्यवस्थापनावर होणे साहजिक आहे. म्हणूनच त्याच्यातली पारंपारिकता संपुष्टात येत आहे. या सर्व बाबींचे विस्तृत विवेचन प्रस्तुत लेखामध्ये केले आहे. विशेषत: बाजारपेठांची बदलती परिस्थिती लक्षात घेऊन ती सिंचन व्यवस्थेला कशा पध्दतीने लागू होईल? त्यामुळे सिंचन व्यवस्थापनामध्ये कोणते बदल करावे लागतील? या संबंधीची चर्चा या लेखामध्ये करण्याचा मनोदय आहे. ही चर्चा ओघानेच कांही व्यवहारवादी गृहित तत्त्वावर आधारलेली आहे.

**जल-पणन व्यवहाराच्या नव्या संकल्पना :**

अलीकडच्या काळातील/बदलामागील विचारधारा ही राज्यसंस्था आणि बाजारव्यवस्था यांच्या भूमिकेशी निगडित आहे. संस्थात्मक संरचना आणि मागणी-पुरवठ्याच्या नियोजनाचा आशय लाभलेल्या या विचारधारा लोकाभिमुख होण्यासाठी त्यास व्यवहारवादाची जोड द्यावी लागेल. नियोजन व नियमाद्वारे स्वयंचलित होणाऱ्या जलक्षेत्रातील बदलांचा प्रवाह सक्षम होण्यासाठी राज्यसंस्थेच्या उपक्रमात खाजगी संस्थांच्या सहभागाबरोबरच लोकसहभागाची संज्ञा(Public Private Partnership) प्रस्थापित व्यवस्थेने स्वीकारलेली आहे. 1980 नंतरच्या जल धोरणांमध्ये पाणी ही आर्थिक वस्तू मानलेली आहे. मागणी-पुरवठ्याच्या

नियमानुसार त्याचे मूल्य निर्धारण व्हावे हा खुल्या बाजारव्यवस्थेचा कल असला तरी शासकीय हस्तक्षेपाशिवाय त्याचे नियमन होऊ शकत नाही.

अनेक वस्तुंच्या विशेष बाजारपेठा (खरेदी-विक्री) कांही विशिष्ट ठिकाणी केंद्रीत झालेल्या असतात. त्यामुळे बऱ्याच अंतर्गत व बाह्य बचती निर्माण झालेल्या असतात. उत्पादनाबरोबर विनिमयाला देखील अशा बचती उपयुक्त व फायदेशीर असतात. याशिवाय ह्या क्षेत्रात होणारी गुंतवणूकदेखील अभिसारी श्रेणी (Convergent Series Investment) आणि अपसारी (Divergent Series Investment) स्वरूपाची असते. तसेच पुर्वानुबंध (Forward) व पश्चानुबंधाचे (Backward) सहसंबंध त्यामध्ये प्रस्थापित होतात. यामुळे उत्पादन, विनिमय आणि सेवा खर्चामध्ये बचत होते. सेवा क्षेत्र विकसित झाल्यामुळे एक प्रकारची नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन विकासाला गती मिळते.

पाणी ही एक जीवनावश्यक वस्तू आहे. तसेच त्याचा वापर व उत्पादन, वाणिज्यकीय व व्यापार व्यवहाराशी होत असल्यामुळे त्याला व्यापारी महत्त्व प्राप्त झाले आहे. पाणी ही निसर्गदत्त वस्तू आहे. त्यामुळे ती लोक वस्तू (Public Good) आहे. त्यावर सामाजिक मालकी ओघानेच प्राप्त होते. पण व्यावहारिक दृष्टीकोनातून ती व्यक्ति, गट अथवा सामुहिक असल्याचा भास होतो. कारण पाण्याच्या प्रत्यक्ष वापरासाठी कांही वाणिज्यकीय अथवा व्यापारी गुंतवणूक माध्यमांचा उपयोग होत असल्यामुळे त्याला संबंधितांची व्यावहारिक मालकी प्राप्त होते. पण पाणी ही निसर्गदत्त वस्तूच आहे. त्याची गुणवत्ता अथवा त्याच्या वापराची सुलभता विशिष्ट माध्यमांनी तयार झालेली असते. उच्च वर्गीय लोकांची जमीनीवर मालकी असल्यामुळे पाण्यासारख्या संसाधनावर त्यांचीच मालकी प्रस्थापित झाली होती. वास्तविक साम्राज्यवादाच्या काळात इतर नैसर्गिक संसाधनाप्रमाणे पाणी हेसुध्दा शासन सत्तेच्या अखत्यारित गेले. कल्याणकारी संकल्पनेत पाणी हे विकासाचे साधन बनले. त्यामुळे शासनप्रणित संस्थांच्या पाण्यावरचा हक्क अबाधित राहिला. गुंतवणुकदेखील शासन संस्थेच्या वतीने होऊ लागली. काहींच्या बाबतीत पाण्याला मक्तेदारी मूल्य प्राप्त होते. उदा. नगरपालिका, महानगरपालिकांच्या मार्फत पुरवठा केल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे मूल्य त्याच संस्था निर्धारित करीत असतात. पण लागणाऱ्या/आवश्यक पाण्याचा परवाना शासनाकडूनच घ्यावा लागतो. तसेच विहिर, पाटबंधारे, कालवे, धरणे, उपसा सिंचन, तळे (सर्व प्रकारचे) याद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्यावरची मालकी शासकीय मक्तेदारी स्वरूपाची असते. म्हणूनच पाणी ही लोक वस्तू (Public Good) आहे. पण पाण्याच्या विशिष्ट वापरामुळे आणि त्यासाठीच्या उत्पादन/व्यापार प्रक्रियेमुळे त्याला पणन मूल्य प्राप्त झाल्याचे दिसते उदा. मिनरल वॉटर, शेती-उद्योग-मनोरंजन आणि पिण्याच्या पाण्याचे मूल्य तिच्या वापर आणि उत्पादन मूल्यावरून निर्धारित होते. म्हणूनच जगभर जल-पणन (Water markets) व्यवस्था निर्माण झालेली आढळते. 1971-72 मध्ये प्रथमतः बिसलरी कंपनीने बाटलीबंद मिनरल वॉटरची निर्मिती सुरू केली. लोक त्याला हसत होते, पण आज अनेक कंपन्यांनी

ह्या धंद्यात किफायतशीर गुंतवणुक केलेली आहे. तसेच दुधापेक्षाही महाग अशा मिनरल वॉटरची किंमत कंपन्याना मिळत आहे. मागणी येईल या उद्देशाने प्रारंभिक उत्पादन होते आणि त्यापुढे उत्पादन होते म्हणून उपभोग होतो आणि उपभोग होतो म्हणून उत्पादन हे चक्र अविरत सुरू राहते. पण प्रारंभिक धाडस व नाविण्य मात्र फार महत्त्वाचे असते. अर्थात तो उपक्रमशील (Innovative) व्यवहार असतो. त्याची सुरूवात करणारा (Innovator) हा कधी मळलेली वाट तुडवित नसतो.

**पिकनिहाय सिंचन दराची मांडणी : व्यावहारिक/उपयोजित दृष्टिकोण :**

सिंचनाच्या सोयी दोन प्रमुख जलस्त्रोतातून उपलब्ध होतात. अ) भू-पृष्ठावरील जलस्त्रोत ब) भू-गर्भातील जलस्त्रोत. दोन्ही जलस्त्रोत पावसाच्या पाण्यातून निर्माण होतात. भू-पृष्ठावर पडणारा पाऊस धरणे, बंधारे, के.टी. वेअर्स पध्दतीने अडवला जातो. त्याचा वापर उपसा पध्दतीने शेतीसाठी होत असतो. जलस्त्रोत नैसर्गिकरित्या उपलब्ध होत असला तरी त्यावर भांडवल आणि मनुष्यबळाचा संयुक्त वापर होत असल्यामुळे आणि धरण-बंधारे त्यांच्यावर कांही प्रमाणात देखभाल दुरूस्ती, परिव्ययासाठी कांही वित्तीय तरतूद करावी लागत असल्यामुळे त्याच्या लाभार्थीवर कांही प्रमाणात वरील खर्चाचा भार टाकणे अथवा त्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी लाभार्थींवर सोपविणे आवश्यक आहे.

हा भार कोणत्या पध्दतीने लाभार्थींवर टाकला जावा यावर व्यापक आणि शास्त्रशुध्द विवेचन आणि प्रमेये मांडली गेलेली आहेत. जलस्त्रोताचे आयोजन-नियोजन शासनामार्फत होत असले तर त्याच्या दर निर्धारणाची समस्या निर्माण होते. खाजगी क्षेत्रामार्फत त्याची उभारणी होत असेल तर त्याचे किंमत निर्धारण बाजार दराने होत असते. त्याचा भार लाभार्थीवर एका विशिष्ट कालावधीसाठी लादता येतो. कोणत्याही सिंचन प्रकल्पाच्या उभारणीवर होणारा खर्च लाभार्थींकडून वसूल केला पाहिजे. शिवाय देखभाल दुरूस्तीचा परिव्यय देखील लाभार्थींकडे सोपविणे आवश्यक आहे. खाजगी क्षेत्राकडून उपलब्ध होणाऱ्या वस्तू व सेवांचे मूल्य खाजगी क्षेत्र सांगू शकते. त्याच पध्दतीने शासनाचेही दर निश्चित झाले पाहिजेत. ही वस्तुस्थिती आहे. पण सामाजिक हित लक्षात घेऊन त्याची व्यापकता मूल्यांकित करणे अवघड होते.

महाराष्ट्र शासनाचे सिंचन पाण्याचे दर जुलै 1975 मध्ये निश्चित केले होते. हे दर 11972 च्या सिंचन आयोगाच्या शिफारशीनुसार निश्चित केलेले होते. दर आकारणी पुढील तत्त्वावर आधारित होती. पाण्याचे प्रमाण व पुरवठा, पाणीपट्टी देण्याची कुवत, पाणीपट्टीपासून मिळणारे उत्पन्न + खर्च किंवा सेवा खर्च, पाण्याचे दर पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नाशी निगडित असावेत आणि ते समन्यायी असावेत, पाण्याचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर व्हावा, इत्यादी.

वरील तत्त्वांचा विचार करून ऊस पिकासाठी दर हेक्टरी 750 रूपये असा दर निश्चित केला. खरीप हंगामी पिकासाठी प्रति हेक्टरी रू. 50, रब्बी पिकासाठी आणि उन्हाळी कापूस पिकासाठी रू. 75 अशी दर आकारणी केली होती. त्यानंतर 15 वर्षांनी वरील दर सुधारण्यात

आले. सिंचन प्रकल्पांचा वाढता भांडवल खर्च आणि पाणीपट्टीतून मिळणारे वार्षिक उत्पन्न यामधील बरीच तफावत आढळून आली. शिवाय शेतीत सुधारणा आली, तंत्रज्ञान आले, शेती उत्पादन वाढले, शेतीमालाचे दरही वाढले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सिंचन आयोगाने (1960) सुचविल्याप्रमाणे शेतीमालाच्या किंमतीच्या 6 ते 12 टक्के या दराने पाणीपट्टीचे दर निश्चित केले. 1 जुलै 1990 पासून सुधारित दर लागू झाले. पुढील पाच वर्षांसाठी म्हणजे 1994 पर्यंत हे दर निश्चित झाले. खरीप हंगामी भात व इतर पिकासाठी पुढील पाच वर्षामध्ये रू. 65 ते 100, भुईमूग रू.120 ते 200, रब्बी पिकासाठी रू.180 ते 300 आवाक्यात दरवाढ झाली. बारमाही ऊस, केळी, फळझाडे यासाठी रू. 1000 ते 1750 पर्यंत वाढ करण्यात आली. या विभिन्न दरामध्ये विविधता व आधुनिकता आणण्याचे प्रयत्न झालेले आहेत. पण दुर्दैवाने त्यानुसार पाणीपट्टीची वसुली झाली नाही. शिवाय खोट्या नोंदी केल्या गेल्या त्यामुळे उद्देश सफल होऊ शकला नाही. पाणी दरामध्ये विविधता असल्यामुळे (उदा. दृवामित्व शुल्क, सेस, उपसिंचन, सेवा शुल्क) पाणी दराबाबतीत आधार निर्माण झाला. शिवाय त्यामध्ये व्यावहारिकता निर्माण करण्यात आली. 1 जुलै 1994 नंतरच्या पाणी दरामध्ये बदल झाला नाही. उलट 1 एप्रिल 1999 ते 2000 या काळात ऊसाचा पाणी दर रू.1260 ने कमी झाला.

महाराष्ट्र शासनाच्या सप्टेंबर 2001 च्या निर्णयानुसार सिंचन दराचे वर्गीकरण पाच गटात केलेले आहे. 1) मोठे, मध्यम व लघु प्रकल्पावरील प्रवाही व ठिबक तुषार सिंचनाचे दर, 2) कालव्यातून/पाणी वापर संस्थांच्या निधीतून बांधलेल्या जलाशयातून घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा करणाऱ्या सिंचनाचे स्वामित्व शुल्क दर, 3) खाजगी उपसा सिंचनाचे प्रवाही व ठिबक पध्दतीच्या सिंचनाचे दर, 4) शासनाच्या (पाटबंधारे व महामंडळ) अधिपत्याखालील प्रकल्पापासून 30 मीटर खालील उपसा सिंचन व 30 मीटरपेक्षा जास्त उपसा असलेल्या सिंचनाच्या प्रवाही व ठिबक पाणी पुरवठ्याचे दर.

अलीकडच्या सुधारित सिंचन पाण्याचे दर इ.स. 2000 ते 2003 पर्यंत निर्धारित केलेले आहे. कालव्याच्या प्रवाही पाण्यावरील खरीप हंगामी भात व इतर पिकांना द्यावयाचे पाण्याचे दर वरील कालावधीतील प्रति हेक्टरी रू. 120, 180, 207 व 238 या टप्प्याने वाढविले आहेत. यातील वाढीचा वेग 50,15 व 15 टक्के असा आहे. खरीप भुईमूग व इतर आधारभूत पिकांसाठी वरील कालावधीसाठी रू.240,360,414 व 476 या टप्प्याने पाण्याचे दर वाढविण्यात आले आहेत. यातील वाढीची टक्केवारी देखील 50, 15 व 15 अशीच आहे. सर्व प्रकारच्या पाण्याच्या दरातील वृध्दीदर वरील प्रमाणात कमी होऊन तो 15 टक्क्याला स्थिर केलेला आहे. उन्हाळी व रब्बी हंगामातील पिकांच्या बाबतीत देखील प्रमाण आढळून येते. उन्हाळी भुईमूग दर इ.स.2000 व 2003 साठी अनुक्रमे रू.725,1088 रू. व 251 व 1438 या प्रमाणात वाढविण्यात आले आहेत. बारमाही प्रवाही पाण्याखालील केळी व ऊसासाठीच्या पाणीपट्टीमध्ये रू.3175, रू. 4763, रू.5477 व रू.6298 या दराने वाढ केली आहे. कालव्याच्या प्रवाही पाण्याच्या दरामध्ये विविधता

आणण्याच्यादृष्टीने एकूण 66 प्रकार नमूद केलेले आहेत. कालव्याच्या लाभक्षेत्रातील कोणत्याही बाजूस मुख्य हद्दीपासून 35 मीटरच्या आत असलेल्या जुन्या व नव्या विहिरीवरील नगदी पिकांवर (ऊस, केळी, फळझाडे, भाजीपाला, कापूस, भुईमुग) प्रवाही सिंचनावरील दराच्या अर्ध्या दराने पाणीपट्टीची आकारणी करण्यात आलेली आहे. तथापि, गहू, हरभरा, ज्वारी, बाजरी, मका अशा अन्नधान्य पिकांवर कोणतेही दर आकारले नाहीत.

पाणी वापर संस्थांच्या स्वनिधीतून बांधलेल्या जलाशयातून घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा होत असेल तिथे पाणीपट्टीचे स्वामित्व दर आकारण्यात आले आहेत. हे दर सर्व हंगामासाठी 12 रूपयापासून रू.23.80 पर्यंत आहेत. कालव्यातून मायनरच्या मुखाशी जाणाऱ्या पाण्याचे दर खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी पहिल्या वर्षी 50 टक्के वाढ आणि त्यानंतरच्या काळात 15 टक्क्याने वाढ केलेली आहे. या वाढीचे प्रमाण साधारणत: खरीप हंगामातील पाणीदराच्या तीन पट दर उन्हाळी हंगामाचे आहेत. रब्बी हंगामाचे दर मात्र साधारणत: दीडपटीने वाढविण्यात आलेले आहेत. कालवा क्षेत्राखालील खाजगी उपसासिंचन योजनेच्या प्रवाही पाणी वापराबद्दल ऊस पिकांसाठी रू.1495 आणि ठिबकसाठी रू.995 पाणी दर आकारण्यात आले आहेत. जलाशय असेल तर हे दर अनुक्रमे रू. 775 व रू.495 असे आहेत.

अधिसूचित नदीच्या पाणी साठ्यातून बारमाही प्रवाही पाणी उपलब्ध होत असेल तर वर्ष 2001 साठी दर हेक्टरी सरसकट रू.940 प्रमाणे पाणीदर आकारण्यात आले आहेत. वर्ष 2002 साठी हे दर रू.1030 आणि वर्ष 2003 साठी रू.1135 पर्यंत वाढविण्यात आले आहेत. यातील वृध्दीदर 10 टक्क्यांच्या आसपास आहे.

पाटबंधारे विभागाच्या अधिपत्याखालील 30 मीटर खालील उपसा सिंचन योजनावरील सेवा शुल्काचे दरही पुनर्रचित केलेले आहेत. त्यामध्ये अत्यंत परिपूर्णत: व विविधता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. या दरामध्ये देखील पूर्वीच्याच पध्दतीने म्हणजे 50,15 व 15 टक्क्याने वाढ सुचविली आहे. बारमाही ऊस व केळीसाठीच्या प्रतिहेक्टरी पाणी दरामध्ये इ.स.2000 ते 2003 साठी अनुक्रमे रू.1815, रू.2723, रू.3131 व रू.3600 अशी वाढ सुचविली आहे.

पाणी दरामध्ये विविधता आणण्याचा काटेकोर प्रयत्न महाराष्ट्र शासनाने केलेला आहे. यातून कोणताही घटक बाजूला राहणार नाही याची काळजी सुध्दा घेतली आहे. पण या दराने प्रत्यक्ष वसुली होते किंवा नाही? वसुलीसाठी कोणती यंत्रणा शासनाने निर्माण केलेली आहे? यातून कोणीही सुटू नये याची कोणती काळजी शासनाने घेतली आहे? पिकांची नोंद खऱ्या अर्थाने होईल का? या बाबी मात्र कटाक्षाने पाळल्या तरच या दरातील विविधता आणि अर्थपूर्णता यांचे सार्थक होईल. अन्यथा त्याचा काही उपयोग होणार नाही.

सुचविलेली वाढ अर्थपूर्ण आहे. सिंचन प्रकल्पावर होणाऱ्या एकूण खर्चाचा आणि देखभाल खर्चाचा विचार केल्यास प्रतिहेक्टरी खर्च हा मोठ्या धरणाचा जास्त असला तरी घनमापन पध्दतीने पाणी मोजून त्यावर खर्च विभागल्यास तो दर मध्यम व

लघु प्रकल्पांच्या मानाने कमी येतो. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाद्वारे उपलब्ध होणारे पाणी महाग असले तरी (कारण खर्च जास्त असतो) त्याचा सामाजिक लाभ जास्त असतो. म्हणून त्यावर भर देणे आवश्यक आहे. मोठ्या धरणाद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा प्रतिहेक्टरी सुमारे 60 ते 65 हजार पर्यंत असतो. पाणलोट क्षेत्र विकासासाठी दरहेक्टरी साधारणत: रू.15 हजार पर्यंत खर्च येतो. पाणलोट विकासाचे फायदे अधिक आणि दूरगामी स्वरूपाचे आहेत. उपसा पध्दतीने (म्हैसाळ, टेंभू इत्यादी) सिंचन सुविधा अत्यंत महागडी असते. अशा पाण्याचा वापर नगदी पिकासाठीच परवडतो. पाण्याच्या अधिक वापरापासून जमीनी चोपण व क्षार पीडित होतात तर कांही भागात नेहमीचाच दुष्काळ असतो. हा असमतोल पर्याप्त पध्दतीने हाताळणे आवश्यक आहे. पाणी वापर संस्था महत्वाची भूमिका बजावू शकतात. तसेच जल साक्षरतेचे विविध धडे जनमानसात रूजविले गेले पाहिजेत. तरच नैसर्गिक असमतोल, सामाजिक व आर्थिक समतोल आणू शकतो.

## उत्पादन, वितरण आणि मालकी :

पाण्याची खरेदी-विक्री आर्थिक निकषावर होणार असेल तर कल्याणाची संकल्पना मागे पडते. पाण्याची हक्कदारी (Water entitlements) आपल्या कक्षेत ठेऊन आर्थिक विकास पूर्णवत आणणे जिकीरीचे आहे. नियंत्रित भांडवलशाही तत्त्व मर्यादित क्षेत्रावरील शासकीय हस्तक्षेपाने निर्माण केलेल्या बाजारपेठेत येऊ पाहत आहे. (Santiago Consensus) हे विकसनशील व गरीब राष्ट्रांना मानवणारे नाही(Stiglitz,2006). त्यामुळे व्यवहाराचे गणित बिघडू शकते. म्हणूनच या बदललेल्या प्रवाहांचा व्यावहारिक आशय पडताळून नियोजन-नियमनाच्या कक्षेत कायदा, सुव्यवस्था आणि संस्थात्मक संरचना अधोरेखित करणे अगत्याचे झाले आहे.

पाणी ही लोकवस्तू असल्यामुळे त्यावरची मालकी आणि मक्तेदारी हक्क (Royalty) शासनाच्या मालकीचाच असला पाहिजे. पाण्याचे संवर्धन, संकलन, संरक्षण आणि सुरक्षा (गुणवत्ता) ही शासनालाच मिळालेली मक्तेदारी आहे. अलिकडे एकट्या शासनाच्या जबाबदारीमुळे वरील बाबी सुरक्षित राहत नाहीत; त्यामुळे त्यातला लोकसहभाग शासनानेच वाढविलेला आहे आणि त्यात कांही गैर नाही. कारण संवर्धन, संकलन, संरक्षण आणि सुरक्षा (गुणवत्ता) हे लोकांसाठीच आहेत. दुर्दैवाने पाण्याचा पुरवठा आणि मागणी यामध्ये फार मोठी तफावत जाणवायला लागली. त्यामुळे त्यातली संभाव्य भीषणता लक्षात आली म्हणून लोकसहभाग वाढविणे क्रमप्राप्त झाले. शेवटी पाण्याची मागणी त्याच्यामुळेच व्यक्त होते. खरे तर तेच पाण्याचे वास्तविक खरेदीदार आहेत.

पाण्याला असलेली मागणी वाढल्यामुळे पुरवठ्याला महत्त्व देणाऱ्या योजना पुढे आल्या. त्यामुळे पाण्याच्या पुरवठ्याचे व वितरणाचे व्यवस्थापन महत्त्वाचे बनले आहे. पाण्याचे प्रत्यक्ष उत्पादन होत नाही, पण पावसाद्वारे प्राप्त होणाऱ्या ह्या संपदेचे संवर्धन आणि संकलन हेच त्याचे उत्पादन आहे. त्याची उत्पादन केंद्रे/निसर्गात असंतुलित आहेत. उदा. कोकणात जास्त पाऊस पडतो आणि महाराष्ट्राच्या दुष्काळी तालुक्यात कमी

पाऊस पडतो त्यामुळे त्याच्या वितरणाला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. वितरण जेवढे अधिक खर्चिक तेवढे पाणी महागडे होते. वितरण व्यवस्था खरे तर जल-पणन व्यवस्थाच असते. कारण त्याची विक्री झाली तरच त्याच्या वितरणाचा खर्च वसूल करणे सुलभ होते. आता हा वितरण खर्च कोणी करावा, याबाबतीत सध्याच्या परिस्थितीत वाद होऊ शकतात. संकलन आणि संवर्धन उत्पादन स्वरूपाचे असल्यामुळे वितरणाची मालकीदेखील लोकवस्तूच्या स्वरूपात असावी असे वाटणे साहजिकच आहे. पण त्यासाठी अधिक खर्च करावा लागेल, त्यामुळे लोकांवर कराचा भार वाढवावा लागेल. हा सर्व लोक व्यवहार असल्यामुळे उत्पादन व वितरणात अकार्यक्षमता येणार हेही उघड आहे. पण ही अकार्यक्षमता लोकदबावाने कमी करता येते. त्यामुळे वितरण देखील लोक-प्रशासनाकडेच असणे अधिक उत्तम. त्याचे खाजगीकरण लोक-प्रशासनाला परवडणारे आणि मानवणारे नाही. अर्थात त्याला लोकांचा पाठिंबा आणि लोकांचा त्यावर विश्वास असेल तर खाजगीकरणाला संधी द्यायला हरकत नाही. कारण शासनप्रणीत लोक-प्रशासनमध्ये अनागोंदी, अकार्यक्षमता आणि अव्यवस्थेला अधिक वाव असतो. दोन्ही बाजूने सुलभ विचार-व्यवहार व्हावा हे उचित.


पाण्याची सुविधा पुरवणारी संस्था म्हणून शासनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण पुढे आला. याचे कारण पुरवठ्याचे व्यवस्थापन शासनप्रणित होते. खाजगी क्षेत्राचा शिरकाव हा अलीकडचा प्रयोग आहे. पाण्याचे वेगवेगळे स्त्रोत ओळखणे व त्यांचा विकास घडवून आणणे ही शासनाची आजपर्यंतची भूमिका होती. विविध स्त्रोताद्वारे आपल्याला किती पाणी उपलब्ध होऊ शकते. त्याचे नियोजन व व्यवस्थापन शासन करीत होते. आता त्यामध्ये किंमत यंत्रणेचा शिरकाव झाला आहे. त्यामुळे मागणी-प्रणीत दृष्टिकोण पुढे आला. सर्व लोकांना किमान पाणी या धोरणाऐवजी बाजारपेठेनुसार पाण्याची किंमत भरणाऱ्याला पाणी असे सूत्र जल-पणन व्यवस्थेत आले आहे.

या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, पाण्याचा पुरवठादार हा मक्तेदार आहे. पण त्याला मागणी करणारी व्यक्ती, गट, समाज मात्र असंख्य आहेत. शिवाय पाणी ही जीवनावश्यक वस्तू असल्यामुळे त्याला मक्तेदारीमूल्य प्राप्त होऊ शकते. हे न परवडणारे असल्यामुळे त्यावर (वितरणावर) लोकदबाव प्रस्थापित झाला पाहिजे. पडणारा पाऊस ही पाण्याची उत्पादन क्षमता मानल्यास आणि ह्या क्षमतेचा न्यून वापर होत असेल तर जल-पणन व्यवस्थेमध्ये अपूर्णता (Imperfection) आहे असे म्हणावे लागेल. (आकृती क्र. 1 पहा).

कोणत्याही बाजार व्यवस्थेत अपूर्णतः असल्यास ग्राहकांची पिळवणूक होणार हे निर्विवाद आहे. ग्राहक बाजार (buyers market) आणि विक्रेत्यांच्या बाजारामध्ये (Sellers market) वरील परिस्थिती पूर्ण स्पर्धेची (Perfection) असू शकत नाही. पावसाच्या पाण्याची विश्वासार्हता 50 टक्के अथवा 75 टक्के असे गृहित धरलेले असते. म्हणजे न्यून उत्पादन क्षमता प्रदर्शित होते. तात्पर्य, जलपणन व्यवस्थेत अपूर्णता आहे हे उघड आहे. ग्राहक बाजारात (buyers market) मात्र कांही

अंशी पूर्णत: (perfection) आढळून येते. पण तरीही पिळवणूक अपरिहार्य ठरते. अर्थात त्यातली पातळी (level) आणि पत (degree) मात्र भिन्न भिन्न राहते.

आकृती क्र. 1





पावसाने उपलब्ध होणारे पाणी भूगर्भामध्ये काही भूपृष्ठावर साठविता येते. भूगर्भातील पाणी साठा वेगवेगळ्या प्रकारच्या तंत्रांनी वाढविता येतो. पण त्याला कांही नैसर्गिक मर्यादा असू शकतात. भूपृष्ठावर मात्र तुलनेने अधिक साठा करता येतो. पण ह्या साठ्याची पणन (वितरण) व्यवस्था तितकीच प्रभावी असावी लागते. धरणे, कालवे, तळे, उपसासिंचन यासारख्या माध्यमाने पाण्याची साठवूणक करून त्याचा शेतीसाठी वापर होऊ शकतो. वरील साधनाने केला जाणारा पाण्याचा साठा (पुरवठा) हा जल पणन व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. ह्या साठ्याच्या वापरावर सार्वजनिक (लोक हक्क) मालकी असते. कारण पाणी ही लोकवस्तू, लोकप्रतिनिधींनी, लोक-प्रशासनाद्वारे एका विशिष्ट अभियांत्रिकी तंत्राने साठविलेली असते. साठवणुकीसाठी केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचा आणि देखभाल दुरूस्तीचा खर्च हा पाणी वापर संस्था, व्यक्ती, गट , उद्योगसंस्था ह्यांच्यावर दीर्घकालीन पाणी वापराचा विचार करून तिच्या वापराचे मूल्य निर्धारण करावे लागते. हे करताना पाण्याला प्राप्त होणाऱ्या मागणीचा (प्रकर्षितता आणि पत) विचार करावा लागतो. कारण मागणी हाच मूल्य निर्धारण करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे. अर्थात खुल्या बाजार व्यवस्थेचा विचार केल्यास पुरवठ्यातील वृध्दिबरोबर त्याचे उत्पादन मूल्य वाढते, कारण त्यावर तितका खर्च झालेला असतो. मागणीची प्रवृत्ती मात्र उलट असते. म्हणजे वाढत्या किंमतीबरोबर तिला असलेली मागणी नकारात्मक (घट) होते. त्यामुळे मूल्य निर्धारण नैसर्गिकरित्या व्यक्त होते. (आकृती क्र.2).

## पाण्याच्या मागणीचा विचार :

पाण्याची मागणी हा दुसरा महत्त्वाचा घटक आहे. पाण्यावर प्रत्येकाचा हक्क आहे, मालकी आहे असे म्हटल्यावर त्याला किंमत का द्यावी लागते? पाणी ही आर्थिक वस्तू असल्यामुळे तिची मागणी करणाऱ्याला किंमत द्यावीच लागते. शिवाय पाण्याचा हक्क (Water rights) हा बाजारपेठीय हक्क (Marketable rights) आहे. त्यामुळे त्याला मुलभूत हक्क म्हणता येणार नाही. तसेच या हक्काची व्यावहारिकता अधिक आहे. अर्थात पाणी वापराचा हक्क सर्वांना प्राप्त झाला पाहिजे. उपलब्ध पाणी साठ्याला (पुरवठ्याला) योग्य मागणी

**आकृती क्र.2**




(स्त्रोत व त्यांचा पुरवठा तसेच पाण्याची संस्थात्मक/व्यक्तीगत मागणी)

असावीच लागते. अन्यथ: प्राप्त पाणी साठ्यावर झालेल्या खर्चाची वसूली होऊ शकत नाही. निरा कालव्याच्या प्रारंभीच्या काळात असे घडले होते. म्हणून कामत समिती नेमून त्याची चौकशी केली होती. निरा खोऱ्यातील शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड केली तर पाण्याची मागणी वाढू शकते असा निष्कर्ष समितीने काढला होता. त्या अनुषंगाने माळीनगर साखर कारखाना अस्तित्वात आला, त्या कारखान्याने बराच मोठा पाण्याचा (साठ्याचा) वापर ऊस लागवडीसाठी केला होता.

पाण्याची मागणी अनेक पध्दतीने व्यक्त होते. शेती हा एक महत्वाचा ग्राहक आहे. पाणी साठ्याच्या 80-90 टक्के पाण्याचा वापर शेतीसाठी होतो. खरीप, रब्बी, नगदी पिकासाठी पाण्याची आवश्यक्ता असते. तसेच औद्योगिक विकासासाठी उद्योगधंद्यांना पाण्याची गरज असते. उद्योगधंदे हे दुसऱ्या क्रमांकाचे ग्राहक आहे. याशिवाय कारंजे,धबधबे, पर्यटन स्थळांच्या विकासासाठी पाण्याचा वापर होत असतो. पाणी हे मनोरंजनासाठीचे महत्त्वाचे साधन आहे. पाण्याच्या (साठ्याच्या) परिसराकडे लोकांचे मोठे आकर्षण असते. त्यामुळे हा तिसरा महत्त्वाचा ग्राहक आहे.

शेतीच्या सिंचन सुविधेसाठी पाणी वापर संस्थांची स्थापना करून पाण्याच्या वितरणाची व्यवस्था केलेली आहे. कालवे, धरणे, पाझर तलाव या सर्व प्रकारच्या पाण्याच्या वितरणाची व्यवस्था पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून केलेली आहे. (तक्ता क्र.1पहा). सुमारे अडीच लाख हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी 774 पा.वा. सं.(WUS) महाराष्ट्रात कार्यरत आहेत. याशिवाय खाजगी पंप, बोर, विहिरी, नदीवरील मोटारपंप, सहकारी सिंचन संस्था यांची संस्था अगणिक आहे. कृषि सिंचनासाठी उपलब्ध पाण्यापैकी उद्योग व मनोरंजनासाठी पाणी वापरण्याची प्रथा अस्तित्वात आहे.

**तक्ता क्र. 1**

**महाराष्ट्रातील पाणी वापर संस्था (जुलै 2005)**

| अ. नं. | विभाग | कार्यरत | | करार पूर्ण झालेल्या | | नोंदणीकृत पण करार प्रलंबित | | नियोजित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | सिंचनक्षेत्र | संस्था | क्षेत्र | संस्था | क्षेत्र | संस्था | क्षेत्र | संस्था | क्षेत्र |
| अ. मोठे माध्यम सिंचन प्रकल्प | | | | | | | | | | | |
| 1 | कोकण | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 600 | 12 | 4680 | 16 | 5280 |
| 2 | नागपूर | 36 | 12790 | 64 | 24990 | 176 | 80033 | 501 | 258176 | 777 | 375989 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | अमरावती | 112 | 29735 | 69 | 20753 | 177 | 48421 | 411 | 186210 | 769 | 285119 |
| 4 | उत्तर महाराष्ट्र | 176 | 61009 | 140 | 40602 | 158 | 52929 | 66 | 15579 | 540 | 174119 |
| 5 | पुणे | 234 | 60077 | 20 | 6638 | 204 | 54934 | 305 | 107763 | 763 | 229412 |
| 6 | मराठवाडा | 106 | 46415 | 52 | 20745 | 251 | 126367 | 58 | 34285 | 463 | 227812 |
| | एकूण | 664 | 210026 | 345 | 113828 | 970 | 363284 | 1353 | 610693 | 3332 | 1293731 |
| ब. | लघुसिंचन प्रकल्प | | | | | | | | | | |
| 1 | कोकण | 8 | 958 | 5 | 604 | 14 | 2263 | 47 | 8203 | 74 | 12028 |
| 2 | नागपूर | 1 | 165 | 25 | 14972 | 25 | 8274 | 53 | 19856 | 104 | 43267 |
| 3 | अमरावती | 66 | 21626 | 17 | 5795 | 125 | 38894 | 158 | 587558 | 366 | 124073 |
| 4 | उत्तर महाराष्ट्र | 14 | 5483 | 2 | 670 | 37 | 11157 | 7 | 1881 | 60 | 19191 |
| 5 | पुणे | 2 | 177 | 0 | 0 | 4 | 1268 | 19 | 3124 | 25 | 4569 |
| 6 | मराठवाडा | 19 | 12086 | 32 | 16167 | 26 | 9270 | 13 | 2433 | 90 | 39956 |
| | एकूण | 110 | 40495 | 81 | 38208 | 231 | 70126 | 297 | 94255 | 719 | 243084 |
| | एकूण अ+ब | 774 | 250521 | 426 | 151936 | 1201 | 433410 | 1650 | 704948 | 4051 | 1540815 |

कल्याणकारी आर्थिक व्यवस्थेच्या दृष्टिने पाण्याच्या पुरवठ्याचा आणि मागणीच्या जल-पणन मूल्यांचा विचार केल्यास मूल्य हे जरी अंतिम फलित असले तरी मागणी पुरवठ्यांच्या विविध घटकांचा विचार महत्त्वाचा ठरतो. पुरवठ्यापेक्षा मूल्यनिर्धारण प्रक्रियेमध्ये पाण्याच्या मागणीचा विचार ही महत्त्वाची बाजू आहे. कारण स्पर्धा, बाह्य घटक, वितरण प्रक्रिया, अंतिम फलनिष्पत्ती या बाबींचा विचार केल्यास पाण्याच्या मागणीवर प्रभाव टाकणारे बरेच घटक आहेत.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे जल-पणन व्यवस्थेत कार्यरत असे अनेक घटक (उदा. विहिरवाले, धरणवाले, तळेवाले, इ.) आढळून येतात. नदीच्या प्रवाहातून वाहणाऱ्या पाण्याला मागणी करणारे असंख्य घटक असून, त्याची मध्यस्थ संस्था व गटदेखील कार्यरत आहेत. पुरवठादारांनी कांही गुंतवणूक केल्यामुळे (धरण, कालवे, उपसा) त्यावर गुंतवणुकदारांची मालकी निर्माण होते. याला सीमांत खाजगी खर्च (MPC) म्हणता येईल. त्यामुळे त्यांनी केलेल्या गुंतवणुकीच्या खर्चात वसुलीचा प्रश्न उद्भवतो. याला खाजगी खर्च असेही संबोधता येईल. पण यामध्ये सरकारी गुंतवणूक असेल तर मात्र पाणी ही लोकवस्तू असूनसुध्दा ती आर्थिक वस्तू (Economic good

बनते. कारण पाण्याच्या पुरवठा-वितरणाच्या यंत्रणेमुळे मूळ गुंतवणूक व तिची देखभाल दुरूस्ती, तसेच प्रशासकिय यंत्रणेवरचा खर्च इ. गोष्टीसाठी आर्थिक वसुली क्रमप्राप्त ठरते. भारत सरकारच्या 2002 च्या धोरणानुसार पाणी ही आर्थिक वस्तू आहे आणि तिच्या पुरवठ्यापेक्षा तिला असलेल्या मागणीचा दृष्टिकोण सामाजिक व आर्थिकदृष्ट्या महत्वाचा आहे. सरकार फक्त सुविधा (facilitator) देणारा एक घटक आहे. सेवा देणारा (Service Provider) नव्हे. तसेच सरकारने निर्माण केलेल्या गुंतवणुकीवरची देखभाल दुरूस्ती व चालू खर्चाची जबाबदारी पाणी वापरणाऱ्यांची असेल असे 2002 च्या धोरणात स्पष्ट म्हटले आहे.

पाण्याचे पुरवठादार जर जल-पणन व्यवस्थेच्या लांब अंतरावर असतील तर पाण्याची वाहतूक (Converyance system) अथवा कालव्यावर खर्च ( उर्जा, श्रम, अवजारे इ. ) होणारच. ह्या खर्चाला सीमांत सुविधा खर्च (MCC) संबोधता येईल. पाण्याच्या या दिशा बदल (diversion of water) प्रवृत्तीमुळे पर्यावरणावर विपरित परिणाम होतो. तसेच पाण्याच्या प्रत्यक्ष वापरामुळे वापरदाराला लाभ होतो, पुरवठादाराला नाही. ह्या ऋणात्मक लाभाला बाह्य लाभ संबोधले जाते. तसेच पाणी पुरवठादारांच्या ह्या कृतीमुळे (कालवे, विहीर व पाण्याचे वितरण) तिसऱ्यांचा लाभ होत असतो. उदा. पिकांना पाणी दिल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते. यामुळे पर्यावरणीय लाभ होतो. याउलट तळे, विहीर, धरण या स्वरूपातील पाणी साठ्याचा उपसा झाल्यामुळे मासे, झिंगे, कोळंबीसारखे जलचर नष्ट झाले तर हा पर्यावरणाचा तोटा असतो (MEC).

**पणन व पणन मूल्य व्यवस्था :**

सिंचन दराची निश्चिती सर्वसाधारणपणे खालील सात पध्दतीने होते.

1. घनमापन पध्दती - अ) प्रवाहावर आधारित व ब) किमान पुरवठा तत्त्वावर, 2) निविष्टी दर निर्धारण (आदान पध्दती), 3) उद्दिष्टी दर निर्धारण (प्रदान पध्दती), 4) क्षेत्रीय दर निर्धारण, 5) मागणी पुरवठ्याच्या तत्त्वावर आधारित स्तरिय दर निर्धारण, 6) दुपाखी प्रशुल्क पध्दती, 7) सुधार पट्टी पध्दती.

तथापि, सध्या दोन पध्दतींचा अवलंब सोयीस्कररित्या केला जातो. 1) घनमापन व 2) क्षेत्रीय दर निश्चिती. कालवा व उपसा पध्दतीने जलस्त्रोताचा वापर करतांना या दोन पध्दती सुलभ आहेत. कालव्याचा दर उपसा पध्दतीने होणाऱ्या जलवापरापेक्षा स्वस्त असू शकतो. कारण कालव्यामुळे उपस्शावरचा खर्च वाचतो.

घनमापन पध्दतीने प्रती 1000 घन मीटरप्रमाणे पाणी मोजून देता येते. त्यासाठी मीटर पध्दतीचा वापर करावा लागेल. मीटर पध्दती दोन प्रकारची आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतावर पाण्याची मोजणी करणे अथवा एकंदर पाण्याच्या पाणी वापराचा आकार (volume) लक्षात घेऊन लाभार्थी क्षेत्रावर पाणी विभागून देणे, अथवा सरसकट पाणी आकारणी होऊ शकते. शेतकऱ्यांनी किती क्षेत्र भिजविले, कोणती पिके घेतली याचा विचार इथे नसतो.

क्षेत्रीय पध्दतीने पाणी दराची निश्चिती करताना पीक क्षेत्र, शेतीचा आकार, हंगाम इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन दर निश्चिती होत. ही बाब किचकट असली तरी अधिक व्यावहारिक आहे. काही विशिष्ट पध्दतीने मोजता येते. उपसा सिंचन

संस्था या पध्दतीने दर आकारणी करतात.

अर्थशास्त्रीय सिध्दांतानुसार सरासरी खर्च व सीमांत खर्च ज्या दराला समान असतात तो दर निश्चित केला जातो. सरासरी खर्च म्हणजे एका एकरासाठी येणाऱ्या स्थिर व बदलत्या खर्चाची बेरीज होय. सीमांत खर्च म्हणजे एक एकक जादा पाण्याचा पुरवठा केल्यामुळे एकूण खर्चात होणारी निव्वळ वाढ होय. पाण्याचा दर सीमांत खर्चावर निर्धारित केला जावा असे सुचविले जाते. परंतु सुरूवातीच्या उत्पादन प्रमाणात सीमांत खर्च हा सरासरी खर्चापेक्षा कमी असतो, आणि नंतरच्या उत्पादन प्रमाणात सीमांत खर्च सरासरी खर्चापेक्षा अधिक होतो. त्यामुळे सीमांत खर्चावर दरनिर्धारण करण्याची पध्दती म्हणावी तितकी योग्य वाटत नाही, त्यामुळे घनमापन पध्दती अधिक व्यावहारिक आहे. मात्र या पध्दतीने दर निर्धारित करतांना लहान, मध्यम व मोठ्या प्रकल्पावरील समुच्चित सर्व उत्पादन प्रमाण लक्षात घेऊन दर निश्चित करणे अधिक चांगले आहे.

सामाजिक न्याय तत्त्वाने पाणी दर आकारतांना सीमांत, अल्प भूधारक व मोठे शेतकरी यांच्यासाठी वेगवेगळ्या दराने पाणी दर आकारता येतो. या पध्दतीमुळे दर देय क्षमता लक्षात घेऊन दर निश्चिती होते. तसेच प्रो-रेटा पध्दतीने दोन तीन टप्प्यात पाणी दराची विभागणी करून दर आकारता येतो.

कसबेकर समितीच्या शिफारशीनुसार पाणलोट क्षेत्राच्या टप्प्यातील विहिरींच्या पाण्याला पीकनिहाय सुधारपट्टी (पिकांच्या उत्पादन वाढीवर आधारित) आकारणे आवश्यक आहे. कांही तज्ञांच्या मते संधी खर्चावर आधारित किंमत देय क्षमता असलेल्या शेतीसाठी/पिकासाठी घेणे परवडणारे असले तरी बाजारपेठा, हवामान यासारख्या गोष्टी अनानुकूल असल्यास शेतीकडे बघण्याची दृष्टी बिघडते. शिवाय संधी खर्चाची संकल्पना अनेक गोष्टीवर अवलंबून आहे. उदा. हंगाम, स्थानिक स्थिती, पाण्याची निश्चितता, उपयोगिता व गुणवत्ता इत्यादी.

पाण्याच्या संकलनाचा व वितरणाचा खर्च आणि पाण्याची उपलब्धता याचे एक किफायतशीर सीमांतकिय (Marginal) गणित (X) जमावे लागते. सीमांत खाजगी खर्च (पंपिंगचा खर्च अथवा संधी खर्च), सुविधा खर्च (कालव्यावरचा खर्च उदा. उर्जा साधने व श्रम इ.) पर्यावरणीय नुकसानीचा पर्यावरणीय खर्च, पाणी वापर खर्च (user cost) म्हणजे कमी उत्पादकता, क्षार व चोपन जमीन सुधारणांवर होणाऱ्या खर्चावर निर्धारित होणारा आणि बदलता खर्च गृहित धरून पाण्याचे मूल्य ($P_A$) निर्धारित होते. (Zilberman & Schdengold, 2005)

$$P_A = (MPC(X_A) + MCC(X_A) + MEC(X_A) + MFC(X_A) \quad .............1$$

MCC= पाण्याचा सीमांतकीय खाजगी व्यय (Marginal Private cost)

MEC= पाण्याचा सीमांतकीय सुविधा व्यय (Marginal Conveyance Cost)

MFC= पाण्याचा पर्यावरणीय व्यय (Marginal Environmental Cost)

MPC = पाण्याचा भविष्यातील वापर व्यय (Marginal Future Cost(User cost)

ज्यावेळी पाण्याची उपलब्धता करून देणारे (Water Providers) घटक अनेक असतात,

त्यावेळी भविष्यकाळाचा कमी विचार होतो किंवा होत नाही, अथवा ते (Water Providers) बाह्य खर्चाचा विचार करीत नाहीत. पण MPC + MCC मात्र अंगिकारावा लागतो. अशावेळी खालील सुत्राने पाण्याची किंमत ठरते.


$P_B$= MPC($X_B$) + MCC ($X_B$) .............2

प्रकल्प खर्च आणि सुविधा (देखभाल दुरूस्ती) खर्चावर जल-मूल्य निर्धारित होते. यातील सीमांतकिय संकल्पना व्यापक आहे. प्रकल्प व्यय शासनाचा अथवा खाजगी संस्थांचा असू शकतो. तसेच सुविधा व्यय देखील दोन्हीपैकी एकाचा असू शकतो. त्यातल्या सीमांतकीय गणितांचा भाग हा अर्थशास्त्रीय निकषावर निर्धारित होतो.

वरील दोन्ही सूत्राने ज्यावेळी जल-पणन व्यवस्थेत किंमत ठरते त्यावेळी स्पर्धायुक्त खरेदीदार व विक्रीदारांची बाजारपेठ निर्माण होते. अशा वेळी सरकारी हस्तक्षेप होत असतो. त्यामुळे पाण्याच्या विक्रेत्यांना (Sellers) बाह्य खर्चाचा आणि भविष्यकालीन खर्चाचा विचार करावा लागतो विशेषत: MEC($X_A$) + MFC ($X_A$) च्या खर्चाइतका जादा कर आकारणी करावी लागते. अथवा जल व्यापारावर $X_A$ च्या मर्यादित बंधने घालावी लागतात. पाण्याची उपलब्धता फार मोठी असेल तर दोन्ही बाजू वेगवेगळ्या राहतात.

पाणी वापरणाऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक लाभ होतोच. हा लाभ किंवा मागणी आकृतीत MB वक्राने दर्शविले आहे. हा लाभ पाण्याच्या उपलब्धतेवर निर्धारित होतो. आणि सर्व प्रकारचे खर्च (A) मिळून सामाजिक पर्याप्त समतोल प्रस्थापित होतो. (Just et. al. 1982) म्हणजे पर्याप्त किंमत ($P_A$) मूल्य आणि पर्याप्त जलप्रणाली ($X_A$) द्वारा संपादित होणारी स्थिती सूत्र क्र. १ ने दर्शविली आहे.

आकृती क्र. ३ पहा





पाण्याचा सुविधा खर्च हा पाण्याची वहनव्यवस्था (transport cost)आणि पाण्याच्या उपस्यासाठीचा खर्च यांचा संयुक्त खर्च असतो. उदा. म्हैसाळ प्रकल्पातून पाण्याचा उपसा करण्यासाठी ताशी रू.74,000/- चे वीज बिल भरावे लागते. उपसा केलेले पाणी प्रत्यक्ष (शेतकरी) अप्रत्यक्ष (भूगर्भातील पाणी साठा) लाभ मिळून देते. अप्रत्यक्ष लाभार्थीकडून पाण्याची किंमत वसुल करणे क्रमप्राप्त ठरते. पाण्याच्या वहनातील घट लक्षात घेऊन लाभार्थीकडून ती वसूल करता येते. स्थिर खर्चाची वसुली ऋणात्मक होत असली तरी त्याचीही वसूली वेगवेगळ्या पध्दतीने करावी लागते. धरणाच्या आयुष्यातील लाभाची सध्याची किंमत ही प्रत्यक्ष धरणावर होणाऱ्या सध्याच्या स्थिर व बदलत्या खर्चापेक्षा अधिक असावी लागते. तथापि स्थिर खर्चाची वसूली कमी व जादा पाण्याच्या उपलब्धतेवर निर्धारित होते.

जलपणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे व्यापारी पध्दतीने मूल्य निर्धारित करण्याची प्रक्रिया अनियमित असते. पण पाण्याचे वितरण (पाळ्या) नेहमी बदलत असतात. वाराबंदी,

शेवटचा पहिल्यांदा (Tale end to first), अथवा पहिल्यांदा ते शेवटचा (First to tale end), एकरी तासिका तत्वावर पाणी पुरविणे अथवा फड पध्दती अशा स्वरूपाच्या ऐतिहासिक पध्दती भारतात अस्तित्वात आहेत. यामुळे वितरणातील न्याय प्रस्थापित होतो. (आकृती क्र.४पहा). जलस्त्रोतानुसार जल पुरवठा जसा भिन्न भिन्न राहतो तसाच तो भिन्न भिन्न सीमांतकीय (गणितीय (X)) पध्दतीने निर्धारित होतो. त्यातील वृध्दि (incremental) मूल्य हंगामानुसार बदलणे साहजिक आहे, म्हणजे खरीपातील हंगामात जलस्त्रोताचे महत्त्व कमी राहते. रब्बीमध्ये ते वाढते कारण जल पुरवठा मर्यादित आणि खर्चिक असतो.

आकृती क्र.४




सीमांत खर्च अधिक असेल आणि पाण्यासाठीची मागणी लवचिक असेल तर जलमूल्यही अधिक असते आणि पाण्याची उपलब्धतादेखील अधिक असते. पण सरासरी खर्चाप्रमाणे मूल्य निर्धारित झाल्यास मागणी कमी राहून कमी किंमतीला पाणी उपलब्ध होऊ शकते. (आकृती क्र. 4 पहा) $X_B$ - $X_A$ इतक्या पाण्याला $P_A$ - $P_B$ इतकी किंमत मिळते. मागणीवर आधारित पाण्याची किंमत निर्धारित करणे अवघड असते. इतर वस्तुंच्याप्रमाणे पाण्याची किंमत ठरू शकत नाही आणि केलेल्या खर्चाची वसुलीदेखील होऊ शकत नाही. म्हणून जल-व्यापार हा मागणीवर निर्भर होतो. वेगवेगळ्या कारणासाठी मागणीची वेगवेगळी पातळी निर्माण होत असते आणि त्या प्रमाणात जल-मूल्य निर्धारित होते. नागरी भागातील मागणी पुरवठ्याच्या (दर) रचनेमध्ये पाण्याची गुणवत्ता आणि पुरवठ्याची शाश्वती हे महत्त्वाचे दोन घटक इतर घटकांबरोबर समाविष्ट होतात आणि त्यामुळे नागरी भागातील पाणी शेती-उद्योगाच्या तुलनेने महागडे असते. $X_A$ अथवा $X_B$ मधील बदलापेक्षा $P_A$ अथवा $P_B$ तील बदल क्लिष्ट आहेत. कारण पिकनिहाय (नगदी पिके, भरड धान्य पिके, चारा पिके अथवा अन्नधान्य पिके (कडधान्ये व तृणधान्ये, इ.) तेलबिया, फळे, भाजीपाला, इ.) जलस्त्रोत निहाय, माती व हवामान निहाय, हंगामनिहाय व मागणीतील लवचिकतेनुसार $P_A$ - $P_B$ बदलत राहतात. विशेषत: $P_A$ तील बदल वरील बाबींवर निर्धारित होत असतो. $D_1$ची स्थिती रब्बी हंगामातील असू शकते; तर $D_2$ ची स्थिती खरीप हंगामातील असू शकते.

शेतीमध्येदेखील नगदी-पिकांसाठीच्या पाणी दरामध्ये वाढ केली तरी फारसा परिणाम होत नाही. पण इतर भरड धान्याच्या लागवडीसाठी नगदी पिकांच्या तुलनेने दर आकारणी होऊ शकत नाही. शेतीसाठीचे जलपणन आणि त्याचे जलमूल्य हे विविधांगी राहते. सरसकट घन पध्दतीने (Volunmetric) उद्योगासाठीच्या पाणी दराची निश्चिती होते.

पाण्याचा पुरवठादार (शासन अथवा

निमशासकीय संस्था अथवा खाजगी संस्था) हा एक प्रकारचा मक्तेदार असल्यामुळे वेगवेगळ्या पणन व्यवस्थेसाठी विभिन्न जलमूल्य आकारण्याची पध्दती रूढ आहे. नागरिकांना पाण्याचे हक्क दिल्यानंतर जलपणन व्यवस्था पूर्णत: बदलून जाते. पाण्याचा पुरवठादार म्हणजे पाण्याचे हक्क लाभलेला नागरिक आणि विविध कारणांसाठी पाणी वापरणाऱ्या सर्व घटकांची मागणी यांचे पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीसारखे जल मूल्य निर्धारण होते. स्पर्धेच्या पायावर हे निर्धारण होत असल्यामुळे ते सर्वांनाच फायदेशीर ठरते. पण त्याची व्यावहारिक बाजू फार किचकट आहे. सहकारी उपसा सिंचन संस्थांची किंमत वेगवेगळी असते. ती व्यवस्था एक प्रकारची अक्रिय अथवा क्रियाशून्य पणन व्यवस्था (Passive market) असते. अशा पणन व्यवस्थेमध्ये मुख्य संस्था आपल्या लोकांसाठी/भागसाठी जलमूल्य निश्चित करते. पण अशा संस्थांना जल महत्त्व कळत नाही. त्यांच्या खर्चाची वसुली हेच सूत्र त्यांना माहित असते. कारण शेतकऱ्यांना कुठल्याही परिस्थितीत शेतीसाठी पाणी आवश्यक असते. म्हणजे पुरवठादारांना मागणीची हमी मिळतेच त्यामुळे शेतकरी किंमत स्वीकारणारा बनतो. क्रियाशून्यतेचा (Passive)आणखी एक तोटा विशेषत: महाराष्ट्राच्या ऊस क्षेत्रामध्ये प्रकर्षाने जाणवतो तो म्हणजे क्षारपीडित जमिनीचा प्रश्न. पाण्याचे महत्त्व न कळल्यामुळे ऊस शेतीला वाटेल तसे पाणी वापरून पूर्ण पिकाऊ जमीनच कालांतराने नापिक बनते. अशा परिस्थितीत प्रत्येकाला जल हक्क(Water right)दिल्यास उपलब्ध पाण्याचा योग्य वापर होईल असे काही कार्यकर्त्यांचे मत आहे. शिवाय त्यामुळे पर्यावरणीय संतुलन प्रस्थापित होईल.

## पूर्ण व्यय वसुली -

पाण्याच्या वापराचा हक्क अथवा अधिकार हा कल्याणकारी राज्यसंस्थेचा कळीचा विषय आहे. अर्थव्यवस्थेत काही लोकच उत्पादन करतात पण उपभोग मात्र सर्व लोक घेत असतात. या बाजारपेठच्या नियमाप्रमाणे वितरणातील न्याय प्रस्थापित करणे गरजेचे आहे. एखाद्या विशिष्ट परिसरातील पाण्याच्या पुरवठ्याचे नियोजन मागणीच्या विविध तत्त्वाप्रमाणे करावे. हे करत असताना गुंतवणुकीचा देखभाल दुरूस्तीचा संपूर्ण व्यय लाभार्थीकडून केला पाहिजे. बीज भांडवलाचा गुंतवणुकीचा परतावा राज्य संस्थेला विविध माध्यमातून मिळतो. त्यामुळे त्याला वसुलीची बाब महत्त्वाची नाही. इ.स.1936 आणि 1953 साली डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांनी असे म्हटले होते की, धरणे बांधून लाभार्थींच्या ताब्यात द्या, लाभार्थ्यांनी ते आपल्या जबाबदारीवर पाण्याचे नियोजन व वितरण करावे. दुर्दैवाने असे घडले नाही. राज्यसंस्था पाणी प्रकल्पासाठी आपली सत्ता सोडायला तयार नाही. WUA च्या माध्यमाने वितरणाची जबाबदारी आता कुठे लाभार्थींना प्राप्त होत आहे. पण हे अस्तित्वात आणण्यासाठी 50-60 वर्षे गेली.

पाण्यापासून वंचित लोक-समुहाचा वेगळा विचार करावा लागेल. सामाजिकदृष्ट्या हा वर्ग पाण्याच्या हक्काच्या (धरण क्षेत्रावरील) कक्षेत येत नसला तरी त्याला पाणी वापराचा अधिकार आहेच. सामाजिक न्याय तत्त्वाने राज्यसंस्थेने आपल्या कुवतीप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये या लोकांसाठीचा पाणी विकासाचा विचार केला पाहिजे. खाजगी क्षेत्राकडे बोट दाखवून चालणार नाही. पण

खाजगी क्षेत्राने यांत भाग घेऊ नये असे मात्र नाही त्यांनाही स्वातंत्र्य दिले पाहिजे. खाजगी क्षेत्राला मोठ्या रकमेच्या खर्चाची सुरक्षा हमी लागते. ती राज्य संस्थेने द्यावी. म्हणजे त्यांच्याकडून होणारी गुंतवणूक निर्वेध असू शकते. त्याचा अप्रत्यक्ष लाभ राज्यसंस्थेस होतच असतो.

पाण्याचा वास्तविक व्यापार (Virtual water trading) हा एक या क्षेत्रातला संशोधनाचा विषय आहे. गुणकारी अथवा वास्तविक जल (Virtual water) साठी हा सर्व स्त्रोतांनी म्हणजे पिकातील जलसाठादेखील गृहित धरून तयार होणारा जलसाठा असतो (Virtual water) साठी हा सर्व स्त्रोतांनी म्हणजे पिकातील जलसाठादेखील गृहित धरून तयार होणारा जलसाठा असतो [Hemdam (Egyptian geographer), Tony Allen (Kings College, London] एखाद्या देशाने आपल्या शेतमालाची निर्यात केली म्हणजे तो माल पिकविण्यासाठी वापरलेल्या सर्व पाण्याची निर्यात केली असा वास्तविक (Virtual) अर्थ होतो आणि आयात करणारा देश तेवढ्या पाण्याची बचत करतो असा त्याचा सहजसोपा अर्थ आहे. त्यामुळे दुष्काळी भागासाठी आयात केला जाणारा कृषी माल (उदा. साखर -एक किलो साखर तयार करण्यासाठी 15 लि. पाणी लागते.) अधिक पाणी खाणारा असला म्हणजे दुष्काळी भागाला पाणी पुरवठा केल्यासारखे होईल. पाण्याच्या ह्या पध्दतीच्या वास्तविक व्यापारामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन होईल आणि त्याचा कार्यक्षम वापर होईल; याला पाण्याचा वास्तविक व्यापार असे संबोधले जाते. याच्या शोधकर्त्याला नोबल पारितोषिकाच्या तुलनेचा पुरस्कार मिळाला आहे.

महाराष्ट्रात काही खाजगी शेतकरी एकत्र येऊन स्वत:च्या खर्चाने आणि देखभालीने दरएकरी पाच तास- सहा तास (उपशावर आधारित) पाणी वितरित करण्याच्या पध्दती अवलंबिल्या आहेत. ह्याच धर्तीवर नागरी अथवा ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली असते. अशा अनेक सामुहिक जलपणन व्यवस्था जगभर अस्तित्वात आहेत. व्यक्तिगत हक्कापेक्षा सामूहिक हक्क (Collective rights) केव्हाही चांगला ठरतो. पण अलीकडे सहकारातील अपप्रवृत्तीमुळे सामुहिक कृषिक्षेत्र बदनाम झाले आहे. अर्थात हे आता सिध्द झाले आहे. (Jugale, 2007)

छत्तीसगड सरकारने शेओनाथ (Sheonath) खोऱ्यापैकी दुर्ग जिल्ह्यातील 23.6 कि.मी. नदीच एका खाजगी कंपनीला (Redius water Ltd.,) भाडेपट्टीने (BOOT - Build,Own,Operate and Transfer)22 वर्षाच्या कराराने दिली आहे. या कंपनीने फक्त औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याचे कंत्राट घेतले आहे.

पाझर तलावाच्या खालच्या भागातील (down stream) शेतकऱ्यांना राइपेरियन राईटस (Riparian right) प्राप्त होतात. हे हक्क प्राप्त करून घेण्यासाठी विहिरीच्या व्यासाइतकी जमीन लाखो रूपयांला खरेदी करून तेथील पाणी लांब पल्ल्यावरच्या द्राक्ष बागेला घेऊन जाणारे भांडवलदार -शेतकरी पाझर तलावाच्या परिसरात दिसतात. काही मर्यादित काळासाठी संरक्षित सिंचन सुविधेचा लाभ मिळतो. शिवाय तळ्याच्या भू-स्तरावरील पाणी संपल्यानंतर त्यावर शेती करता येते.

**उपसंहार :**

ह्या पार्श्वभूमीवर सध्याची जल व्यवस्थापन पध्दती पूर्णत: बदलून ती समाजाच्या मालकीचीच

करणे अधिक हिताचे असते. व्यक्तिगत हक्कापेक्षा (individual rights) सामुहिक हक्क (Community rights) अदा करणे अधिक संयुक्तिक आहे. सध्याची प्रशासकीय सिंचन व्यवस्था बदलण्यासाठी आवश्यक त्या कायद्यांची, धोरणांची आणि त्याच्या अंमलबजावणीची गरज आहे. जलपणन व्यवस्थेवर संशोधन करणाऱ्यांना यासारख्या बाबींचा समग्र अभ्यास करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**संदर्भ सूची :**


GOI (2005) Water Policy

GOM (2005) Maharashtra State Water Policy

Jugale V.B. (2005) - सहकाराची- पर्याप्तता, पर्यायता आणि सहकाराची पुनर्रचना, अर्थसंवाद (सहकार विशेषांक)

Just et al (1982)- Applied Welfare Economics & Public Policy XXXXX

Murthy Shrikant P.S.- Virtual Water Trade : A Researchable Issue -

Pssrikanthamurth@yahoo.com

Zilberman David & Schoengold Karina - The Use of Pricing and Market for water Allocation, Canadian Water Resource Journal, Vol30(1):47-54,2005

# जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात....

**पी.एन.जोशी**
माजी चेअरमन-युनायटेड वेस्टर्न बँक
भ्रमणध्वनी -9923009932

अमेरिकेतील सब प्राईम घरकर्ज घोटाळा अजस्त्रपणे वाढत जगातील सर्व शेअरबाजार व आर्थिक संस्थांना वेढून जागतिक मंदीकडे वाटचाल करीत आहे. दिग्गज गुंतवणुक बँका (investment banks) पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळत आहेत. अमेरिकन सरकार व फेडरल रिझर्व्ह बँकेचे सर्व प्रयत्न तोकडे पडत आहेत. युरोपमधील बँका आणि वित्तसंस्था धोक्याच्या गर्तेत गिरक्या खात आहेत. चीन, जपान व रशियामधील आर्थिक अस्वस्थता बोचक झाली आहे. सर्व शेअरबाजार गडगडत आहेत. भारतामध्ये मुंबई सेन्सेक्स 21272 (10 जानेवारी 2008) वरून घसरून 9092 वर (28 नोव्हेंबर 2008) आला आहे. 2007 मध्ये सेन्सेक्स 10000 वरून एका वर्षात 20000 वर गेल्यामुळे 2008 च्या काही दिवसात 30000 चा टप्पा ओलांडण्याचे स्वप्न पहात असलेल्या गुंतवणूकदारांना प्रचंड धक्का बसला आहे. या उलथापालथीचे मूळ "सबप्राईम " मध्ये आहे.

**सब प्राईम :**

बँका कर्ज देताना कर्जदाराची पत ठरवत असतात. हे काम आपल्याकडे बँकाच करतात. अमेरिकेत क्रेडिट रेटिंग एजन्सी असतात. या रेटिंग करणाऱ्या कंपन्या त्या व्यक्तीचा तपशील, नोकरीचे ठिकाण, पगार, इतर भत्ते, सुविधा, कुटुंबाबद्दल माहिती, सवयी, सामाजिक सुरक्षा कार्ड, वाहन परवाना, कर्जाचे हप्ते भरण्याबद्दलचे विचार, क्रेडिट कार्ड वगैरे संपूर्ण माहिती घेऊन त्याचे क्रेडिट स्कोअर ठरविते. जास्त स्कोअर असल्यास व्याजदार कमी असते. साधारणपणे स्कोअरचे चार विभाग केले जातात. 1. उत्तम 2.चांगला 3.साधारण 4 कनिष्ठवरील 1 व 2 मधील व्यक्ती कर्ज घेण्यास पात्र मानल्या जातात. त्यांना प्राईम बारोअर म्हणतात. 3 व 4 मधील व्यक्ती अपात्र. त्यांना सबप्राईम म्हणतात आणि त्यांना सहसा बँका कर्ज देत नाहीत.

परंतु 1 नंतर जमिनीच्या (रियल इस्टेट) किंमती झपाट्याने वाढू

लागल्या. बँकांना भरपूर फायदा मिळविण्याची हाव सुटली. घरकर्ज व कारलोन ही अमेरिकन रिटेल बँकिंगचे आत्मा आहेत. 2008 मध्ये दिलेले घरकर्ज पाच ट्रिलियन डॉलर इतके होते. आपल्या देशाचे उत्पन्न केवळ एक ट्रिलियन डॉलर आहे आणि अमेरिकन बँकाचे फक्त घरकर्ज आपल्या देशाच्या उत्पन्नाच्या पाचपट आहे. रियल इस्टेटच्या किंमती वाढतच राहणार असे वातावरण झाल्यामुळे अमेरिकन बँका गिन्हाईकांना पकडून घरकर्ज देऊन लागल्या. कर्ज दिल्यावर ते बँकाकडून विकत घेऊन सेक्युरिटाईज करून मार्केटमध्ये विकण्यास फॅनी मे व फ्रेडी मॅक, वॉशिंग्टन म्युच्युअल, लेहमन ब्रदर्स अशा मोठ्या गुंतवणूक बँका तत्पर असल्यामुळे व्यापारी बँकाना ताबडतोब पैसे मिळून नवीन कर्ज देण्यास मुभा होती. त्यामुळे भरघोस घरकर्ज वाढविण्याचा सपाटा बँकांनी लावला.

**अमेरिका बँकांना झळ :**

एखादी बँक 100 कोटी डॉलर कर्ज दिल्यास ताबडतोब ते 'फॅनी मे' किंवा 'फेड्डी मॅक' अशा गुंतवणूक बँका सेक्युरिटायझेशनसाठी विकत घेतात. बँकेला 100 कोटी डॉलर मिळतात. बँक ते पैसे परत कर्ज देण्यास वापरते. पुन्हा तोच प्रकार. यामुळे कर्जातून कर्ज देण्यास पैसा उपलब्ध होतो. आपल्या देशात कर्ज देण्यासाठी बँकांना ठेवी गोळा कराव्या लागतात. भारतात व एकूण पौर्वात्य देशात बचतीचे प्रमाण जास्त आहे. उदाहरणार्थ 1990-99 या दशकांत सरासरी बचतीचे देशाच्या उत्पन्नाशी प्रमाण सिंगापूर 47.6 टक्के, मलेशिया 40.6 टक्के, हाँगकाँग 32.3 टक्के, चीन 40.7 टक्के, कोरिया 35.4 टक्के, भारत 23.5 टक्के व इंडोनेशिया 30.6 टक्के असे होते. 2006 मध्ये भारताचे बचतीचे प्रमाण 35 टक्के होते. त्यामुळे ठेवी सहजपणे मिळतात. अमेरिकन नागरिक कर्जावर जगतो. बचतीचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे बँकांना कर्ज देण्यास पैसा उभा करण्याच्या अनेक क्लुप्त्या मार्केट ऑपरेटर्सनी शोधून काढलेल्या आहेत. सेक्युरिटायझेशनमध्ये गुंतवणूक बँक व्यापारी बँकेकडून 100 कोटीचे घरकर्ज विकत घेतल्यावर त्याचे 1 कोटी रुपये, पाच कोटी रूपये, 10 कोटी रूपये असे बॉण्डस तयार करते व त्याच्यावर बँक ठेवीपेक्षा जास्त व्याजदर ठेवून गुंतवणुकदारांना विकते. पेन्शन फंडस, हेज फंडस, अन्य व्यक्ती, संस्था या बॉण्डसमध्ये पैसे गुंतवून बँक ठेवीपेक्षा जास्त व्याज मिळवतात. याची व्याप्ती व उलाढाल फार मोठी असते. कोणत्याही क्षणी पाच ट्रिलियन डॉलर घर कर्जाच्या 50 ते 75 टक्के कर्ज सेक्युरिटायझेशनमध्ये गुंतलेले असते. यातून कमिशन व फी मोठ्या प्रमाणावर मिळविली जाते.

आर्थिक क्षेत्रातील भीषण उलथापालथ गुंतवणूक बँकांपासून सुरू झाली व त्याची झळ नंतर व्यापारी बँकांनाही लागली. मुक्त अर्थव्यवस्थेच्या पुरस्कर्त्या अमेरिकेत गुंतवणूक बँकांवर फेडरल रिझर्व्ह बँकेचा वचक नगण्य असतो. गुंतवणूक बँका या फायनान्शियल सुपर मार्केट असतात. त्यांच्या उलाढाली भव्य दिव्य व अनेक प्रकारच्या असतात. 1) भांडवली बाजारातून कंपन्यांना पैसा उभा करण्यास मदत करणे 2) विलीनीकरण, दुसरी कंपनी घेणे, मर्जर्स या बाबतीत सल्ला देणे 3) भाग भांडवल उभे करणे, त्यांच्या अनेक पटीत कर्ज घेणे, शेअर बाजार, बॉण्ड बाजार व अन्य व्यापार याबाबत सल्ला देणे 4) विदेशी चलन, डेरिव्हेटिव्हज यांच्या घाऊक व्यापारात उलाढालीस मदत 5) मासिक ठराविक उत्पन्न देणाऱ्या उत्पन्नाचा वाटा, कर्जरोखे, कंपन्यांचे

डिबेंचर्समध्ये गुंतवणुक व उलाढाल अशा प्रकारे सर्व्हिसेस गुंतवणूक बँका देत असतात.

सेक्युरिटायझेशन त्यापैकी एक अंग आहे. म्हणून सबप्राईम घोटाळ्याचा परिणाम सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारावर झाला आणि पैशाची चणचण भासू लागली. तरलतेची गरज भागविण्यासाठी मल्टिनॅशनल कंपन्या शक्य असेल तेथून पैसा काढून घेऊ लागल्या. शेअर मार्केटमधून पैसा बाहेर जाऊ लागला आणि शेअर निर्देशांक गडगडू लागला. सर्वच देशात ही परिस्थिती झाली. मुंबई शेअर बाजारामधून 2008 च्या पहिल्या 10 महिन्यात विदेशी गुंतवणुक संस्थांनी 12 बिलियन डॉलर्स काढून घेतले. अजूनही काढून घेत आहेत. 2007 मध्ये याच 10 महिन्यात त्यांनी 15 बिलियन डॉलर्स आणले होते व शेअर निर्देशांक 20000 कडे झेपावला होता. (1 बिलियन : सध्याच्या विनिमय दरात 5000 कोटी रूपये)

## अनिर्बंध आर्थिक व्यवहार :

''सरकार हाच प्रश्न व मार्केट हेच उत्तर'' हे मंत्र जपत असलेल्या अमेरिकेत अनिर्बंध व्यवहारांना चालना मिळते. पैसा मिळवणे, अधिक पैसा मिळवणे, आणखी पैसा मिळवणे या वेडाने ग्रासल्यामुळे मार्केटमधल्या अनेक क्लुप्त्या लढवून 30 कोटी लोकांच्या अमेरिकेचे वार्षिक उत्पन्न 13 ट्रिलियन डॉलर्स आहे व 110 कोटी लोकांच्या भारताचे उत्पन्न केवळ 1 ट्रिलियन डॉलर्स आहे. परंतु पैसा हेच व्यसन झाल्याने फायनान्शियल सुपर मार्केट अनेक प्रकारचे नवनवीन साधने, प्रॉडक्टस, शोधून त्यामध्ये उलाढाल, सट्टेबाजी हमी देण्या-घेण्याचे व्यवहार यातून पैशाचा पाऊस पाडू लागले. यासाठी वापरात असलेले क्रेडिट डिफॉल्ट स्वॉप (सीडीएस) कोलॅटराइज्ड डेट ऑब्लिगेशन्स (सीडीओ), क्रेडीट लिंकड नोटस (सीएलएन), डेरीव्हेटिव्हज, फ्युचर्स अॅन्ड ऑप्शन्स (एफ अॅन्ड ओ), डॉलर रेट कमी होणार की जास्त होणार याच्यावर बेट लावणं अशा व्यवहारांचा विमा, विमा कंपनीला हमी (रि इन्शुरन्स) असे असंख्य व्यवहार करण्यासाठी स्पेशल प्रॉडक्टस तयार करणे. अशा चक्रावून टाकणाऱ्या कोट्यावधी उलाढाली रोजच्या रोज घडत असत. अलीकडेच दिवाळखोरी जाहीर केलेली 'लेहमन ब्रदर्स' ही 158 वर्षांची बलाढ्य कंपनी 2005 मध्ये मॅथेमेटिक्समध्ये पीएच्.डी. केलेल्या 25 तरूणांना स्ट्रक्चर्स प्रॉडक्टस कल्पकदृष्ट्या निर्माण करण्यासाठी नोकरीस घेतली होती. या मायाबाजारात नक्की काय काय व किती प्रमाणात गोंधळ चालत होते, याचा अंदाज घेणे अशक्य होते. फेडरल रिझर्व्ह बँकेचे पूर्वीचे चेअरमन अॅलन ग्रीनस्पॅन म्हणतात. "While I was aware, a lot of these practices were going on, I had no notion of how significant they had become until very late." जगप्रसिध्द गुंतवणूकदार वॉरेन बफेट उद्वेगाने म्हणाला होता "Derivatives are weapons of mass destruction (WMD) of the financial system".

हा सर्व आर्थिक क्षेत्रातील रोचक चमत्कार-व्याजदर कमी, महागाई आटोक्यात व रियल इस्टेटच्या किंमती तेजीत असेपर्यंत डौलाने चालू होता. 2005 च्या सुमारास पेट्रोल किंमत वाढीचा फटका बसला. अन्नधान्याच्या किंमती वाढू लागल्या. महागाई वाढू लागली. तिला आळा घालण्यासाठी व्याजदर वाढू लागले. विलीनीकरण आणि मर्जर्स यांच्या रेट्यामुळे व मल्टी नॅशनल कंपन्यांच्या स्वस्त दरात परदेशातून काम करून

घेण्याऱ्या (बी.पी.ओ.) वृत्तीमुळे बेरोजगारी वाढू लागली. याचा फटका सबप्राईम घर कर्ज घेतलेल्यांना बसला. व्याज व हप्ते थकू लागले. ऑगस्ट 2007 पर्यंत प्रमाण फारच वाढले. कर्जदार घराच्या किल्ल्या बँकेकडे देऊ लागले. रियल इस्टेटच्या किंमती घसरू लागल्या. बँका अडचणीत येऊ लागल्या. सुरूवातीस गुंतवणूक बँकांनी अडचणींवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला. परंतु बँकिंग क्षेत्रातील एका वात्रट म्हणीप्रमाणे "गर्भारपण किंवा थकीत कर्ज फार दिवस लपविता येत नाही." वित्तीय संस्थांची तीच अवस्था झाली. हप्ते थकल्यामुळे सेक्युरिटायझेशनच्या बॉण्डवरचे व्याज व रिडॅम्पशन पैसे देणे अवघड झाले. व्यापारी बँकांच्या घरकर्जाचे सेक्युरिटायझेशन थांबले व त्यामुळे नवीन कर्ज देण्यावर बंधने आली.

या क्रायसिसचा पहिला बळी "बेअर स्टर्न" ही वित्तीय कंपनी ठरली. तिला वाचविण्यासाठी फेडरल रिझर्व्ह बँकेने 30 बिलियन डॉलर्स उपलब्ध केले. परंतु उपयोग झाला नाही. सप्टेंबर 2008 च्या पहिल्या आठवड्यात वॉलस्ट्रिट (न्यूयार्क) वरील चार मोठ्या गुंतवणूक बँकांपैकी प्रतिष्ठित संस्था लेहमन ब्रदर्स अडचणीत आली. प्रसिध्द मोठा गुंतवणुकदार वॉरेन बफेट याला मदत करण्याची विनंती करण्यात आली. त्याने नकार दिला. फेडरल रिझर्व बँकेनेसुध्दा मदतीचा हात नाकारल्यामुळे त्या कंपनीला चॅप्टर 11 खाली दिवाळे काढावे लागले. (अमेरिकेत चॅप्टर 11 खाली दिवाळखोरी जाहिर केल्यास कर्ज दिलेल्या बँका वसुलीसाठी काही काळ तगादा लावू शकत नाहीत) या पाठोपाठ अमेरिकन इंटरनॅशनल ग्रुप (ए.आय.जी.) वॉशिंग्टन म्युच्युअल, फॅनी मे आणि फ्रेंडी मॅक, मेरिल लिंच गोल्डमन सॅक, वॉकोविया अशा अनेक देशात कार्यरत असलेल्या दिग्गज गुंतवणूक बँका पत्त्याच्या घरासारख्या कोसळल्या.

**आर्थिक गोंधळ आणि उपाय :**

या ढासळत्या अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी अमेरिकन सरकार व फेडरल रिझर्व्ह बँकेने कंबर कसली आहे. युरोपमध्ये सेंट्रल बँका तरलतेची गरज भागविण्यासाठी पैसा उपलब्ध करणे, व्याजदर कमी करणे व आवश्यकतेनुसार नियमामध्ये बदल करणे हे मार्ग अवलंबत आहेत. ब्रिटनचे पंतप्रधान "गार्डन ब्राऊन" ने आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाही दिली आहे. अनेक देशात व्याजदर कमी केले जात आहेत. भारतातसुध्दा महागाईचा दर 12 टक्क्यावरून हळूहळू 9 टक्क्यावर आल्यामुळे सी.आर.आर. मध्ये 3.5% कपात करून 130000 कोटी रूपयांची तरलता उपलब्ध केली आहे व रेपोरेट (रिझर्व्ह बँक बँकांना कर्जावर आकारण्याचा दर) 1.5 टक्के कमी करून 9 टक्क्यांवरून 7.5 टक्क्यावर आणला आहे. शेतीकर्ज माफीचे 25 हजार कोटीचा हप्ता पण बँकांना उपलब्ध केला आहे.

महत्त्वाचे उपाय अमेरिकन अर्थव्यवस्थेत झाल्याशिवाय अन्य देशात स्थैर्य येणे अवघड आहे हे अमेरिका ओळखून आहे. म्हणून जलदगतीने पावले उचलली जात आहेत. फॅनी मे व फ्रेंडी मॅक या गरीबांच्या घरकर्ज देणाऱ्या व्यापारी बँकांचे कर्ज विकत घेऊन सिक्युरिटायझेशन करत होत्या. त्यांचा व्याप एकूण अमेरिकन घरकर्ज (5 ट्रिलियन डॉलर) च्या 50 टक्के या दोन बँका हाताळत होत्या. त्या अडचणीत आल्यावर त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. अमेरिकन इंटरनॅशनल ग्रुप या 70 देशात कार्यरत असलेल्या विमा कंपनीचे पण राष्ट्रीयीकरण

झाले. मार्गन स्टॅन्ले व गोल्डमन सॅक यापुढे गुंतवणूक बँक न राहता व्यापारी बँका बनून फेडरल रिझर्व्ह बँकेच्या अंमलाखाली काम करण्याचे ठरवले आहे. मेरील लींच कंपनीला बँक ऑफ अमेरिकाने 50 बिलियन डॉलर्सला विकत घेतले. वाकोविया ग्रुप अडचणीत आल्यावर सिटीबँक वाकोविया चा बँकिंग व्यवहार 2 बिलियन डॉलर्स ला विकत घेण्याचे मान्य केले. नंतर वेल्स फार्गोकंपनीने वाकोवियाचे सर्व व्यवहार 15 बिलियन डॉलर्सला घेऊन बँकींग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उतरावयाचे ठरवले. यास सिटी बँकेने हरकत घेतली आहे. आर्थिक क्षेत्रात गोंधळ सुरूच आहे. त्यातच अमेरिकेतील दोन नंबरची व वेगवेगळ्या 100 देशात कार्यरत असलेली 'हाय फ्लाय' सिटी बँक सुध्दा अडचणीत आली आणि आर्थिक जगताला धक्काच बसला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अमेरिकन सरकारने 300 बिलियन डॉलर्सची गॅरंटी व 20 बिलियन डॉलर्स सिटी बँकेच्या प्रिफरन्स शेअर्समध्ये गुंतवण्यास मान्यता दिली. त्यावर आठ टक्के व्याजदर असेल. अमेरिकन व्यवस्थेत हा व्याजदर 'पेनल रेट' म्हणावा लागेल. देशातील तीन नंबरची व 'मेरील लीच' कंपनीला अलीकडेच जीवदान दिलेली 'बँक ऑफ अमेरिका' सुध्दा अडचणीत येते की काय अशी काळजी काही लोक व्यक्त करत आहेत. सर्वच अमेरिकन बँकामध्ये जवळजवळ एक ट्रिलियन डॉलर्सचे भागभांडवल कमी आहे. त्यामुळे ''आभाळच फाटलय तिथं ठिगळं कुठ कुठ लावायची' अशी अमेरिकन सरकारची स्थिती झाली आहे.

तरलतेचा प्रश्न व त्याहून विश्वासाचा प्रश्न गंभीर झाला आहे. एकूण आर्थिक घोटाळ्याची व्याप्ती किती आहे हे सांगणे कठीण आहे. अमेरिका मंदीच्या जाळ्यात अडकत आहे. येत्या काही तिमाहीचे रिझल्ट काळजी करण्यासारखे असतील असे फेडरल रिझर्व्ह बँकेचे अध्यक्ष बेन बर्नानकी यांचे म्हणणे आहे. सरकारच्या भरघोस मदतीचा दुसरा डोस आवश्यक आहे. आधीच अमेरिकन सरकार मागणीला उठाव देण्यासाठी 100 बिलियन डॉलर्सचा टॅक्स परतीचे चेक्स नागरीकांना एप्रिल-मे 2008 मध्ये पाठवले आहेत आणि 125 बिलियन डॉलर्स 9 बँकांमध्ये गुंतवले आहेत. फेडरल रिझर्व बँकेची मदत चालूच आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश जी-20 देशांच्या नेत्यांची आर्थिक मंदीवर कॉन्फरन्स 5 नोव्हेंबरला वॉशिंग्टन येथे घेऊन सर्व देशाच्या नेत्यांनी एकत्रित येऊन या भीषण प्रसंगावर मात करण्याचे आवाहन केले. त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही. अमेरिकेचे नवे अध्यक्ष ''बराक ओबामा'' जानेवारी 20 तारखेस सत्ता हाती घेतल्यावर एप्रिल 30 रोजी दुसरी जी-20 देशाच्या नेत्यांची बैठक होणार आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणाम व उपाय:**

व्यापारी बँका देशाच्या आर्थिक नाडी आहेत. 75 टक्के बँकिंग व्यवहार सरकारी क्षेत्रात आहेत, साधारण 10 टक्के नवीन खाजगी बँकांतून, 10 टक्के विदेशी बँकांच्या शाखेतून व 5 टक्के जुन्या खाजगी बँकातून होतात. या सर्व बँका रिझर्व्ह बँकेच्या करड्या नजरेखाली काम करतात. त्यांचे भागभांडवल 9 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ठेवीच्या 5.5 टक्के पैसे रिझर्व्ह बँकेत जमा व 25 टक्के सरकारी कर्जरोख्यांत असल्यामुळे जवळजवळ 40 टक्के पैसे बँका केंव्हाही उभा करू शकतात. इतक्या तरल (Liquid) बँका अन्य देशात नाहीत. परत ठेवीदाराला एक लाख रुपयापर्यंत विमा संरक्षण

आहे व त्याचा हप्ता बँकाच भरतात. एखादी बँक चुकून अडचणीत आलीच तर तिचे 'लिक्विडेशन' न करता रिझर्व्ह बँक अशा बँकेचे सशक्त बँकेत विलिनीकरण करत असल्यामुळे ठेवीदाराचा पैसा बँकांत सुरक्षित आहे. सहकारी बँकांचा पसारा एकूण बँकींग उलाढालीत केवळ 3-4 टक्के आहे. बोटांवर मोजता येईल इतक्याच सहकारी बँकांत अडचणी आहेत; पण त्यावरील उपाय अशक्य नाहीत.

अमेरिकेतील आर्थिक घोटाळ्याचा परिणाम भारतीय बँकांच्या कर्ज देण्याच्या क्षमतेवर झाला. त्या देशात तरलतेची 'चणचण' भासू लागल्यावर आपल्या शेअरबाजारांत गुंतवलेले डॉलर्स सर्व विदेशी गुंतवणुकदार (Foreign Institutional investors) भराभर काढून घेऊ लागले. 2008 च्या पहिल्या दहा महिन्यात (ऑक्टोबर अखेरपर्यंत) त्यांनी 12 बिलियन डॉलर्स काढून नेले. त्यामुळे रूपया घसरला व विनिमयाचा दर प्रत्येक डॉलरला जो रू.39 होता तो रू.50 वर गेला. आपल्या देशात रूपया पूर्णपणे परिवर्तनीय नसला तरी शेअर मार्केटमध्ये येणाऱ्या पैशाचे तेच स्वरूप होते.

आपल्या उद्योजकांना विदेशी मार्केट मध्ये पैसे मिळेनासे झाले.2004-2008 हा यु.पी.ए. सरकारच्या काळांत देशाच्या उत्पन्नाची वार्षिक वाढ जवळजवळ 9 टक्के होती. हा एक उच्चांक होता. संपूर्ण देश उल्हासित (Euphoric) झाला होता. आपले उद्योजक जगाला गवसणी घालण्यास निघाले व परदेशातील अनेक कंपन्या खरेदी करू लागले. टाटांनी कोरस कंपनी, टाटा मोटर्सने 'जग्वार', लक्ष्मी मित्तल तर स्टील किंग झाला. अनेक फार्मा कंपन्या आय.टी.कंपन्या, भारत फोर्ज, किर्लोस्कर, जैन ग्रुप यांनी वेगवेगळ्या देशांतील कंपन्या घेऊन भारताचे आर्थिक महासत्तेचे स्वप्न साकार करणार असे चित्र उभे राहिले. त्यासाठी त्यांनी विदेशी मार्केटमधून मोठ्या प्रमाणावर कर्ज उभे केले. परंतु तिकडे मंदीचे सावट आले आणि अडचणी सुरू झाल्या. त्या अडचणी खालीलप्रमाणे होत्या.

1) आयात करणाऱ्या भारतीय कंपनीला परदेशातील विक्रेता उधारी देण्याचे बंद केले.2) आपल्या उद्योजकांनी उभे केलेल्या कर्जावरील वार्षिक व्याज व हप्ता भरण्यास विदेशी चलन मिळेना.3) आपल्या देशात वापरण्यासाठी उभे केलेले ई.सी.बी. (Evternal Commercial Borrowing (ECB))चे हप्ते अडकू लागले. 4) तेल कंपन्यांना खरेदीसाठी डॉलर्स लागतात. भारत सरकार त्यांना 'ऑईल बॉण्डस' दिल्यामुळे डॉलर्स कमी पडू लागले. 5) आपल्या बँकांच्या जवळजवळ 150 शाखा विदेशात आहेत. त्या देशातील आर्थिक चणचणीमुळे तेथे (दैनंदिन ऊलाढालीसाठी) डॉलर्स मिळेनात. या सर्व गरजा भागविणेची जबाबदारी भारतीय बँकावर येऊन पडली आणि भारतात पण तरलतेची चणचण जाणवू लागली. मोजक्या बँकांनी कार लोन, टू व्हीलर लोन, ट्रॅक्टर लोन बंद केले. पैशाची चणचण व जागतिक मंदीची नांदी यामुळे भारतीय बँका सावधगिरीने पाऊले टाकावयाच्या पावित्र्यात गेल्या. छोटे उद्योग, व्यवसाय, निर्यातदार, उद्योजक चिंताक्रांत झाले.

अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे रिझर्व्ह बँकने महागाईचा दर 11-12 टक्क्यांच्या आसपास असला तरी बँकांना पैसा पुरविण्याचे धोरण स्वीकारले व सी.आर.आर. तब्बल 3.5 टक्क्यांनी कमी करून 5.5 टक्क्यांवर आणला. एस.एल.आर. (सरकारी कर्जरोख्यांत गुंतविण्याचे प्रमाण) एक टक्क्यांनी कमी करून 24 टक्क्यावर आणला,

रेपोरेट (रिझर्व बँक व्यापारी बँकांना आकारण्याचा व्याज दर) दीड टक्क्यांनी कमी करून 7.5 टक्क्यावर आणला व सरकारच्या सांगण्यावरून रिझर्व बँकेने शेतकरी कर्जमाफीचा पहिला हप्ता रू.25000 कोटी बँकांना दिले. या सर्व कृतीमुळे जवळजवळ दोन लाख कोटी रूपये बँकांना मिळून तरलतेची गरज भागली. परंतु कर्ज घेणाऱ्यांच्या तक्रारी चालूच राहिल्या.

जागतिक मंदीचे पडसाद उद्योग, व्यवसाय व व्यापारावर पडत आहेत. जमीनीच्या किंमती घसरत आहेत. स्टील, सिमेंट व पेट्रोलचे दर खाली आले आहेत. 'मागणी' थंडावली आहे. उद्योग जगत धास्तावलेल्या स्थितीत आहे. गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जात आहेत. घर बांधणी मंदावत आहे. मध्यमवर्ग सावधगिरीची भाषा करत खर्चावर ताबा मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. या सर्व घटनांचा परिणाम रोजगारांवर होणार हे निश्चित आहे. सध्या आय.टी., बी.पी.ओ., मेडिकल ट्रान्सक्रिप्शन या क्षेत्रांत नोकर कपात चालू आहे. टेक्स्टाईल, रेडीमेड, गारमेन्टस, कारपेट या क्षेत्रांत रोजगारांवर परिणाम झालेला दिसतो. ऑटोमोबाईल मंदीच्या गर्त्यात जात आहे. त्यामुळे छोटे छोटे सप्लायर्स धोक्यात येऊन रोजगारांवर परिणाम होत आहे. या गोंधळातच दहशतवाद्यांनी देशाची आर्थिक राजधानी मुंबईची शान असलेल्या 'ताज' व ओबेरॉय (ट्रिडेंट) हॉटेल्स आणि 'नरीमन भवन' मध्ये 26-29 नोव्हेंबर या काळात उभे केलेले 'थरार नाट्य' अपरिमित जिवीत हानी व आर्थिक धक्का संपूर्ण भारताला दिला.

यातून मार्ग काढण्यासाठी बँकांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. उत्तम ट्रॅक रेकॉर्ड असलेल्या छोट्या उद्योजकांना सरकारी खात्यांच्या ऑर्डर्स असणाऱ्यांना एल.सी. व फर्म आर्डर्स, सार्वजनिक उद्योगांच्या एल.सी. व आर्डर असणाऱ्या छोट्या उद्योजकांना योग्य ती मदत बँकांनी केल्यास आर्थिक अस्थिरता आटोक्यात येईल. लघु उद्योग मोठ्या प्रमाणांवर रोजगार देत असतात. म्हणून पुढाकार (Pro-active) घेऊन बँकांनी आर्थिक मदत करणे गरजेचे आहे.

परिस्थिती संपूर्णपणे सुधारण्यास वेळ लागणार हे उघड आहे. अमेरिका व युरोप येथील मंदी कमी होऊन गाडी रूळावर येण्यास अमेरिकेने काही कठोर निर्णय घेणे आवश्यक आहेत. तेथील आर्थिक क्षेत्रावर फेडरल रिझर्व्ह बँकेचे बंधन जास्त कडक केले पाहिजे. असंख्य प्रकारच्या "स्ट्रक्चर्ड प्रॉडक्टस" वर बंधन आणले पाहिजे. रेटींग एजन्सीवर कंट्रोल, कंपनीच्या चीफ ऑफीसर्सच्या पगार व भत्त्यावर निर्बंध, हिशेबामध्ये "पारदर्शकता" यांचा पाठपुरावा गरजेचे आहे.

एप्रिल 30,2008 रोजी "जी-20" राष्ट्रांच्या बैठकीत चीन, भारत व अन्य राष्ट्रांनी (1) आय.एम.एफ. व जागतिक बँकेवर जास्त लोकशाही प्रणीत मालकी (2) "जागतिक रिझर्व्ह नाणे" डॉलर न ठेवता पर्यायी व्यवस्था व (3) जागतिक अर्थव्यवस्थेची नवी मांडणी यासाठी आग्रह धरला पाहिजे. अमेरिकेचा आर्थिक दहशतवाद कमी होण्यास त्यामुळे मदत होईल व जागतिक आर्थिक सत्ताकेंद्र पूर्वेला सरकण्यास प्रारंभ होईल. जागतिक आर्थिक मंदीवर उत्तम उपाय अमेरिकन अर्थव्यवस्था नीतीमत्तेवर आधारित असणे हा आहे. अती सर्वत्र वर्जयेत ।। हा मंत्र अमेरिकनांच्या गळी उतरवला पाहिजे. येणारी एक-दोन वर्षे धकाधकीची व अडचणीची असतील, त्याची मानसिक तयारी आवश्यक आहे.

# "पॉल कूगमन - बहुआयामी अर्थतज्ज्ञ"

**विजय ककडे**
प्राचार्य
हिराचंद नेमचंद कॉमर्स कॉलेज, सोलापूर.
vijay382000@gmail.com

2008 चे नोबेल पारितोषिक प्रिन्स्टन विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक पॉल क्रूगमन यांना देण्यात आले.1.4 डॉलरचे नोबेल पारितोषिक फक्त एकाच व्यक्तीला देण्याचा प्रघात दुर्मिळ असून हा एक वेगळा सन्मानच मानावा लागेल. 11953 मध्ये ज्यू कुटुंबात जन्मलेल्या पॉल क्रूगमन यांनी 1994 मध्ये येल विद्यापीठातून बी.ए. आणि 1977 मध्ये वयाच्या 24 व्या वर्षी पीएच्.डी. पदवी एम.आय.टी.मधून प्राप्त केली. येल, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, स्टँफोर्ड, प्रिन्स्टन अशा विविध विद्यापीठातून अध्यापन,20 पुस्तकांचे आणि 200 हून अधिक लेखांचे लेखक. क्रूगमन 1982-83 मध्ये रेगन यांचे आर्थिक सल्लागार होते. तसेच एन्रॉन कंपनीचेही सल्लागार होते. आपल्या विरोधकांचे विचार घणाघाती टीकेतून मोडून काढण्यासाठी ते प्रसिध्द आहेत. वृत्तपत्रातील स्तंभलेखन हा समाजजागृतीचा आणि समाजसेवेचा भाग म्हणून त्यांनी वापरला.'संपादकीय शेजारी असणारा (op.ed)लेख जर लोकांना अस्वस्थ करीत नसेल तर ती जागा वाया गेली असे मानावे' असे मानणाऱ्या क्रूगमन यांनी सातत्याने लोकांना अस्वस्थ करण्याचे कार्य केले. त्यामुळेच ते 'बुश' प्रशासानाचे सर्वात मोठे टीकाकार झाले आणि सध्याची अमेरिकन आर्थिक आरिष्टाची पूर्ण जबाबदारी ॲलन ग्रीनसन यांच्यावर केंद्रीत केली. अशा बहुआयामी अर्थतज्ज्ञास नोबेल पारितोषिक देऊन त्यांच्या ज्या विचारांचा सन्मान करण्यात आला ते विचार केवळ अर्थशास्त्राच्या अभ्यासकालाच नव्हे तर धोरणकर्त्यांना व सर्वसामान्य अभ्यासकालादेखील तेवढेच महत्त्वाचे ठरतात.

पॉल क्रूगमन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार, आंतरराष्ट्रीय वित्त व्यवस्था, उत्पन्न वाटप, आर्थिक संकट अशा विविध विषयाबरोबर चालू घडामोडीवर अत्यंत परखडपणे लिखाण केले आहे. त्यांना नोबेल पारितोषिक जाहीर करताना नोबेल समितीने, ''क्रूगमन यांनी प्रमाणाच्या बचतींचा सर्वसाधारण संतुलनात समाविष्ट करून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे निर्धारण करणारे घटक आणि स्थानीयीकरण याबाबतच्या ज्ञानात महत्त्वपूर्ण भर टाकली'' असे म्हटले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत 'नवा व्यापार सिध्दांत' मांडला आणि

आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांतात एक नवे विचार दालन उघडले. हा नवा व्यापार सिध्दांत त्यांनी नोबेल पारितोषिक स्वीकारण्याप्रसंगी केलेल्या भाषणात पुन:श्च स्पष्ट केला.

**नवा व्यापार सिध्दांत**(New Trade Theory) :

आंतरराष्ट्रीय व्यापार का होतो? किंवा आंतरराष्ट्रीय व्यापाराचे निर्धारण करणारे घटक कोणते याबाबत अॅडम स्मिथ यांनी निव्वळ खर्च फरक सिध्दांत (Absolute Cost Theory) मांडून सुरुवात केली. त्यामध्ये रिकार्डो यांनी तौलनिक खर्च सिध्दांत (Comparative Cost Advantage Theory) मांडून आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिध्दांत व्यापक केला. पुढे हेक्चर ओहलीन यांनी घटक उपलब्धता सिध्दांत विकसित केला. या सर्व सिध्दांतातून 19 व्या आणि 20 व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतचा व्यापार स्पष्ट होत होता. विकसित देश तयार औद्योगिक माल विकसनशील देशांना निर्यात करतात; तर कच्चा माल आयात करतात व उलट विकसनशील देश औद्योगिक मालाची आयात व कच्च्या मालाची निर्यात करतात हा 'पॅटर्न' सर्वमान्य झाला होता. पण तांत्रिक प्रगती आणि ग्राहक केंद्रीत बाजारपेठेचे स्वरुप 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय व्यापारात पूर्वीचा पॅटर्न मागे पडला यातूनच नवा व्यापार, नवी भौगोलिकता व उत्पादकांच्या अडचणी ("New Trade", "New geography" and The troubles of manufacturing) यांचा उदय झाला.

**नवा आर्थिक भूगोल :-**

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा नवा सिध्दांत 1979 मध्ये जर्नल ऑफ इंटरनॅशनल इकॉनॉमिक्समध्ये प्रकाशित केला. त्यानंतर 1991 मध्ये 'आर्थिक भूगोलाचा सिध्दांत' त्यांनी जर्नल ऑफ पोलिटीकल इकॉनॉमीमध्ये प्रकाशित केला. प्रमाणाच्या बचती उद्योगाच्या केंद्रीकरणाला कारक ठरतात व त्यातून पुन्हा तो प्रदेश उद्योगांना आकर्षिक करतो. यातून स्थानियीकरण वाढते. त्या प्रदेशात रोजगार व उत्पन्न वाढते. हा प्रदेश व इतर प्रदेश यांच्यातील विषमताही वाढते! नवा आर्थिक भूगोल हा औद्योगिक विकेंद्रीकरणाचा आग्रह धरणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल.

**आंतरराष्ट्रीय वित्त :**

क्रूगमन यांनी आंतरराष्ट्रीय वित्त, विनिमय दर आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न यावरही लिखाण केले आहे. 1979 मध्ये जर्नल ऑफ मनी क्रेडीट अॅड बँकिंग मध्ये चलनसंकटाची पूर्वसूचना दिली होती. स्थिर विनिमय दर पध्दती ही चलन सट्टेबाजी वाढवते आणि त्यातून चलनसंकट निर्माण होते; हा इशारा 1997 मध्ये दक्षिण पूर्व देशातील चलन संकटाने खरा ठरवला.

**उत्पन्न वाटप :-**

वाढती विषमता ही सामाजिक स्वास्थ्याला हानीकारक असते. 'द एज ऑफ डिमिनिशिंग एक्सपेक्टेशन' मध्ये त्यांनी विषमतेची मीमांसा केली. नव्या तंत्रामुळे विषमता वाढत असून कल्याणकारी राज्याची संकल्पना दुबळी होत गेल्याने विषमता वाढीस चालना मिळाली. क्लेन यांनी क्रूगमन यांच्या विचारात सामाजिक-लोकशाहीचा घटक प्रभावी असतो असे म्हटले आहे.

**प्रखर टिकाकार व आर्थिक पत्रकार :**

आर्थिक विषयांवर वृत्तपत्रातून लिखाण करणे हे आपल्याकडे अद्यापि कमी दर्जाचे मानणारे विद्वान (?) आहेत. परंतु याच माध्यमातून संशोधक, अभ्यासक हा लोकशाहीत लोकमानस घडवत असतो याचे भान क्रूगमन यांना असल्याने त्यांनी सातत्याने न्यूयॉर्क टाईम्स, फॉर्च्युन, वॉशिंग्टन मंथली, द इकॉनॉमिस्ट आणि सायबर मासिक स्लेट (Slate) यातून विपुल लिखाण केले. यातून त्यांनी

'बुश' यांच्या आर्थिक धोरणावर प्रखर टीका केली. अमेरिकेतील वाढती राजकोषीय तूट आर्थिक संकटाला आमंत्रित करेल हा धोक्याचा इशारा आता खरा ठरला असून कर कपात, सार्वजनिक खर्चातील वाढ, इराक युध्द यातून वाढलेला खर्च हा क्रूगमन यांच्या टीकेचा विषय होता. अन्नधान्य उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सबसिडीसदेखील त्यांनी विरोध केला. मुक्त व्यापार, जागतिकीकरण हे उत्पादन खर्चात घट करणारे, ग्राहकाला वैविध्यपूर्ण वस्तू उपलब्ध करणारे साधन असल्याने त्याचे त्यांनी समर्थन सातत्यपूर्ण केले. 2007 मध्ये 'द कन्सायन्स ऑफ लिबरल' या ग्रंथात विषमतेमध्ये विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत घट होत होती. मात्र गेल्या दोन दशकात वाढ होत असल्याचे निष्कर्ष काढले. लष्करावरील खर्च वाढीपेक्षा सामाजिक व वैद्यकीय खर्चात वाढ करावी असा आग्रह धरला.

क्रूगमन यांच्या नवा व्यापार सिध्दांतात प्रमाणाच्या बचती आणि ग्राहकांची वैविध्यासाठी असणारी पसंती या पायाभूत आहेत. तांत्रिक प्रगतीचा परिणाम म्हणून सीमांत आणि सरासरी खर्च घटत जातात. उत्पादनवाढीबरोबर सरासरी खर्चात होणारी घट प्रमाणाच्या बचती स्पष्ट करते. यामुळे विशेषीकरण फायद्याचे ठरते. औद्योगिक देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात आता औद्योगिक वस्तूंची निर्यात व आयातही दिसू लागली. यामागे प्रमाणाच्या बचतीसोबत ग्राहकांची पसंती होती. स्वीडन जर्मनीला व्होल्वो कार निर्यात करतो तर जर्मनी स्वीडनला बी.एम.डब्ल्यू. कार निर्यात करतो. ही नवी व्यापारप्रणाली आर्थिक विकासाच्या समान टप्प्यावर असणाऱ्या देशात दिसते. ग्राहकांना दोन्ही प्रकारच्या कार निवडीचे स्वातंत्र्य यावे लागते पण त्याचे उत्पादन मात्र एकाच देशात न होता प्रमाणाच्या बचतीचा फायदा घेण्यासाठी एक कंपनी एकाच देशात उत्पादन करून त्याची निर्यात करते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप ठरविण्यात ग्राहकाची विविधतेसाठी असणारी पसंती महत्त्वाची असते.

**सबप्राईम व सद्य:स्थिती :**

अमेरिकन अर्थव्यवस्थेत गृहकर्जाच्या प्रश्नाने आर्थिक संकटाचा प्रवेश केला. याबाबत ॲलन ग्रीनस्पॅन यांचे धोरण अधिक अडचणी निर्माण करणारे ठरले. मंदीच्या सद्य: स्थितीत राजकोषीय खर्चात वाढ करणे व रोखता किंवा वित्तपुरवठा वाढविणे अशा दोन महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविल्या. जपानचा आदर्श समोर ठेवून आपली धोरणे ठेवावीत असा सल्ला त्यांनी दिला.

**संशोधक मार्गदर्शक :**

आपल्या संशोधन पध्दतीची मूलसूत्रे त्यांनी नोबेल पारितोषिक व्याख्यानात स्पष्ट केली. ती सर्व संशोधकांना चिरंतन मार्गदर्शक आहेत. ती पुढीलप्रमाणे :-

1) आपल्या चौकटीबाहेर असणाऱ्याचे ऐका Listen the Gentiles
2) प्रश्नावर प्रश्न विचारा Question the Question
3)बावळटपणाचे धाडस करा Dare to be silly
4)सोपे करा, सोपे करा. Simplify Simplify.

आयसॅक असिमोवच्या फौंडेशन कादंबरीतून प्रेरणा घेऊन मनोइतिहास शिकण्याची त्यांची इच्छा होती. पण तसा विषयच नसल्याने ते अर्थशास्त्रात आले. वयाच्या 40 पूर्वी दिल्या जाणाऱ्या अमेरिकन इकॉनॉमिक सोसायटीचा जॉन बेट क्लार्क पदक 1991 मध्ये व नोबेल पारितोषिक 2008 मध्ये मिळवणारे क्रूगमन जगातील प्रमुख 50 प्रभावी अर्थतज्ज्ञात एक आहेत. त्यांचा सामाजिक-लोकशाहीचा पिंड भारतातील सर्व तरुण संशोधकांना आदर्शवत ठरावा असाच आहे.

# ग्रामीण महिला सबलीकरण आणि पंचायतराज्य

"If you want me to tell you what a nation is like Or What a social Organization is like, tell me the position of women in that country"

- Pandit Jawaharlal Nehru

**श्रीमती सिंधुदेवी कृष्णराव कौरे**

भ्रमणध्वनी -9922960928

महिलांचे सबलीकरण ही संकल्पना गुंतागुंतीची असून त्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय घटकांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रसंघाने 1976 ते 85 हे दशक महिलांसाठी घोषित केल्यानंतर महिलांचे सबलीकरण म्हणजे समाजाच्या व जीवनाच्या प्रत्येक कार्यात स्त्रियांचा समान वाटा हा प्रश्न संपूर्ण जगभर ऐरणीवर आला.

भारतात अशा प्रकारच्या स्त्री-पुरुष समानता व महिला सबलीकरणासाठी नवव्या पंचवार्षिक योजनेत (1997-2002) असे स्पष्ट केले की, '' प्रत्येकाने अशा प्रकारचे वातावरण निर्माण करावे की ज्यामुळे महिलांना घरात व घराबाहेर आपले अधिकार मोकळेपणाने वापरता आले पाहिजेत, पुरुषाबरोबर समानतेने वावरता आले पाहिजे.'' नवव्या पंचवार्षिक योजनेच्या मध्यात असेही स्पष्ट केले की महिला आर्थिक, राजकीय, सामाजिकदृष्ट्या सबळ झाल्या पाहिजेत. महिलांच्या राजकीय सबलीकरणामुळे राजकारण हे अधिक लोकशाही, सर्वसमावेशक व पारदर्शक होण्यास मदत होईल. एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मा भाग म्हणजे महिला. त्यामुळे राजकीय यंत्रणा अशी असावी की त्यात महिलांना महत्त्वाच्या पदावर प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळावे. सरकारी यंत्रणेच्या प्रत्येक स्तरावर महिलांना सहभागी करुन घेतले पाहिजे.

भारतात संघराज्य पध्दती आहे. केंद्र व राज्य सरकार यांच्यात सत्तेचे विभाजन केलेले आहे. प्रशासकीय विकेंद्रीकरणाची प्रक्रिया साध्य होण्यासाठी शासकीय यंत्रणेचा तिसरा स्तर म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. यात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद इ. चा समावेश होतो.

1957 मध्ये बळवंतराव मेहता समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर 1959 मध्ये स्वयंशासकीय अशी पंचायतराज्य पध्दती सुरू झाली. या समितीने अशी शिफारस केली की, पंचायत समितीमध्ये 20 सभासदाव्यतिरिक्त 2 महिलांना सहभागी करुन घ्यावे. अशा प्रकारे तळागाळातील महिलांना राजकीय

यंत्रणेत सहभागी करून घेण्याची ही पहिली कायदेशीर घोषणा होती. 1961 मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत राज्य कायद्यानुसार असे ठरले की जेथे महिला सदस्यांची निवड झाली नसेल तेथे तिन्ही स्तरावर एक किंवा दोन महिलांची नियुक्ती करावी. 1978 मध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषदामध्ये 320 महिला प्रतिनिधी असून केवळ 6 सदस्य निवडले होते. भारताच्या अनेक भागात पंचायत राज्यामध्ये महिलांना निवडणुकीऐवजी प्रत्यक्ष सहभागी करुन घेतले.

1989 मध्ये 64 वी घटना दुरुस्ती विधेयक पार्लमेंटमध्ये सादर केले. त्यात महिलांना 30% राखीव जागा देण्याचे होते. परंतु वरिष्ठ गृहात ते अगदी सीमेवर नामंजूर झाले. सप्टेंबर 1991 मध्ये हेच विधेयक पुन्हा सादर केले आणि त्यात 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करुन त्यात एक जादा तरतूद केली. ती म्हणजे 1/3 महिलांचे प्रतिनिधीत्व हे अध्यक्षपदासाठी असावे. डिसेंबर 1992 मध्ये ते अंतिमत: मंजूर झाले. एप्रिल 1993 मध्ये निम्म्याहून अधिक राज्यांनी ते मंजूर केले. 24 एप्रिल 1993 पासून भारतीय 73 व 74 व्या भारतीय घटनादुरुस्तीची अंमलबजावणी सुरु झाली. या घटना दुरुस्तीचे परिणाम फार दूरगामी झाले. 5 वर्षासाठी ग्रामीण पातळीपासून ते पंचायत समिती व जिल्हा परिषदमधील सर्व जागासाठी प्रत्यक्ष निवडणुका घेतल्या जातील. हा कायदा स्त्रियांसाठी राखीव जागा, SC-ST गटातील लोकांसाठी फार फार महत्त्वाचा आहे. यातील सर्वसाधारण वैशिष्ट्यांचा लाभ स्त्रियांना घेता येतो. म्हणजे स्थानिक व पंचायत समितीसाठी सदस्य व अध्यक्ष पदासाठी प्रत्यक्ष निवडणूक लढता येतात. तसेच घटकराज्याची इच्छा असेल तर ते मागासवर्गीय नागरिकातून अध्यक्षपदासाठी राखीव जागांची तरतूद करु शकतात. ही घटना दुरुस्ती महिलांच्या सबलीकरणातील एक दीपस्तंभ आहे. महाराष्ट्रात 1992 च्या निवडणुकात 28,000 पंचायत राज्यातून 93.333 महिला या विविध पंचायतीमध्ये सदस्य व अध्यक्षपदी होत्या. संपूर्ण देशभर पंचायत राज्यात महिलांची उपस्थिती उल्लेखनीय दिसते. जवळजवळ 10 दशलक्ष महिला या पंचायत राज्याच्या त्रिस्तरीय पातळीवर काम करीत आहेत. इतक्या मोठ्या संख्येने स्त्रियांचा स्थानिक स्वराज्यसंस्थांमधील सहभागामुळे स्त्रियांना राजकारणात विशेष रस नाही. त्यांना राजकीय पक्षाच्या कामकाजात व बैठकामध्ये उपस्थित राहता येत नाही. हा भ्रम काहीसा दूर झाला.

तक्ता क्र.01 मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामध्ये पंचायतीमध्ये महिलासाठी सरपंच पदाच्या राखीव जागा दर्शविलेल्या आहेत. यावरुन महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सहभाग दिसून येतो. पंचायत राज्यामध्ये महिला या सरपंच पदीही आहेत. या महिला 50 वर्षापेक्षा लहान वयाच्या असून 25 ते 45 वयोगटातील आहेत. जवळजवळ त्या सर्व विवाहित आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील सत्ता म्हणजे वयस्कर लोकांची मक्तेदारी हाही भ्रम दूर झाला आहे. तरुण पिढीतील महिलांचे राजकीय प्रतिनिधीत्व हा एक महत्त्वाचा बदलच मानावा लागेल. सुरूवातीला उच्चवर्णीय गटातील महिलांचे वर्चस्व असले तरी आता मागासवर्गीय गटातील स्त्रिया सहभागी होण्यासाठी प्रभावीपणे पुढे येत आहेत. सुरूवातीला ग्रामपंचायत पातळीवर सदस्य महिला अशिक्षित किंवा अंशत: अशिक्षित असल्या तरी आता उच्च शिक्षित स्त्रिया सहभागी होत आहेत. महिलांचे प्रतिनिधीत्व – मागासवर्गीय जाती व आदिवासी जमाती 50%, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातून 30%, भूमीहीन कुटुंबातून 14% रोजंदारी कामगार कुटुंबातून 22%

आहे. महिलांच्या राखीव जागामुळे केवळ दरिद्री व सीमांत महिलांचेच सबलीकरण झाले नाही तर अल्पसंख्याक सनातनी कुटुंबातील स्त्रियांनाही लाभ झाला आहे.

तक्ता क्र. 01

## 2005 पंचायत निवडणुका

## महिला सरपंच पदे (आकडेवारी)

| क्र. | जिल्हा | निवडणूका झालेली पंचायते | महिला सरपंच पदासाठी राखीव जागा | सरपंच पदे खुल्या जागा |
|---|---|---|---|---|
| 1. | ठाणे | 353 | 118 | 235 |
| 2. | रायगड | 818 | 273 | 545 |
| 3. | रत्नागिरी | 848 | 283 | 556 |
| 4. | सिंधुदुर्ग | 433 | 144 | 289 |
| 5. | नाशिक | 780 | 260 | 520 |
| 6. | धुळे | 396 | 122 | 274 |
| 7. | नंदुरबार | 76 | 26 | 50 |
| 8. | जळगाव | 1125 | 375 | 750 |
| 9. | अहमदनगर | 823 | 408 | 415 |
| 10. | पुणे | 1317 | 439 | 878 |
| 11. | सातारा | 1509 | 502 | 1007 |
| 12. | सांगली | 705 | 235 | 470 |
| 13. | सोलापूर | 1028 | 344 | 604 |
| 14. | कोल्हापूर | 1026 | 342 | 684 |
| 15. | औरंगाबाद | 852 | 285 | 567 |
| 16. | जालना | 785 | 262 | 523 |
| 17. | परभणी | 697 | 232 | 465 |
| 18. | हिंगोली | 515 | 159 | 346 |
| 19. | नांदेड | 1170 | 390 | 780 |
| 20. | बीड | 1018 | 340 | 678 |
| 21. | उस्मानाबाद | 623 | 207 | 416 |
| 22. | अमरावती | 842 | 242 | 600 |
| 23. | अकोला | 538 | 178 | 330 |
| 24. | वाशीम | 471 | 157 | 314 |
| 25. | बुलढाणा | 866 | 288 | 578 |
| 26. | यवतमाळ | 1049 | 349 | 700 |
| 27. | नागपूर | 775 | 259 | 516 |
| 28. | वर्धा | 517 | 172 | 345 |
| 29. | चंद्रपूर | 760 | 252 | 508 |
| 30. | गडचिरोली | 135 | 45 | 90 |
| 31. | भंडारा | 540 | 180 | 360 |
| 32. | गोंदिया | 533 | 184 | 369 |
| | **एकूण** | **31543** | **7772** | **15762** |

संदर्भ –Information from Net

SC मधून महिलांसाठी राखीव जागा .......953
SC मधून राखीव खुल्या जागा............1906
ST मधून महिलांसाठी राखीव जागा.........560
ST मधून राखीव खुल्या जागा.............1195
OBC मधून महिलांसाठी राखीव जागा....2251
OBC मधून राखीव खुल्या जागा..........4503
खुल्या गटासाठी महिलांसाठी जागा........4575
खुल्या गटासाठी राखीव जागा.............9154
महिला सरपंच पदासाठी राखीव जागा.....8339
सरपंच पदासाठी खुल्या जागा............16678
निवडणुका झालेल्या एकूण ग्रामपंचायत
संख्या......... 25017

पं. बंगालमध्ये पंचायत राज्यात मुस्लिम स्त्रिया मोठ्या प्रमाणावर निवडून आलेल्या आहेत. कानपूरमध्ये महापालिका निवडणुकीत 30 महिलांसाठी असलेल्या राखीव जागांपैकी 14 मुस्लिम महिला निवडून आल्या. या राखीव जागामुळे महिलामधील खोलवर दडलेल्या राजकीय जाणिवा जागृत होवून त्यांनी सत्ता हस्तगत करुन त्यांच्या जाणिवेचा प्रयोग करण्याची संधी त्यांना मिळत आहे. त्यांच्यासाठी राजकारण आणि निवडणुका म्हणजे दारिद्र्य दूर करण्याचा एक व्यवहारी मार्ग तर सामाजिक बदलाचे ते एक हत्यार आहे. तसेच राखीव जागा ह्या केवळ उच्चवर्णीय समाजातील व हिंदू समाजातील स्त्रियांनाच फायदेशीर आहे हाही भ्रम दूर झाला.

राखीव धोरणांचा स्त्रियांच्या प्रतिनिधीत्वावर अगदी स्पष्टपणे प्रभाव पडलेला आहे. पंचायतीमधील महिलांच्या राखीव जागामुळे महिला राजकीय प्रक्रियेत सहभागी होत आहेत व त्यामार्फत ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता गृहे इ. वर जास्त गुंतवणुक होत आहे. महिला प्रतिनिधी ह्या महिलांच्या समस्यावर पुरुषापेक्षा जास्त लक्ष केंद्रीत करीत आहेत व प्रसंगी त्याबाबत कायदे करण्यातही यशस्वी होत आहे.

पंचायत राज्यामध्ये महिलांना येणाऱ्या अनुभवामुळे त्यांच्यात बदल होत आहे. त्यांच्यात स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होत आहे. ग्रामीण भागातील साधनसंपत्ती व कार्यालये यावरील नियंत्रणामुळे व पुरुषवर्गाने दिलेल्या आव्हानांना सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यातील आत्मविश्वास वाढत आहे. त्यांची शैक्षणिक पातळी कमी असून देखील त्या राजकीय व सनदीनोकरशाही रचना यशस्वीपणे हाताळत आहेत. त्या पंचायतीमधील बैठकांच्या उपस्थितीचे नियमित अहवाल देतात. ग्रामविकासावर लक्ष केंद्रीत करतात. राजकीय विषय सूची वर दारुबंदी व गृहकलह इ. प्रश्न घेतात. राजकीय प्रक्रियेत पारंपारिक म्हणजे जात/धर्म/नितीमत्ता इ. विषय घेतले जात असत. परंतु महिला या पारंपारिक विषयापासून दूर जात असून गतिमान व्यवस्थेत ग्रामीण भागाची निकड विचारात घेवून त्यासाठी राजकीय प्रक्रियेचा वापर करीत आहेत.

उदा. मेटीखेडा (Metikheda) महाराष्ट्र राज्य यवतमाळ जिल्हा येथे कितीतरी दशकात काहीही काम झाले नव्हते. 1998 मध्ये महिलांचा पंचायतीमध्ये समावेश झाल्यानंतर त्यांनी त्या ग्रामीण भागाचा संपूर्ण कायापालट केला. त्यांनी पाणीपुरवठा योजना, शाळांसाठी जादा खोल्या, इंधन व स्वच्छतागृहे इ. सवलती पुरविल्या. त्यामुळे तेथील स्त्रियांवरील ताणतणाव कमी झाला.

कुलटीक्री (Kultikri) पं. बंगाल येथील पंचायतीमधील स्त्रियांनी रोजगार हमी योजनेतंर्गत

उत्पन्न निर्मितीसाठी भाडे तत्त्वावर अनेक कामे हाती घेतली. उदा. टाकाऊ भूमी विकास, जलकृषीसाठी लहान तळी, कर्जपरतफेडीसाठी संघटना, रस्ते बांधणी, ट्यूब वेल्स् इ. होय. तेथील सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्या भागातील 100 टक्के साक्षरता होय.

सोनाभाद्रा (Sonabhadra) उत्तर प्रदेश येथील महिलांचे 40 संघ स्थापून प्रत्येकांनी 10 खेडी व्यापून तेथे 73 व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये व त्यातील महिलांचे स्थान यावर रचनाबध्द कृती यशस्वीरित्या केली. यात समाविष्ट असणाऱ्या महिलांना त्यांचे स्वत:चे कुटुंब व गुरेढोरे यांची स्पष्ट कल्पना होती. आणखी महत्त्वाचे म्हणजे त्यांनी त्या भागात येणाऱ्या दारुवर बंदी घालण्याचा निर्णय एकमताने घेतला.

स्त्रिया व पुरुष यांच्यात निरनिराळ्या धोरणांच्या पसंती क्रमाबद्दल तफावत दिसून येते. विकसित देशातील स्त्रिया या उदारमतवादी धोरणांना पाठिंबा देतात व लिंगभेद तफावत कमी करणाऱ्या धोरणांवर भर देतात. भारतातील ग्रामीण भागातील महिलांची प्राथमिक जबाबदारी इंधन गोळा करणे, पाणी भरणे, लहान मुलांची काळजी घेणे ही असते. स्त्रियांच्या उत्पन्नापेक्षा त्यांनी बालसंगोपन उत्तमरित्या करावे हीच अपेक्षा असते. यामुळे भारतात पंचायतराज्यातील महिलांच्या सहभागामुळे खरोखरच महिला सबलीकरण झाले काय? हाही प्रश्न आहे.

या घटना दुरुस्तीमुळे स्त्रियांना स्वयंपाकघरातून एकदम उचलून राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात नेले. मात्र त्यांना सार्वजनिक जीवनाबद्दल कोणतेही प्रशिक्षण किंवा अनुभव नव्हता. स्त्रियांना सत्ता मिळाली; मात्र त्या राजकीय घटक दिसून येत नाहीत. बरेचदा या निवडून आलेल्या स्त्रिया पिता/पती/पुत्र यांच्या हातातले बाहुले म्हणून प्रतिनिधीत्व करतात. या स्त्रिया ग्रामपंचायत सभांना अज्ञानामुळे किंवा भितीपोटी उपस्थित रहात नाहीत. जेथे स्त्रिया सरपंच आहेत तेथे त्या स्त्रियांच्या पतींना 'सरपंच पती' म्हणतात व तेच आपल्या पत्नीच्या बदल्यात पंचायतीची कामे पाहतात. सरपंच स्त्रियांना विचारलेल्या प्रश्नांना बरेचदा त्यांचे पतीच उत्तर देतात. भारतातील ग्रामीण भागातील पंचायती राज्यामधील महिलांचा 33 टक्के राखीव वाटा म्हणजे स्त्रियांचा मानसिक, वैचारिक, सामाजिक दर्जा उंचावणे होय. परंतु ग्रामीण भागातील अशा स्त्रियांचे पती व इतर पुरुषवर्ग हा स्त्रियांच्या या नव्या दर्जाबद्दल अजूनही आपली सकारात्मक सहमती दर्शवित नाहीत. जेव्हा जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायती कामासाठी सरपंच स्त्री ही पुरुषासोबत बाहेरगावी जाते. तेव्हा तिच्याकडे चांगल्या नजरेने पाहिले जात नाही. काही सरपंच महिलांचे अनुभव येथे स्पष्ट करताना या विधानाची सत्यता पटते.

रत्नमाला वैद्य 1994 पासून ग्रामपंचायतीच्या निवडणुका जिंकत होती. तिने ग्रामविकासाची कामे चांगली केली होती. लोकांनी तिच्या कामाचे कौतुकही केले होते. परंतु जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्यावेळी विरोधी पक्षांनी तिच्याबद्दल वाईट अफवा पसरावयाला सुरवात केली. त्यांनी एक पुस्तिकाही काढली त्यात तिचे चारित्र्य वाईट आहे, तिला दोन पती आहेत अशा अफवा पसरविल्या. या सर्वांचा परिणाम ती निवडणुकीत पराजित झाली.

माया (वदवळ, ग्रामपंचायत सदस्य) ही महिला संघटनेच्या कार्यक्रमाला उपस्थित

राहण्यासाठी आपल्या महिला सहकाऱ्यांबरोबर लातूरला गेली. तेथे हा कार्यक्रम एका हॉटेलच्या हॉलमध्ये आयोजित केला होता व त्या हॉटेलमध्ये लॉजिंग व बोर्डींगच्या सवलती होत्या. एका शाळा शिक्षकाने मायाला लॉजमध्ये जाताना पाहिले व त्याने त्या दोन महिलांबद्दल अत्यंत हीन दर्जाची अफवा उठविली. याचा परिणाम म्हणून ग्रामस्थ तिच्याकडे संशयित नजरेने पाहू लागले. इतर स्त्रियांनी तिच्याशी बोलणे बंद केले. याचा परिणाम संघटनेचे काम आजपर्यंत ठप्पच आहे.

कोटगळ (महाराष्ट्र राज्य, जिल्हा गडचिरोली) येथे 2002 मध्ये प्रथमतःच ग्रामपंचायतीत मागासवर्गीय 11 उमेदवार निवडून आले. त्यावर्षी सरपंचपद स्त्रियांसाठी राखीव होते. ज्योती मेसराम ही सरपंचपदी निवडून आली. ती SC गटातील होती. उच्चवर्गीय गटातील लोकांना याचा मोठ्ठा धक्का बसला. ते पंचायतीच्या कामात अडथळे आणू लागले. डिसेंबर 2002 मध्ये पहिली ग्रामसभा भरली. त्यात वित्तीय व्यवहारातील सरपंच व सेक्रेटरी यांचे अधिकार हा विषय विषयसूचीवर जेव्हा आला त्यावेळी विरोधी गटाने त्यांचा हा अधिकार सक्तीने नाकारला. ज्योती मेसरामच्या सरपंच पदालाही नकार दर्शविला. तेंव्हा महिलांनी आत्मविश्वासाने स्वतंत्र्यरित्या निर्णय घेवून कामास सुरवात केली असता विरोधी पक्षांनी दुष्कृत्य ताबडतोब चालू केले. इतकेच नव्हे तर त्याचा परिणाम दहशतीपासून शारिरीक इजेपर्यंत झाला.

सुनिता आघम (महाराष्ट्र राज्य, ग्राम पांढरी) हिने सरपंच पद स्वीकारल्यावर पहिल्या ग्रामसभेत सेक्रेटरी हा प्रशासकीय कामाची माहिती देत असतांना माजी सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुनिता आघमचे सरपंचपद व सेक्रेटरी यांच्या नियुक्त्या नाकबूल केल्या. ग्रामसभा स्थगित करण्याची मागणी केली. एवढ्यावरच न थांबता मोठा हंगामा करुन सरपंचाच्या डोळ्यात व इतरांवर मिरची पूड टाकली. त्यांना शिवीगाळ करुन मारहाण करू लागले.

नागपूर जिल्ह्यातील सरपंच महिलेचा ग्रामपंचायतीमधील सेक्रेटरीने लैंगिक छळ करण्यास सुरवात केली. त्याने तिला अश्लिल पत्रे लिहण्यास सुरवात केली. अशा प्रकारची पत्रे वारंवार येवू लागल्याने त्या महिलेने आत्महत्या केली.

वरील सर्व विश्लेषणावरुन असे दिसते की वास्तविक पहाता समाजरथाची दोन चक्रे म्हणजे स्त्री पुरुष होय. त्यांच्यात समानता असणे आवश्यक आहे. परंतु देश विकसनशील असो वा विकसित असो सामाजिक स्तरावर लिंगभेद आहेच. मात्र विकसनशील देशात याचे स्वरुप जास्तच विकृत आहे. उदा. भारत. भारतीय स्त्री ही लिंगभेदाची भक्ष बनली आहे. भारतीय स्वातंत्र्याला 60 वर्षेपूर्ण झाली. महिलांसाठी घटनात्मक तरतुदी व कायदेकानून केले गेले. शासकीय योजनेतून महिला सबलीकरणाचे प्रयत्न चालू आहेत. परंतु समाजात भारतीय स्त्रीला घरातील सोज्वळ पत्नी व प्रेमळ माता असेच तिचे अस्तित्त्व बहुतांशी मान्य केले जाते.

73 व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण महिलांना शासकीय यंत्रणेत सहभाग घेण्याचा मार्ग खुला केला. त्यातर्फे ग्रामीण महिलांचे सबलीकरण होणार अशी अपेक्षा आहे. परंतु त्यांच्या या नव्या भूमिकेचा स्वीकार खरोखरीच ग्रामीण समाजाने केला आहे काय? ज्या ठिकाणी खरोखरच महिलांनी ग्रामीण विकासाची उत्तम कामगिरी केली आहे. तेथे संपूर्ण गाव (स्त्री व पुरुषासह) त्यांच्या पाठीशी उभा

असणार. परंतु सरपंच महिलांच्या कटू अनुभवातून असे दिसते की, त्या गावातील लोकांनीच त्यांना समजावून घेतले नाही. त्यांच्यावर विश्वास ठेवून जबाबदारी टाकली नाही. तर प्रसंगी सर्व गाव (स्त्री व पुरुषासह) त्यांच्या विरोधी जातो. सरपंच स्त्रियांबद्दल उठविलेल्या खोट्या अफवावर सर्वच (स्त्रिया देखील) विश्वास कसा ठेवतात? याचा अर्थ असा की, त्या गावातील लोकांचीच वैचारिकता व मानसिकता बदललेली नाही. गतिमान काळाची गरज ओळखून नवे व चांगले बदल स्वीकारण्याऐवजी ते त्याच त्याच बुरसटलेल्या विचारात बुडून जातात.

या सर्वांचा परिणाम असा होतो की, स्त्रियांची राजकारणात येण्याची मानसिकता असत नाही व जर त्यांनी राजकारणात येण्याची मानसिक तयारी केली तर त्यांच्या मार्गात कौटुंबिक, सामाजिक व खुद्द राजकीय पक्ष देखील अडथळे आणतात. स्त्रिया कष्टाळू, प्रामाणिक व मनापासून काम करीत असल्याने राजकीय पक्षातील लोकांना स्वतःला तिकीट न मिळता स्त्रियांना मिळेल याची भीती वाटते. या सर्वांवरुन असा निष्कर्ष काढता येईल की, पंचायतराज्यांच्या माध्यमातून ग्रामीण महिला सबलीकरण व्हावे असे वाटत असले तर संपूर्ण गावाचा कायापालट झाला पाहिजे. त्यात वैचारिक, मानसिक, शैक्षणिक व आर्थिक असा सकारात्मक बदल झाला पाहिजे. ज्या महिलेवर अन्याय होतो तिच्या पाठीशी सर्वांनी (स्त्री व पुरुषासह) खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. महिला प्रशासकाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोण बदलला पाहिजे. महिलांच्या उत्तम कामगिरीचे स्वागत केले पाहिजे. त्याचबरोबर या महिलांनी शैक्षणिक दर्जा उंचावला पाहिजे. मानसिक व वैचारिक खंबीरता निर्माण केली पाहिजे आणि असा बदल होत गेला तरच ७३ व्या घटनादुरुस्तीचे अपेक्षित फळ मिळेल. अन्यथा पंचायत राज्यामध्ये महिलांचे संख्यात्मक प्रमाण वाढलेले दिसले तरी त्यांच्या कृतिशील सहभागाबद्दल शंकाच निर्माण होईल. 73 व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज्यांमध्ये पुरुषवर्ग हा घरातील महिलांच्या माध्यमातून (पडद्यामागून) अधिकच सबल होत जाईल यात शंका नाही.

**संदर्भ :**


1) Borain M.P.
'Empowerment of Rural Women - The Deterrents and Determinants' Concept Publishing Company, New Delhi,110059 First Published 2008 Page No. 202

2) Thakur Anilkumar and Dilip Kumar: Gender Empowerment and Development Deep and Deep Publications Pvt. Ltd., F-159 Rajouri Garden, New Delhi, 110027, 2008 - Indian Economic Association Page No. 442-445

3) Saikia Nandita : Indian women
A socio - Legal Perspective,Serials Publications,New Delhi, First Published - 2008 Page No. 18

4) Sinha Ajitkumar : New Dimensions of women emprwerment; Deep and Deep Publications Pvt.Ltd., F-159 Mathur Krisha Foundations (For Economic and Social Opportunity and Human Resource Development (MAKER) Page No.47-74

5. Information from Nt
www.iknowpolitics.org / en / node /2003

# सहकारी संस्था आणि पर्यावरण संरक्षण

**श्री.मल्लू राजाराम खोत**
संशोधक विद्यार्थी,अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
भ्रमणध्वनी - 9881089377

**प्रस्तावना**

एकविसाव्या शतकात ज्या अनेक संकटांना तोंड द्यावे लागणार आहे, त्यात सर्वात मोठे संकट म्हणजे पर्यावरण प्रदूषण होय. मानवाचा आर्थिक विकास होणे गरजेचे आहे, पण त्याचबरोबर मानवाने आपले जीवन अधिक सुखी व समृध्द करण्यासाठी जमीन, पाणी, वनस्पती व प्राणी यांचा वापर इतक्या वेगाने आणि अनिर्बंधपणे केला आहे की त्यामुळे पृथ्वीवरील पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात ढासळला आहे.

नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरण समस्या सोडविण्यासाठी जगातील प्रत्येक देश वेगवेगळे प्रयत्न करीत आहेत, विविध उपाय योजत आहेत. याकरिता जून 1992 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने ब्राझीलमधील रिओडे जानेरो येथे पर्यावरण व विकासावर दुसरी जागतिक परिषद भरविली होती. त्या परिषदेतील ठरावाचे पालन प्रत्येक राष्ट्राने करावे असे ठरले होते.

प्रस्तुत शोधनिबंध हा पर्यावरण संरक्षणात सहकारी संस्थांचे योगदान याच्या संबंधित आहे. या शोधनिबंधात भारतातील सध्याच्या सहकारी संस्थांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. या निबंधाच्या दुसऱ्या भागात विकसित आणि अविकसित अर्थव्यवस्थेतील पर्यावरण संरक्षणातील सहकारी संस्थांचे योगदान याविषयी चर्चा केलेली आहे. तसेच सहकारी संस्था पर्यावरण संरक्षणाकरिता कोणत्या क्षेत्रात कार्य करतील हेही स्पष्ट केले आहे. शोध निबंधाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्रातील सहकारी संस्थांनी पर्यावरण संरक्षणासंबंधी कोणते कार्य केले आहे ते स्पष्ट केले आहे.

**सहकारी संस्थांचे स्वरूप :**

'सहकार' या संकल्पनेचा शब्दशः अर्थ समूहशः एकत्रितपणे काम करणे. सहकारी संस्थेत एकत्र काम करणे असा आहे. म्हणजेच नफा तोटा

दोन्हीत भागीदारी करणे होय. मात्र सहकार ही संज्ञा आर्थिक क्षेत्रात नंतरच्या काळात उदयास आली. सहकारी संस्थांचा गाभा लहान अथवा छोटी आर्थिक एकके एकत्रितपणे परस्परांच्या सहकार्याने काम करतात यात आहे. सध्याच्या सहकारी संस्थांची मुळे मध्ययुगीन युरोपीय गील्ड, औद्योगिक क्रांतीच्या पूर्वकाळातील इंग्लंडमधील परस्पर मदत गट आणि समाजवादावर आधारित काही प्रयोगामध्ये आढळतात.

सहकाराशी सुरूवात इंग्लंडमध्ये झाली आणि नंतर 60-70 वर्षामध्ये इतर देशात सहकारी तत्त्वांचा प्रसार झाला. भारतात सहकारी संस्थांची मुहूर्तमेढ 1904 साली सरकारच्या पुढाकाराने रोवली गेली. महाराष्ट्रातील सहकार देशातील कोणत्याही राज्यातील सहकारी चळवळीपेक्षा संस्थांची संख्या, एकूण सभासद, वसूल भाग भांडवल, खेळते भांडवल व त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. देशात लोकशाही मार्गाने सरकारचे नियंत्रण असणाऱ्या आणि कायद्याच्या चौकटीत राहून काम करणाऱ्या एकमेव संस्था म्हणजे ग्रामपंचायत व सहकारी संस्था होय. या संस्थांचा उपयोग पर्यावरण संरक्षणासाठी कसा करता येईल ते पुढे स्पष्ट केले आहे.

### सहकारी संस्था आणि पर्यावरण संरक्षण :

सहकारी संस्था पर्यावरणाचे संरक्षण कसे करू शकतात याबाबत जागतिक पातळीवरील सहकारी संस्थांचे महासंघ विचार करीत आहेत. पर्यावरण आणि चिरंजीव सहकार यावर एक प्रादेशिक परिषद थायलंडमध्ये मे 1990 मध्ये आयोजित केली होती. या परिषदेत खालील ठराव संमत करण्यात आले.

1. प्रत्येक माणसाला स्वच्छ आणि समतोल पर्यावरण प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे.
2. भविष्यकाळातील पिढ्यांचे पृथ्वीवरील नैसर्गिक संपदेचे अपहरण होता कामा नये.
3. प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संवर्धन व त्याची वृध्दी करणे हे आपले कर्तव्य आहे असे समजले पाहिजे.

परिषदेच्या शेवटी सभासद राष्ट्रांनी अशी शपथ घेतली की, प्रत्येक देशातील सहकारी संस्थांनी वरील ठरावांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावयाची आहे. यावरून सहकारी संस्था देखील जागतिक पातळीवर पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्नशील आहेत असे दिसून येते.

### आंतरराष्ट्रीय सहकारी संघ आणि पर्यावरण संवर्धन:

सन 1995 मध्ये मँचेस्टर येथे जी सहकाराची सुधारित तत्त्वे आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने मान्य केली आहेत त्यामध्ये सातवे तत्त्व 'सामाजिक बांधीलकी अथवा समाजाची काळजी घेणे' अशा तत्त्वांचा नव्यानेच समावेश केला आहे. या तत्त्वात समाजातील महिला, बालके, वृध्द आणि पर्यावरण यांची सहकारी संस्थांनी काळजी घेतली पाहिजे असा उल्लेख केला आहे. यावरून सहकारी चळवळीची पर्यावरणाबाबतची व्यक्त केलेली जबाबदारी स्पष्ट होते. सन 1972 आणि 1992 मध्ये झालेल्या दोन जागतिक पातळीवरील पर्यावरणातील परिषदांमध्ये जाणिवपूर्वक सामूहिक प्रयत्नावर भर दिला होता. तळागाळातील प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लावतात हे मान्य झाले आहे.

**पर्यावरण संवर्धनात विविध देशांतील सहकारी संस्थांचा क्रियाशील सहभाग :**

खालील परिच्छेदामध्ये सहकारी संस्था विविध देशात पर्यावरण संवर्धनासाठी कशा प्रकारे मदत करू शकतात याचा आढावा घेण्यात आला आहे.

कॅनडामधील सहकारी संस्था टाकाऊ प्लॅस्टिक वस्तू, टाकाऊ टायर, ट्युब्ज तसेच वापरलेले कार्यालयीन निरूपयोगी कागद यांचे पुनर्चक्रीय प्रक्रियेतून वापरायोग्य वस्तू तयार करून पर्यावरण प्रदूषण टाळत आहेत. अशा वस्तू विकून जो पैसा प्राप्त होतो, तो पर्यावरण निधीत जमा केला जातो. तसेच तेथील सहकारी संस्था सभासद व बिगर सभासद यांच्यासाठी जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा व परिसंवाद भरवितात. असे करण्यासाठी पर्यावरणवादी व सहकारी कार्यकर्ते एकत्र काम करतात. थोडक्यात पर्यावरण संरक्षणासाठी निधी कसा उभा करावा याचे अनुकरण भारतासारख्या देशाला करता येईल.

झेकोस्लाव्हियामधील सहकारी संस्था जंगलाच्या संरक्षणासाठी कार्यरत झालेल्या आढळतात. तसेच शहरी गटारे, त्या गटातील पाण्याची विल्हेवाट आणि शहरातील बागा यांच्यासाठी आर्थिक मदत करीत आहेत. तेथील शेतकरी सहकारी संस्था आपल्या सभासदांना पर्यावरण सहयोगी शेतीच्या पध्दती व खतांचा वापर याबाबत मार्गदर्शन करीत आहेत.

डेन्मार्कमधील सहकारी संस्थांनी आम्लगर्जन्य, ओझोन वायूरक्षण आणि हरितगृह परिणाम याबाबतची मोहिम हाती घेतली आहे. तेथील राष्ट्रीय पातळीवरील दूध महासंघ कमी प्लॅस्टिक व ब्लिचिंग पावडर यांचा वापर करीत आहे. तसेच आपल्या उत्पादनावरील वेस्टनावर पर्यावरण मैत्री असे लिहतात.

फिनलंडमधील सहकारी संस्था पर्यावरणसंवर्धन बाबतची जाहिरात वर्तमानपत्रातून करतात तसेच उत्पादकाशी संपर्क साधून प्रदूषण टाळण्यासाठी प्रयत्न करतात.

जपानमधील सहकारी संस्थांचे कार्य अधिक व्यापक व अनुकरणीय आहे. जपानमधील ग्राहक सहकारी महासंघ जे आपल्या भांडारातून कागद विकतो तो 100 टक्के वापरलेल्या कागदापासून तयार करीत असतो. या संघाने आपल्या आर्थिक कार्याबरोबर पर्यावरण विकास हे धोरण मानले आहे. शेती उत्पादन, पिण्याच्या पाण्याचे जलाशय यासाठी देशात जागोजागी फलक लावण्यात आले आहेत. असे फलक उत्पादक व ग्राहक यांना मार्गदर्शन करीत आहेत. जपानमध्ये नैसर्गिक शेतीकडे सर्वांचा कल दिसू लागला आहे. काही रासायनिक खतांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. तेथील महिलांच्या सहकारी संस्था विशेषत: महिलामध्ये पर्यावरण संवर्धनाचा प्रचार व प्रसिध्दी करतात.

वरील देशाप्रमाणेच अमेरिका, जर्मनी, फ्रान्स यासारख्या देशातील सहकारी संस्था पर्यावरण संरक्षणात गुंतल्या आहेत. तथापि, भारतासारख्या विकसनशील देशात अद्यापही म्हणावे तितके प्रयत्न सहकारी संस्थांनी केलेले दिसत नाहीत. जे काही प्रयत्न करण्यात आले आहेत त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे –

**पर्यावरण संवर्धनातील भारतातील सहकारी संस्थांचे कार्य**

भारतात विविध प्रकारच्या सहकारी

संस्थांनी पर्यावरण संवर्धनात अल्पसे कार्य केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खत कारखाने, दुग्ध संस्था आणि साखर कारखाने यांचा उल्लेख करता येईल. इंडियन फार्मर्स फर्टिलायझर को.ऑप.लि. संस्थेने उत्तर प्रदेशात सुलतानपूर जिल्ह्यात 15 हेक्टर ओसाड जमिनीवर वनीकरण केले आहे. या कामात त्या भागातील शेतकऱ्यांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे. भारतात अशा लाखो हेक्टर ओसाड जमिनीवर सहकारी संस्थांना वननिर्मिती करता येईल. यातून येणारे उत्पन्न सहकारी संस्थेला भांडवल पुरवठा करू शकेल.

भारतात गुजरात राज्यात आनंद येथे राष्ट्रीय वृक्ष लागवड सहकारी महासंघ वनविकासाच्या कामात कार्यमग्न आहे. देशात आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओरिसा, गुजराथ व महाराष्ट्र या राज्यात वृक्ष लागवड सहकारी संस्था पर्यावरण संवर्धनाचे कार्य करीत आहे. या कार्यात आणखी काही राज्ये सामील होण्याची गरज आहे. अलीकडे शासनाची सहकारी संस्थांना होणारी आर्थिक मदत खंडीत होत आहे. अशा परिस्थितीत हा मार्ग अत्यंत लाभदायक ठरणार आहे. इफ्कोने देशात असंख्य ठिकाणी सामाजिक वनीकरणाचे कार्यक्रम राबविले आहेत. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशातही जंगल सहकारी संस्था इफ्कोच्या प्रयत्नांनी काम करीत आहेत. तसेच मच्छीमार संस्थांनीदेखील आपल्या सभासदांना मासेमारी कशी करावी, इंजिनाची देखभाल करून पाणी प्रदूषण कसे टाळावे, मासळी उतरवण्याचा प्लॅटफॉर्म स्वच्छ कसा ठेवावा. माशांची वाहतूक व साठवणूक प्रदूषणाविरहीत कशी करावी याबाबतचे धडे राष्ट्रीय मच्छीमार सहकारी संघ आपल्या सभासद संस्थांना देत आहे.

गृहनिर्माण सहकारी संस्थादेखील नागरी भागात पर्यावरण संवर्धनाचे काम करू शकतात. त्या आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व घरांच्या सभोवताली वृक्षारोपण कार्यक्रम राबवू शकतात. तसेच सांडपाण्याची व्यवस्था, घन कचऱ्याची विल्हेवाट, स्वतःच्या जबाबदारीवर लावून टाकतात. आपल्या कार्यक्षेत्रातील मोकळ्या जागांचा वापर व त्याची देखभाल करू शकतात. त्यासाठी या संस्थाकडे काही निधीची व्यवस्था सहजपणे करता येणे शक्य असते. सहकारी संस्थात अनेक धर्मजाती व भाषांचे लोक एक मोठे कुटुंब म्हणून राहत असतात. त्यांना सहकारी संस्थेने एकत्रित आणलेले असते. त्यामुळे ही बाब तेथे सहज शक्य असते.

## महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे पर्यावरणातील कार्य

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांनी पर्यावरण संवर्धनास आता कुठे प्रारंभ केला आहे. त्याचा उल्लेख खालीलप्रमाणे करता येईल.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी पर्यावरण संरक्षणापेक्षा पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे असे म्हटले जाते. साखर कारखान्यांनी आपल्या सांडपाण्याची व मळीची विल्हेवाट योग्य प्रकारे न लावल्यामुळे कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा व अहमदनगर या जिल्ह्यातील नद्यांचे पाणी कारखान्यामुळे प्रदूषित झाले आहे. याबाबतचा ठपका प्रदूषण नियंत्रण मंडळाने आपल्या पडताळणीवरून ठेवला आहे. तरीदेखील काही साखर कारखान्यांनी आपल्या मळीची विल्हेवाट योग्य प्रकारे लावली आहे. उदा. वारणा सहकारी साखर कारखान्याने मळी व सांडपाण्यापासून

वीजनिर्मिती व खते निर्माण केली आहेत. तसेच अकलूज,गडहिंग्लज येथील साखर कारखान्यांनी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले आहे. तसेच जवळजवळ सर्वच साखर कारखान्यांनी सभासदांना अनुदान देवून गोबर गॅसची निर्मिती करून वृक्षतोड व शेणखताचा अपव्यय टाळला आहे. प्रत्येक सहकारी साखर कारखान्याने प्रत्येक टनामागे 2 ते 5 रू. ''भाग विकास निधी'' म्हणून बिलातून निधी जमा करतात. या निधीतून काही भाग प्रदूषण नियंत्रण पर्यावरण संवर्धन यासाठी वापरल्यास ग्रामीण भागातील पर्यावरण सुधारण्यास मदत होईल.

**सारांश:**

सहकारी संस्था पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे हातभार लावू शकतात. ''पृथ्वी वाचवा आणि ती जगण्यासाठी योग्य बनवा'' असा संदेश त्या देवू शकतात त्यासाठी पुढील मार्गाचा वापर करता येईल.

1. सभासद, संचालक मंडळ व नोकर यांच्यात जागृती निर्माण करणे.
2. आपल्या अहवालातून व सभातून पर्यावरणाबाबत माहिती देणे.
3. वर्तमानपत्रे, मासिके यांच्यातून पर्यावरण बचाव आंदोलनाची माहिती देणे.
4. पर्यावरण संवर्धनात गुंतलेल्या स्वयंसेवी संस्था, तरूण मंडळे व शाळा यांना आर्थिक मदत करणे.
5. रासायनिक खताऐवजी जैविक खतांच्या वापरावर अधिक भर देणे.
6. रासायनिक किटकनाशकांऐवजी अमृतपाणी अंगास आणि गोमूत्र यांचा वापर करून नैसर्गिक शेती करणेस प्रोत्साहन देणे.

वरीलप्रमाणे सहकारी संस्था आणि पर्यावरण याबाबत खूप माहिती सांगता येईल. परंतु सहकारी संस्थांतील कार्यकर्त्यांनी पर्यावरण संवर्धनाकडे म्हणावे तितके लक्ष दिले नाही. केवळ सभासदांना नफ्याचे वाटप केले की आपले कर्तव्य संपले अशा भूमिकेत कार्य केले जाते. आपल्या संस्थेने एकूण नफ्यातील किमान 2% इतका जरी नफा पर्यावरण संवर्धनासाठी दरवर्षी खर्च केला तरी पुष्कळसे काम या संस्थाकडून करता येईल. यासाठी सहकारी कायद्यात नफा वाटणीच्या कलमामध्ये सुध्दा उल्लेख असावा असे वाटते. सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणातही पर्यावरण शिक्षणाचा समावेश करण्याची गरज आहे. कारण भारताच्या सुप्रीम कोर्टाने सन 1990 मध्ये एका आदेशाद्वारे सर्व शिक्षणात पर्यावरणाचा समावेश सक्तीचा असावा असा निर्णय दिला आहे.

**संदर्भ –**


1. इंडियन को ऑप मुव्हमेंट, नॅशनल को ऑप युनियन ऑफ इंडिया न्यु दिल्ली 1998
2. 2.46 वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह पुस्तिका महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे 1990.
3. मोहन शंकर देशपांडे : देशपांडे तंत्र प्रकाशिका सौ. पुष्पा मो. देशपांडे, खेडे आजरा नोव्हे. 1997 पा. 184.
4. दमन प्रकाश रोल्स को ऑपरेटिव्हज कॅन प्ले इन प्रोटेक्टिंग द एनव्हायरमेंट आसीए न्यु दिल्ली 1990.
5. मिनिस्टरी ऑफ एनव्हारयनमेंट अ‍ॅण्ड फॉरेस्टस् गव्हर्नमेंट ऑफ इंडिया एनव्हायरनमेंट अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट हँडबुक पान 14
6. ला.मा. भोळे सहकारी संस्थांचे आर्थिक सामाजिक विकास प्रक्रियेतील योगदान अर्थसंवाद जाने. मार्च 2008 पान 328.

# पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश

## भारतातील सेवा कर : एक टीकात्मक मूल्यमापन

**संतोष यादव**
भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे,
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोल्हापूर
भ्रमणध्वनी - 9921160208

(संशोधकाने प्रा.(डॉ.) जे.एफ. पाटील, भूतपूर्व प्राध्यापक, रा.ना. गोडबोले अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली "Service Tax in India: A Critical Evaluation" या विषयावर शिवाजी विद्यापीठाची पीएच्.डी. पदवी प्राप्त केली आहे, त्या पीएच्.डी. प्रबंधाचा हा सारांश)

### १.प्रस्तावना :

सेवा कर-एक महत्त्वाचा कर आणि भविष्यातील उत्पन्नाचे एक प्रमुख साधन - 1994-95 च्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये सुरूवात झाल्यानंतर, सेवा करामध्ये गेल्या 13 वर्षात अतिशय महत्त्वपूर्ण बदल घडून आलेले आहेत. सेवा कराच्या जाळ्यात अधिकाधिक सेवा आणण्यासाठी प्रत्येक वर्षी करपात्र सेवांची संख्या वाढते आहे.

सेवा कर हा सेवांच्या पुरवठ्यावर आकारला जाणारा एक कर आहे.हा एक अप्रत्यक्ष कर असून सेवा पुरवठादार सेवा घेणाऱ्याकडून हा कर वसूल करू शकतो.

कराचा पाया विस्तारणे, उत्पन्नामध्ये वृध्दी करणे आणि राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे ही सेवा कर लागू करण्यामागची मुलभूत उद्दिष्टे आहेत.

इतर औद्योगिकदृष्ट्या संपन्न राष्ट्रांशी तुलना करता भारतामध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनात शेती आणि औद्योगिक क्षेत्राच्या हिस्स्यापेक्षा सेवा क्षेत्राचा वाटा वाढत्या प्रमाणात वाढत गेलेला दिसतो. स्थूल देशी उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचे महत्त्व वाढलेले दिसून येते. 1950-51 मध्ये स्थूल देशी उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा 28 टक्के होता; तो वाढून 1990-91 मध्ये 41 टक्के,

2000-01 मध्ये 49.5 टक्के आणि 2005-06 मध्ये 60 टक्के झाला. 1991-92 ते 2000-01 या दहा वर्षाच्या कालावधीत भारतामध्ये सेवा क्षेत्रात सरासरी वार्षिक मूल्य वृध्दीची वाढ 7.9 टक्के झालेली दिसून येते. साहजिकच, एवढे मोठे क्षेत्र कराशिवाय राहू शकत नाही. तथापि, फायनान्स ॲक्ट 1994 अन्वये 5 टक्के दराने 1994 मध्ये सेवा कराची पहिल्यांदा सुरूवात झाली. सुरवातीला फक्त तीन सेवांवर सेवा कर आकारून त्याची 1 जुलै 1994 पासून अंमलबजावणी केली गेली. त्यानंतर सेवा कराचे जाळे प्रत्येक वर्षी वाढतच असल्याचे दिसून येते. 2007-08 च्या अर्थसंकल्पानुसार सेवा पुरवठादाराला 12 टक्के सेवा कर आणि 3 टक्के शैक्षणिक अधिभार असा 12.36 टक्के सेवा कर भरावा लागतो. 2008-09 च्या अर्थसंकल्पानुसार अलीकडे उत्पादक ठरलेल्या सेवा कराच्या बाबतीत नव्या चार सेवांचा समावेश करण्यात आलेला आहे. या बहुतेक सेवा वित्तीय बाजाराशी संबंधित आहेत. सेवा कराची करमुक्त मर्यादा 8 लाखावरून 10 लाख करण्यात आलेली आहे.

सरकारने सेवा कर नियम 1994 तयार केला; ज्यामध्ये कार्यपध्दती, नियम आणि नियंत्रणाचा समावेश आहे. केंद्रीय अबकारी विभाग सेवा कराची प्रशासकीय रचना पाहतो.

1994-95 च्या अर्थसंकल्पात त्यावेळचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी तीन सेवांवर (शेअर बाजारातील दलाली, टेलिफोन सेवा आणि विमा प्रिमियम) 5 टक्के दराने कर आकारून सेवा कराची सुरूवात केली. वेगवेगळ्या सेवांवर सेवा कर आकारून सेवा कराची व्याप्ती वाढवली जात आहे. सध्या 2008-09 च्या अर्थसंकल्पानुसार 107 करपात्र सेवावर सेवा कर आकारला जातो.

1994-95 मध्ये 3943 सेवा करदाते होते आणि 410 कोटी रू. कर संकलन झाले. 1999-2000 मध्ये 26 सेवांवर कर आकारण्यात आला. त्यावेळी सेवा करातून मिळणारे उत्पन्न 2072 कोटी रू. होते. 2000-01 मध्ये 27 नवीन सेवावर सेवा कर आकारण्यात आला. त्यावेळी 1,15,495 करदाते होते आणि 2540 कोटी रू. कर संकलन झाले. 2001-02 मध्ये 41 सेवा सेवाकराच्या जाळ्यात आणण्यात आल्या. त्यावर्षी 3305 कोटी रूपयाचे कर संकलन झाले. 2006-07 च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार 34,500 कोटी रू. कर संकलन होईल असा अंदाज होता. यावरून असे स्पष्ट दिसते की सरकारच्या कर उत्पन्नामध्ये अपेक्षेपेक्षा सर्वात मोठा एकमेव असा कर म्हणून सेवाकर उदयास येत आहे. 2006-07 या वित्तीय वर्षामध्ये नोव्हेंबर अखेर 21,779 कोटी रू. कर संकलन झाले, की जे आधीच्या वर्षातील याच कालावधीतील 65 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. 1994-95 मध्ये स्थूल कर महसूलामध्ये सेवा कराचा वाटा 0.5 टक्के होता. तो 2004-05 मध्ये 4.50 टक्के इतका झाला.

## 2.अभ्यास विषय निवडण्यामागची कारणमीमांसा :

1994-95 पासून प्रत्येक अर्थमंत्र्यांनी सातत्याने करपात्र सेवांची संख्या वाढवली आहे. 1994 मध्ये त्यावेळचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी तीन सेवांवर 5 टक्के दराने कर आकारून सेवा कराची सुरूवात केली आणि केंद्र सरकारच्या महसूलामध्ये त्या वर्षी या नवीन करामुळे 0.5 टक्के वाढ झाली. 10 वर्षानंतर म्हणजेच 2004-05 मध्ये 70 नवीन सेवांवर कर आकारला जाऊ लागला, त्यापासून मिळणारे कर उत्पन्न हे केंद्र सरकारच्या

कर उत्पन्नाच्या जवळजवळ 4.45 टक्के इतके होते. प्रत्येक सरकारच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे ही वाढ दिसून येते. त्याचबरोबर आयात-निर्यात कर आणि अबकारी कराचे स्थूल कर महसूलातील महत्त्व कमी होत असताना सरकारची वाढती गरज भागवण्यासाठी पर्यायी उत्पन्नाचा स्त्रोत शोधण्यातून या कराची वाढ झाली.

सध्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात सेवा क्षेत्राचा हिस्सा 60 टक्क्याच्या वर आहे. 1994-९५ पर्यंत सेवा कर आकारला जात नव्हता, परंतु 1994-95 पासून अधिकाधिक सेवा करांच्या जाळ्यात ओढल्या जात आहेत. त्याचबरोबर कराचा दरही वाढवला जात आहे. असे दिसून येते की, प्रत्येक वर्षी सेवा करापासून सरकारला मिळणारे उत्पन्न वाढत आहे. त्यामुळे सरकार अधिकाधिक सेवा कराच्या जाळ्यात आणण्याचा प्रयत्न करत आहे. भारतातील सेवा करावर अतिशय कमी अनुभवजन्य संशोधन काम झालेले दिसून येते. हा कर नवीन आहे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादक कर म्हणून उदयास येत आहे. यामुळे या कराची व्याप्ती वाढत आहे आणि उत्पादकतासुध्दा वाढत आहे. संशोधकाने या प्रबंधामध्ये सेवा कराचा प्रारंभ, वाढ आणि रचना यासंबंधीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर त्यामध्ये असलेल्या विविध धोरणात्मक उपायांचाही आढावा घेण्यात आलेला आहे.

### 3.अभ्यासाची उद्दिष्टे :

अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

अ) सेवा करावरील सैध्दांतिक लेखनाचा आढावा घेणे.

ब) भारतातील सेवा कराची वाढ आणि रचनेचा अभ्यास करणे.

क) केंद्र सरकारच्या स्थूल कर उत्पन्नाशी तुलना करता सेवा करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची वाढ आणि रचनेचा अभ्यास करणे.

ड) सेवा कराची उर्ध्वहरणशीलता तपासणे.

इ) भारतातील सेवा कराची प्रशासकीय व्यवस्था तपासणे.

ई) सेवा कर अधिक, उत्पादक, अधिक व्यापक, प्रशासकीय रचनेत सुलभ आणि कायदेशीर करण्यासाठी सूचना करणे.

### 4.संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे पूर्णतः ग्रंथालयातील साधनसामग्रीवर अवलंबून असून मोठ्या प्रमाणात प्रकाशित झालेली कार्यालयीन आकडेवारी, सैध्दांतिक लेखन यावर अवलंबून आहे. आवश्यक दुय्यम स्वरूपाची आकडेवारी खालील ग्रंथालयामधून संकलित केली गेली.

1. रा.ना. गोडबोले अध्यासन ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
3. गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, पुणे.
4. इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध होणारे इतर स्त्रोत.

आवश्यक दुय्यम स्वरूपाची आकडेवारी खालील स्त्रोतांच्या मधून संकलित केली गेली.

1. भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने प्रकाशित केलेली अर्थसंकल्पीय कागदपत्रे.
2. भारतीय कर सुधारणावरील विविध अहवाल.
3. भारतीय रिझर्व्ह बँक अहवाल - विशेषतः भारत

सरकारच्या अर्थसंकल्पाशी संबंधित.

4. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्रकाशित केला जाणारा अहवाल-रिपोर्ट ऑन करन्सी ॲण्ड फायनान्स.
5. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सादरीकरणापूर्वी अर्थमंत्रालयाने सादर केलेले वार्षिक आर्थिक सर्वेक्षण आणि संसदेशी संबंधित इतर कागदपत्रे.
6. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्रकाशित केले जाणारे भारतीय सांख्यिकीय पुस्तक.

विविध स्त्रोतामधून संकलित केलेली दुय्यम स्वरूपाची आकडेवारी वर्गीकरणाच्या सहाय्याने मांडण्यात आली आणि गुणोत्तर पृथ्थकरण (Ratio Analysis), संमिश्र वाढ दर(Compound growth rate), पटीत झालेली वाढ(Growth in folds), सहसंबंध(Co-Relation), प्रतिगमन (regression) यासारख्या सांख्यिकीय तंत्राच्या सहाय्याने पृथ्थकरण करण्यात आले.

### 5. अभ्यासाच्या मर्यादा :

संशोधन 1994-95 ते 2005-06 या बारा वर्षासाठी मर्यादित ठेवले आहे. असे असले तरी ज्या ठिकाणी 2006-07 ची अलीकडील आकडेवारी उपलब्ध झालेली आहे; तिचा वापर केला आहे. संशोधकाने या विषयाच्या संबंधात भारतातील 12 वर्षाच्या आकडेवारीचा अभ्यास केलेला आहे.

### 6. अभ्यासाच्या प्रकरणांची रचना :

अभ्यासाच्या प्रकरणांची रचना खालीलप्रमाणे आहे.

**प्रकरण** 1– प्रस्तावना

**प्रकरण** 2– सेवा करासंबंधी सैध्दांतिक ओळख.

**प्रकरण** 3– लेखन आढावा.

**प्रकरण** 4– भारतातील सेवा क्षेत्राची वाढ.

**प्रकरण** 5– 1994-95 ते 2005-06 या कालावधीतील आकडेवारीचे पृथ्थकरण.

**प्रकरण** 6– निष्कर्ष आणि धोरणासंबंधीच्या सूचना.

प्रकरण 1 मध्ये सेवा कराची सुरूवात, अभ्यास विषय निवडण्यामागची कारणमीमांसा, अभ्यासाची उद्दिष्टे, संशोधन पध्दती, अभ्यासाच्या मर्यादा आणि प्रकरण रचना या घटकांचे स्पष्टीकरण केलेले आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये सेवा करासंबंधी सैध्दांतिक पार्श्वभूमीचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. सैध्दांतिक आधारासाठीचे लेखन मुख्यत: राजस्वावरील मुलभूत आणि मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या क्रमिक पुस्तकातून घेतलेले आहे. या प्रकरणामध्ये सेवा या शब्दाचा अर्थ, कराचा अर्थ, सेवांवर कर, सेवा कराचा भार आणि आघात, सेवा कराची उर्ध्वहरणशीलता आणि उत्पन्न लवचिकता, सेवा कराचे परिणाम आणि कर सुधारणा – वस्तु आणि सेवा कर यांचे पृथ्थकरण केलेले आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये सेवा कर आणि त्याच्याशी संबंधीत विषयावरील लेखनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. आढाव्यासाठी घेतलेले लेखन बहुतेककरून इन्स्टिट्यूशन ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाची अलीकडील प्रकाशने, पुस्तके, पुस्तकातील लेख आणि द इकॉनॉमिक टाइम्स, बिझनेस स्टॅण्डर्ड, फायनान्शिअल एक्सप्रेस, द इंडियन एक्सप्रेस, डेक्कन हेरॉल्ड आणि द हिंदू या अग्रगण्य वर्तमानपत्रातील लेखांचा समावेश आहे. त्याचबरोबर संबंधित नियतकालिके (इकॉनॉमिक ॲण्ड पॉलिटिकल वीकली, एशिया पॅसिफिक डेव्हलपमेंट जर्नल, द वर्ल्ड इकॉनॉमी, द साऊदर्न

इकॉनॉमिस्ट, अर्थ व्हिजन, द मॅनेजमेंट अकौंटंट) वेब साईटस् आणि चर्चात्मक निबंध/अभ्यास अहवाल यांचा सुध्दा विचार केलेला आहे. हे प्रकरण भारतातील सेवा क्षेत्र, भारतातील कर सुधारणा, वस्तु आणि सेवा कराची भविष्यकालीन योजना आणि विशिष्ट करपात्र सेवा स्पष्ट करते.

सेवा क्षेत्राचे वाढते महत्त्व हे विकसनशील भारताचे अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. चौथे प्रकरण भारतातील सेवा क्षेत्राची वाढ की ज्यामध्ये वास्तव देशी उत्पादनाची क्षेत्रीय रचना, वास्तव स्थूल देशी उत्पादनामधील सेवा क्षेत्राची रचना आणि आंतरक्षेत्रीय व क्षेत्रांतर्गत वाढ दर इत्यादीचा अभ्यास करते. भारतामध्ये शेती आणि औद्योगिक क्षेत्राची वाढ अधिक जलद गतीने झालेली आहे. परिणामत: कालांतराने स्थूल देशी उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढलेला आहे. हे प्रकरण भारतातील सेवा क्षेत्राच्या वाढीमागील घटकांचे पृथ्थकरण करते. दूरसंचार, वित्तीय, माहिती तंत्रज्ञान आणि सामाजिक सेवांच्या (शिक्षण आणि आरोग्य) जलद वाढीमुळे 1990 च्या दशकात भारतामध्ये सेवा क्षेत्राची वाढ जलद झालेली दिसून येते.

प्रकरण 5 मध्ये कायदेशीर तरतुदी, सेवा कराची गरज, मूल्य निर्धारण, सेवा कराचे प्रशासन, करपात्र सेवा, राज्य सरकार आणि सेवा कर तसेच इतर देशातील यासारख्याच कराचे पृथ्थकरण केलेले आहे. करपात्र सेवांची संख्या वाढत आहे. यातून सरकारचा हेतू स्पष्ट दिसून येत आहे की, अधिकाधिक सेवांवर कर आकारणे आणि अंतिमत: सर्वसाधारण सेवा कर आणि वस्तूंची अंमलबजावणी करणे.

प्रकरण 6 मध्ये 1994-95 ते 2005-06 या कालावधीतील आकडेवारीचे पृथ्थकरण केले आहे. यामध्ये विशेषत: कराचा पाया, कराचा दर, सेवा करातील सवलती, सेवा कर भाराचा आघात आणि स्थलांतर आणि सेवा कराची उर्ध्वहरणक्षमता यांचा अभ्यास केलेला आहे. सेवा कराची पातळी, सेवा कराचे महसूली महत्त्व, सेवा कराचे विकासात्मक महत्व आणि सेवा कराचे भविष्यकालीन चित्र यांचासुध्दा विस्तृत, विवेचनात्मक अभ्यास केला आहे.

प्रकरण 7 मध्ये अभ्यासातून मिळालेले निष्कर्ष स्पष्ट केलेले आहेत. त्याचबरोबर सेवा कराची व्याप्ती अधिक व्यापक होण्यासाठी, सेवा कर अधिक उत्पादक होण्यासाठी कायदेशीर तरतूदींचे योग्य पालन अधिक सोईस्कर होण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना केलेल्या आहेत.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत अभ्यासातील महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

1. 2005-06 पर्यंत शेवटच्या तीन वर्षामध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा सरासरी वार्षिक दर 8 टक्क्यापेक्षा जास्त होता.2006-07 च्या एप्रिल-जून या तिमाहीमध्ये अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर 8.9 टक्के इतका होता.2000-01 नंतर तिमाहीतील तो सर्वाधिक वृध्दीदर होता.
2. असे स्पष्ट दिसून आले की,1981-82 ते 1990-91 या काळात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा दर वार्षिक सरासरी 3.6 टक्क्यावरून अधिक प्रमाणात वाढून 1991-92 ते 12005-06 या कालावधीत 6.5 टक्के इतका वाढलेला आहे. सेवा क्षेत्रातील महत्त्वपूर्ण वाढीमुळे हा दर वाढलेला दिसून येतो. याच काळात सेवा क्षेत्रातील स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा दर 6.7 टक्क्यावरून 8.2 टक्क्यावर उल्लेखनीय असा

वाढला.

3. 11980 आणि 1990 च्या दशकात सेवा क्षेत्राच्या वाढीचा दर अतिशय वेगाने वाढला. विशेषत: नंतरच्या कालावधीत 12005-06 या काळात व्यापार, हॉटेल्स, दूरसंचार सेवा यामध्ये वेगाने वाढ झाली. या सेवांच्या वाढीचा दर 2000-01 मध्ये 7.1 टक्के होता. तो वाढून 2004-05 मध्ये 10.6 टक्के आणि 2005-06 मध्ये 11.5 टक्के इतका झाला.
4. 2005-06 मध्ये नवीन भ्रमणध्वनी जोडणीच्या वाढीचा दर मोठा असल्यामुळे (89.4 टक्के) सेवा क्षेत्राच्या वाढीला बळकटी मिळाली. 1990-91 मध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा अर्थव्यवस्थेच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये 39.7 टक्के होता, तो वाढून 2005-06 मध्ये 60 टक्के इतका झाला.
5. उत्पादक आणि उपभोक्त्यांच्या वाढीचा दर अधिक वाढलेला आहे आणि सुधारणोत्तर कालावधीनंतर त्यांच्या हिस्स्यामध्ये वाढ झालेली आहे. दुसऱ्या बाजूला सरकारच्या महसुली खर्चात घट करण्याच्या धोरणामुळे सार्वजनिक सेवांचा हिस्सा घटलेला दिसतो.
6. 1990-91 ते 2005-06 या कालावधीत सेवांची निर्यात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या 1.4 टक्क्यावरून 7.6 टक्क्यावर वाढलेली आहे. याच कालावधीत सेवांची आयात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या 1.1 टक्क्यावरून 4.8 टक्क्यावर वाढलेली आहे. यावरून असे स्पष्ट दिसते की सेवांच्या आयातीपेक्षा सेवांची निर्यात वाढत आहे.
7. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत आहे आणि सेवा क्षेत्राच्या वाढीचा दरही वाढत्या प्रमाणात वाढत आहे. साहजिकच अप्रत्यक्ष करांच्या व्याप्तीत सेवा क्षेत्राला वगळणे म्हणजे कराचा पाया कमी करणे आणि कर-स्थूल राष्ट्रीय उत्पादन गुणोत्तर वाढवण्यासाठी अडचण निर्माण करणे.
8. तुलनेने विचार केल्यास सेवा क्षेत्रामधून भारताला अधिक फायदा आहे. विशेषत: सॉफ्टवेअर उद्योगाच्या वाढीचा दर अधिक आहे आणि निर्यातीमध्येही त्याचा हिस्सा महत्त्वपूर्ण आहे.
9. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये सेवा क्षेत्रांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. निरिक्षणाअंती असे दिसून आले की भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढतो आहे. 1950-51 मध्ये तो 29 टक्के होता. 11970-71 मध्ये 32.9 टक्के,1990-91 मध्ये 39.7 टक्के, 2000-01 मध्ये 48.1 टक्के आणि 2005-06 मध्ये 60 टक्के झाला.
10. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या 60 टक्के हिस्सा असलेले सेवा क्षेत्र ज्या सेवांवर कर आकारला नाही अशा सेवांना कराच्या जाळ्यात ओढण्याची संधी आणि आव्हाने देते.
11. करपात्र सेवांची संख्या वाढवण्याच्या कलामुळे अधिकाअधिक सेवा कराच्या जाळ्यात ओढण्याचा सरकारचा हेतू स्पष्ट आहे. अधिकाधिक सेवांच्यावर कर लादला असला तरी सेवा करापासून मिळणारे उत्पन्न फक्त 34,500/- कोटी रू. होते की जे केंद्र सरकारच्या एकूण महसुली उत्पन्नाच्या 5 टक्क्यापेक्षा अधिक नव्हते.
12. जेव्हा सेवा कर आकारण्यात आला तेव्हा सुरूवातीला फक्त तीन सेवांवर कर होता. त्यानंतर अवघ्या 10 वर्षाच्या कालावधीत एकूण

96 सेवांवर (2006-07 च्या अर्थसंकल्पानुसार) कर आकारण्यात आला की ज्यापासून 34,500 कोटी रू. कर महसूल मिळेल असा अंदाज होता. दुसऱ्या बाजूला अलीकडे करपात्र सेवांच्यामध्ये चार्टट अकौंटंट, कॉस्ट अकौंटंट, कुरिअर, मालाची वाहतूक आणि बँकींग सेवांचा समावेश होता.

13.जसा भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत आहे. तशा अधिकाधिक सेवा सेवाकराच्या जाळ्यात आणल्या जात आहेत. ही वाटचाल अतिशय स्वागतार्ह असून भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी उपयुक्त आहे.

14.काही निवडक सेवांवर सेवाकर आकारण्यासाठी राज्य सरकारला परवानगी देण्यामध्ये काही दोष आहेत; त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होवू शकतात. विक्री कराच्या बाबतीत जे घडले तसे तसे एखादे राज्यसरकार वेगवेगळ्या सेवांवर वेगवेगळा कर आकारण्याचा निर्णय घेऊ शकते.

15.काही कालावधीनंतर अधिकाधिक सेवांच्यावर वाढत्या दराने सेवा कर आकारण्यासाठी भरपूर वाव आहे.

16.फायनान्स ॲक्ट 1994 चे सेक्शन–66 हे सेवा कर आकारण्याचे सेक्शन आहे. संबंधित नियमानुसार करपात्र सेवांच्या मूल्याच्या 12 टक्के दराने कर आकरणी करता येईल आणि त्याचे संकलनही करता येईल. 1994 पासून फक्त करपात्र सेवांचीच संख्या वाढवली नाही तर सेवा कराचा दरही वाढवला आहे.

17.10 लाख रू. व्यवसाय असणाऱ्या लहान सेवा पुरवठादारांना सेवा करापासून करमुक्त केले आहे. जम्मू आणि काश्मीर या राज्यातील सेवा पुरवठ्यावर कर आकारला जात नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून पुरवल्या जाणाऱ्या सेवा करमुक्त आहेत. राष्ट्रसंघ किंवा आंतरराष्ट्रीय संघटना आणि विशेष आर्थिक विभाग यांना कोणत्याही व्यक्तीने पुरवल्या जाणाऱ्या सर्व करपात्र सेवा करमुक्त आहेत. निर्यात केल्या जाणाऱ्या सेवा सेवा करापासून मुक्त आहेत.

18.कराचा पाया विस्तारल्यामुळे आणि कराचा दर वाढल्यामुळे 11994-95 ते 2006-07 या कालावधीत विशेषत: 2002-03 ते 2006-07 या काळात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या गुणोत्तराशी सेवा कराचा भार वाढलेला दिसून येतो.

19.1994-95 मध्ये सेवा कराचा दरडोई भार 4.50 रू. होता तो वाढून 2005-06 मध्ये 1208-24 रू.इतका झाला.

20.12006-07 च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सेवा कराची उर्ध्वहरणशीलता 4.6 इतकी होती म्हणजेच ती प्रमंडळकर, उत्पन्न कर, आयात कर, निर्यात कर आणि केंद्रीय अबकारी कर यांच्यापेक्षा जास्त होती. 2002-03 ते 2005-06 या काळात सेवा कराची सरासरी उर्ध्वहरणशीलता 5.6 इतकी होती. इतर महत्त्वाच्या करांशी तुलना करता ती जास्त होती.

21.असे स्पष्ट दिसून आले की, स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी सेवा कराचे गुणोत्तर वाढत आहे. 1995-96 मध्ये ते 0.07 टक्के होते. 12006-07 च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ते सावकाश परंतु सतत वाढून 0.8 टक्के झाले.

22.केंद्र सरकारसाठी सेवा कर उत्पन्न अतिशय महत्त्वाचा आणि विश्वसनीय महसुली स्रोत म्हणून समोर येत आहे. घटक किंमतीनुसार सेवा क्षेत्राच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सेवा कराच्या महसूलाचा हिस्सा वाढत आहे. त्याचबरोबर

घटक खर्चानुसार एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्येसुध्दा त्याचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते.

23. प्रत्येक वर्षी एकूण अर्थव्यवस्थेमधील सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढतो आहे. करपात्र सेवांची संख्या आणि करदात्यांची संख्या अतिशय वेगाने वाढत आहे. 1994-95 मध्ये सेवा कर दात्यांची संख्या 3943 इतकी होती; ती मोठ्या प्रमाणात वाढून 2005-06 मध्ये 8,46,155 इतकी मोठ्या प्रमाणात वाढली. 1994-95 मध्ये सेवा करापासून मिळणारे उत्पन्न केवळ 410 कोटी रू. इतके कमी होते; ते वाढून 2005-06 मध्ये 23,053 कोटी रू. इतके वाढले आणि 2006-07 च्या वित्तीय वर्षामध्ये 34,500 कोटी रू. असेल असा अंदाज होता.

24. 1995-96 मध्ये सेवा कर उत्पन्नाचे गुणोत्तर स्थूल कर उत्पन्नाशी 0.78 टक्के होते. 2004-05 मध्ये ते मोठ्या प्रमाणात वाढून 4.50 टक्के इतके झाले. स्थूल कर उत्पन्नाशी सेवा कराचे गुणोत्तर सातत्याने वाढलेले दिसून येते.

25. 1994-95 ते 2006-07 या कालावधीत अप्रत्यक्ष करापासून मिळणारा महसूल 3.52 पट वाढलेला आहे; तथापि याच कालावधीत सेवा करापासून मिळणारा महसूल 84.14 पट इतका वाढलेला आहे, ही अतिशय महत्त्वपूर्ण वाढ आहे. अप्रत्यक्ष कर महसुलाशी सेवा कर महसुलाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. 11994-95 मध्ये ते 0.62 टक्के होते आणि 2006-07 मध्ये 10.62 टक्के इतके होते.

26. रोखे दलालांच्या सेवांपासून मिळणारा सेवा कर 2004-05 या कालावधीतील कर संकलनाशी तुलना करता 2005-06 मध्ये तो 447.68 कोटी रू. ने (119.09 टक्के) वाढलेला दिसतो.

27. मुंबई, दिल्ली, चेन्नई, कलकत्ता, बेंगलोर, पुणे आणि हैदराबाद अशा सात मोठ्या शहरातून अधिक सेवा कर मिळतो. 2005-06 मध्ये एकट्या मुंबई सेवा कर विभागामध्ये 7099.05 कोटी रू. इतका सेवा कर मिळाला की जो एकूण सेवा कर महसुलाच्या 31.05 टक्के होता.

28. 1999–२००० मध्ये दूरसंचार, विमा आणि रोखे दलालांच्या सेवेचा एकूण कर महसुलातील हिस्सा 83 टक्के होता. तो घसरून 2004-05 मध्ये 40 टक्के आणि 2005-06 मध्ये 27 टक्के इतका झाला. सर्वात जास्त कर महसूल दूरसंचार सेवाक्षेत्रापासून मिळते, त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाला विमा सेवा आहे आणि रोखे दलालांच्या सेवांपासून मिळणारे कर संकलन नवव्या स्थानावर आहे.

29. असे दिसून आले की 2005-06 मध्ये सर्वात जास्त करसंकलन मार्च या महिन्यात झाले.

30. 1994-95 मध्ये केंद्र सरकारच्या विकासात्मक खर्चाशी सेवा कर महसुलाचे गुणोत्तर 0.49 टक्के होते तर 2003-04 मध्ये 4.03 टक्के, 2004-05 मध्ये 6.60 आणि 2005-06 मध्ये 9.90 टक्के होते.

31. सहसंबंध पृथ्थकरण असे स्पष्ट करते की सेवा क्षेत्राच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी सेवा करापासून मिळणारे उत्पन्न महत्त्वपूर्ण धनात्मक (0.89) संबंध दाखवते.

32. केंद्र सरकारच्या सेवाकर महसुलापेक्षा (39.61 टक्के संमिश्र वाढ दर) कर दात्यांची संख्या अधिक दराने (62.04 टक्के संमिश्र वाढ कर) वाढली.

33. 1995-96 ते 2006-07 या काळात स्थूल कर

उत्पन्नाशी सेवा कर महसूल गुणोत्तर 23 टक्के संमिश्र वाढ दराने वाढलेले आहे ही अतिशय चांगली बाब आहे. केंद्र सरकारच्या अप्रत्यक्ष कर महसुलापेक्षा (11.65 टक्के संमिश्र वाढ दर) सेवा कर महसूल अधिक दराने (39.61 टक्के संमिश्र वाढ दर) वाढलेला आहे.

34. चालू किंमतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन 0.868 इतके जास्त प्रतिगमन मूल्य दाखवते. यावरून असे स्पष्ट दिसते की अर्थव्यवस्थेचा अधिक वृध्दीदर सेवा कर महसुलाच्या वाढीसाठी उपयुक्त ठरेल.

वरील विवेचनावरून असे स्पष्टपणे दिसून येते की, (1) सतत वाढत जाणारी करपात्र सेवांची संख्या आणि त्याचबरोबर सेवा कर दरामध्ये होत असलेली अतिशय महत्त्वपूर्ण वाढ यामुळे सेवा करापासून मिळणाऱ्या महसूलामध्ये सातत्यपूर्ण वाढ होत आहे. (2) अभ्यास कालावधीमध्ये सेवा कराची उच्च उर्ध्वहरणशीलता दिसून येते (3) जरी सेवा करापासून मिळणारे उत्पन्न वाढले असले तरी एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी सेवा क्षेत्राच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा अधिक असलेला हिस्सा लक्षात घेता एकूण कर महसुलामध्ये सेवा कराचा हिस्सा त्या प्रमाणात वाढलेला नाही. (4) भविष्यात उत्पन्न कर, प्रमंडळ कर आणि आयात निर्यात कराशी तुलना करता सेवा कराचे वित्तीय महत्त्व वाढलेले दिसून येईल.

**सूचना :**

1. भविष्यात सेवा क्षेत्राची निर्यात ही मुख्यत: भारतातील सेवा क्षेत्राच्या स्पर्धात्मकतेवर अवलंबून असेल. भारतामध्ये जागतिक दर्जाचे सेवा क्षेत्र निर्माण करण्यासाठी आणि आवश्यक वातावरण निर्मिती होण्यासाठी सरकारकडून आवश्यक आणि प्रामाणिक प्रयत्न होण्याची गरज आहे.
2. पारंपारिक सेवांशिवाय आता आपण कायदेशीर सेवा, लेखा परीक्षण, वास्तुविद्याविशारद आणि सजावट, बांधकाम आणि अभियांत्रिकी, पर्यटन आणि सेवा क्षेत्रासारख्या व्यावसायिक सेवांच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे.
3. सॉफ्टवेअर उद्योगाला अधिक संशोधन आणि विकासात्मक पाठिंब्याची गरज आहे. जपान आणि इतर पूर्वेकडील देशांची भाषा शिकल्यास त्या देशामध्ये फार मोठी संधी आहे.
4. वस्तू आणि सेवा कर लागू करण्याची अतिशय महत्त्वपूर्ण अशी सरकारची योजना आहे. वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. त्यामुळे अप्रत्यक्ष कर पध्दतीमध्ये पारदर्शकता येईल आणि महसूल वाढेल आणि कर चुकविण्याचे प्रमाणही कमी होईल. केंद्र सरकारकडून लागू केल्या जाणाऱ्या एकमेव आणि एकत्रित वस्तू आणि सेवा कराची योजना अनेक जणांना विशेषत: उद्योजकांना उपयुक्त वाटते.
5. ज्यावेळी काही सेवांवर कर आकारला जातो आणि काही सेवांवर कर आकारला जात नाही, साहजिकच त्यावेळी आपण पुरवित असलेली सेवा ही करपात्र नाही असं सांगण्याचा सेवा पुरवठादाराचा नेहमीच प्रयत्न असतो. सरकारने ज्या सेवांवर कर आकारला जाणार नाही. अशा सेवांच्या यादीचा स्पष्ट उल्लेख करून सर्व सेवांवर कर आकारला जावा. ज्या सेवा या यादीमध्ये समाविष्ट केल्या जातील त्यांची योग्य व्याख्या केली पाहिजे; जेणेकरून कोर्ट कचेऱ्यांची व्याप्ती

कमी राहील (असोचॅमच्या मते, नकारात्मक यादीमध्ये धर्मादाय संस्थांना पुरविली जाणारी सेवा, मुलभूत आणि प्राथमिक शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, संरक्षण सेवा, संगणक साक्षरता आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च क्षेत्र यांचा समावेश असावा.)

6. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्र आणि सेवा कराचे वाढते महत्त्व लक्षात घेता सेवाकरासंबंधी सरकारने एक स्वतंत्र आणि सर्वसमावेशक कायदा लागू करण्याची आवश्यकता आहे. ही कायदेशीर चौकट चांगल्या आंतरराष्ट्रीय नियमाशी संबंधीत असावी. कदाचित भारतामध्ये करपात्र सेवांच्यासाठी एक सर्वसमावेशक कायदा लागू केल्यानंतर करपात्र सेवांच्या व्याख्येबाबतच्या अडचणी दूर होतील. कायदा, सर्वसमावेशक कायदा अतिशय सुलभ, पारदर्शक आणि समजण्यास सोपा, कमी गुंतागुंतीचा असल्यास कायद्याचे पालन करणे सुलभ होते.

7. सेवा पुरवठादारांच्यासाठी सेवा करासंबंधीच्या परिपत्रकाची जुळवाजुळव करणे कठीण असते. म्हणून कर सवलती परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्याएवेजी कर कायद्याद्वारेच स्पष्ट केल्या जाव्यात.

8. सेवांच्या संबंधीत सेवा कराच्या तरतूदी अतिशय गुंतागुंतीच्या आहेत, म्हणून सेवा पुरवठादाराला सहज समजतील अशा सुलभ असायला पाहिजेत.

9. राज्यांचा कर महसुल वाढवण्यासाठी त्यांच्याकडे काही सेवा हस्तांतरित केल्या जाण्याची शक्यता आहे. (नियोजन आयोगाने नेमलेल्या कर सुधारणाविषयक गटानेही अशीच शिफारस केली होती); परंतु राज्यांना सेवा कराचे संकलन करणे आणि विनियोजन करण्यासाठी परवानगी देणे योग्य ठरणार नाही.असे सुचवण्यात येत आहे की केंद्र सरकारने सेवा कर आकारला जावा, त्याचे संकलन केले जावे आणि त्यानंतर राज्यांना महसूल वाटला जावा. केंद्रीय वस्तू आणि सेवा कराच्या संकलनातून मिळणाऱ्या महसुलाचे केंद्र आणि राज्य या दोघांच्यामध्ये योग्य पातळीवर वाटप केले जावे.

10. सेवा कराचा दर 16 टक्क्यापर्यंत वाढवला पाहिजे म्हणजे तो केंद्रीय मूल्यवर्धित कर दराच्या पातळीवर येईल.

11. कायदेशीर कोर्टकचेऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी देशी करदात्यांना ॲडव्हान्स रुलींग योजना लागू करण्याची गरज आहे की ज्यामुळे कर विषयक वादविवाद पारदर्शी यंत्रणेच्या माध्यमातून निकालात काढणे सोपे होईल.

12. सेवा कर सर्वसमावेशक असावयास हवा तथापि, काही सेवांच्यावर मात्र कर लावता कामा नये. उदा. आरोग्य आणि शिक्षण त्याचबरोबर सरकारचे प्रशासन आणि संरक्षणासारख्या पुरवल्या जाणाऱ्या लोकोपयोगी आणि सामाजिक सेवा.

13. वेगाने वाढणारे सेवा क्षेत्र जर कराच्या जाळ्यात ओढले गेले तर सेवा कराची उर्ध्वहरणशीलता आणि कर महसुलाची उर्ध्वहरणशीलता सुधारू शकते.

सेवा कराच्या संबंधात काही महत्त्वाच्या बाबींवर अधिक संशोधन होण्याची गरज आहे. त्यामध्ये करपात्र सेवांची नेमकी व्याख्या, विशिष्ट करपात्र सेवांपासून मिळणारा कर महसूल आणि त्याचे आर्थिक विकासातील महत्त्व, सेवा करामध्ये

मिळणाऱ्या कर सवलती, सेवा कराची उत्पन्न लवचिकता, सेवा कराअंतर्गत ॲडव्हान्स रुलींग, इतर प्रगत देशातील वस्तू आणि सेवा कराचा अनुभव आणि भारतातील वस्तू आणि सेवा कराचे भविष्य इत्यादी.

सारांशाने, प्रशासकीय सुधारणासहीत सर्व कर विषयक सुधारणा ह्या अतिशय नियोजनबध्द, सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया असून अर्थव्यवस्थेला स्पर्धात्मक ठेवणारी असावयास हवी की ज्यामुळे महसूल उत्पादकता सुधारण्यास, कर विषयक विकृती कमी होण्यास आणि समानता वाढण्यास मदत होईल.

## निवेदन

खालील आजीव सभासदांचे एप्रिल-जून २००८ व जुलै-सप्टें.२००८ चे पाठविलेले अंक प्रमुख संपादकांकडे परत आलेले आहेत. तरी संबंधित आजीव सभासदांनी आपले नवीन पत्ते संपादकांकडे पाठविण्यासंबंधी सहकार्य करावे.त्यानंतर त्या सभासदांना बदललेल्या पत्त्यावर अर्थसंवादचे पुढील अंक पाठविण्यात येतील.

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| १ | ६ | श्री.तळवळकर गोविंद |
| २ | २२ | श्री.गाडगीळ गंगाधर गोपाळ |
| ३ | २५ | श्री.देशपांडे विश्वनाथ विनायक |
| ४ | ३५ | श्री.वाकणकर बिंदू माधव |
| ५ | ४५ | श्री.दांडेकर अशोक शंकर |
| ६ | ५६ | प्राचार्य कौण्डिण्य एम्. व्ही. |
| ७ | ९२ | श्री.खुदानपूर गोविंद शिवाजी |
| ८ | १३२ | प्रा.मानकर विजयकुमार गजानन |
| ९ | १४३ | प्रा.जोशी श्रीकांत कालीदास |
| १० | १५३ | प्रा.मोकाशी पु.के. |
| ११ | १७६ | प्रा.गिरासे गजेंद्रसिंग ठाणसिंग |
| १२ | १७८ | प्रा.उपदेव विनायक वासुदेव |
| १३ | १८१ | प्रा.परांजपे रमेश वासुदेव |
| १४ | १८४ | डॉ.दातार माधव |
| १५ | १८५ | प्रा.अष्टेकर शांताराम |
| १६ | २०३ | प्रा.शहा रमेश बाबुलाल |
| १७ | २४९ | श्रीमती जोशी कालिका दिनानाथ |
| १८ | २७९ | प्रा.तराले प्रल्हाद गोविंदराव |
| १९ | ३२१ | प्रा.फरील नरेंद्र विश्वनाथ |
| २० | ३३९ | सौ.एकबोटे नंदिनी वि. |
| २१ | ३६६ | प्रा.देशपांडे अतुल रा. |
| २२ | ३७८ | प्रा.कान्हेरे रंगनाथ भी. |
| २३ | ३९६ | सौ.दिक्षीत एम. आर. |
| २४ | ४१४ | प्रा.निजसुरे पदयावती सखाराम |
| २५ | ४२० | सौ.प्रयाग माधवी |
| २६ | ४९८ | प्रा.कस्तुरे आशा |
| २७ | ५१९ | प्रा.सौ.श्रीवास्तव नलीनी |
| २८ | ५४३ | डॉ.हिलगे विलास |
| २९ | ५७१ | श्री.भिलवडे अरविंद श्रीपाल |
| ३० | ५९३ | श्री.छापरवाल शांतीलाल बिरदीचंद |
| ३१ | ६०६ | डॉ.सी.सावंत मिनाक्षी दि. |
| ३२ | ६५२ | प्रा.देवरे नानाजी वामन |
| ३३ | ६५३ | प्रा.सवने सुरेश बापूराव |
| ३४ | ६५६ | सौ.दामले वर्षा आनंद |
| ३५ | ६६२ | प्रा.बोधले आमोगसिध्द चैत्राम |
| ३६ | ६६६ | श्री.ओक जयंत काशिनाथ |
| ३७ | ६६७ | डॉ.सौ.केळकर किर्ती |
| ३८ | ६९८ | प्रा.आठवले पि.यु. |
| ३९ | ७१३ | प्रा.तोडमल आय.ए. |
| ४० | ७५४ | प्रा.डॉ.कप्तान संजय |
| ४१ | ८३७ | श्री.मालतुमकर वि.वा. |
| ४२ | ८४३ | श्री.नाखले वा.गो. |
| ४३ | ८४६ | श्री.गोवंडे प्रकाश का. |
| ४४ | ८६० | प्रा.कोंडेकर उमाकांत भास्करराव |
| ४५ | ९३० | सौ.मोरे सोनाली प्रभाकर |
| ४६ | ९३४ | श्री.बेलसरे संजय |
| ४७ | १०२६ | प्रा.महातक आशिष कृ. |
| ४८ | १०३२ | प्रा.शिंदे सुनिल श्रीपतराव |
| ४९ | १२५९ | प्रा.झोटिंग शरद वामन |

**प्रमुख संपादक -जगन्नाथ पाटील**

# अर्थ शब्दांची वाट पाहे

**शि.ना.माने,**
भूतपूर्व अध्यक्ष,मराठी अर्थशास्त्र परिषद.
दूरध्वनी -(02162)231139

Leapfrog technology : लीपफ्रॉग हा शब्द जुना असला, तरी लीपफ्रॉग टेक्नॉलॉजी ही संज्ञा बरीच नवी आहे. सुरुवातीला शब्दाचा अर्थ पाहू. नंतर संज्ञेचे स्पष्टीकरण करू.

**अर्थ :** द न्यू ॲडव्हांस्ड लर्नर्स डिक्शनरी (5 वी आवृत्ती)/2005 व केंब्रिज डिक्शनरी ऑफ अमेरिकन इंग्लीश मधील या शब्दाच्या अर्थाचा एकत्रित अनुवाद पुढे दिला आहे. हा दोन मुलांचा एक खेळ आहे.त्यात पुढील वाकलेल्या मुलाच्या पाठीवरुन पाठीमागील दुसरा मुलगा उडी मारतो. आता उडी मारलेला मुलगा वाकतो. मागील मुलगा आता वाकलेल्या मुलाच्या पाठीचा आधार घेवून उडी मारतो. हेतु हा की स्वत: पुढे जावे व दुसरा मागे रहावा. त्यामुळे स्वत: पुढे जाण्याची ईर्षा निर्माण होते. अशाप्रकारे आलटून पालटून एकमेकांवर बेडूक उडी मारण्याची क्रिया सुरु होते. उडी मारेपर्यंतच बेडूक हवेत जातो व लगेच त्याचे पाय जमिनीला लागतात. त्याचप्रमाणे मुलांच्या बेडूक उडीच्या सततच्या क्रियेतून इंग्रजी वर्ण 'U' च्या उलट्या आकाराची वक्रमाला निर्माण होते. तिच्यातून चढउतार निर्माण होतो. त्यातून त्या खेळातील विसंगत्या व विकृत्या स्पष्ट होतात.

दुसऱ्या शब्दात, एक व्यक्ती दुसरीचा आधार घेवून तिला मागे टाकण्याचा प्रयत्न करते. तिचा तो उपजत स्वभाव असतो. त्यातून या खेळाचा नियम निर्माण होतो. अखेरीस एक असा क्षण येतो की ज्यावेळी खेळ काही काळासाठी थांबला आहे. एक व्यक्ति पुढे गेली, तर दुसरी मागे पडली आहे. जो (Joe's) चा लाभ तर टॉम (Tom's) चे नुकसान, अशी स्थिती निर्माण होते. अर्थात ती क्रिया थांबलेला खेळ परत सुरु होईपर्यंत टिकते.

**संज्ञेचे स्पष्टीकरण :** आतापर्यंत हा खेळ दोन मुलांपुरता मर्यादित होता. येथून पुढे हा खेळ एकाच देशाच्या अर्थव्यवस्थेतील दोन क्षेत्रापर्यंत (नागरी व ग्रामीण किंवा संघटित व असंघटित) तसेच दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशांपर्यंत

विस्तारण्यात आलेला आहे (अमेरिका व दुसरे विकसनशील देश), आणि खेळाच्या नियमाची जागा तंत्रविद्येने घेतली आहे. प्रथम एकाच देशाच्या अर्थव्यवस्थेतील दोन क्षेत्रांच्या संबंधात शांघायचा उल्लेख करु. आपणास माहीत आहे की, शांघायला चीनचे 'हाय-टेक-हब' संबोधले जाते, आणि त्याच्या तथाकथित विकासाचे श्रेय तंत्रविद्येला दिले जाते. परंतु वस्तुस्थिती काय आहे? 2005 मध्ये उदात्तीकृत (exalted) स्थूल आंतर्देशीय उत्पादितात (GDP) जेवढी वाढ झाली तेवढी वाढ शांघायमधील बहुसंख्य कुटुंबांच्या उत्पन्न पातळीत झाली नाही. विशेषत: चीनमधील ग्रामीण उत्पन्न पातळीच्या तुलनेत एकूण कार्यदलात (work-force) मोठा हिस्सा असलेल्या शांघायमधील ग्रामीण कुटुंबाचे उत्पन्न आजही (2005 पर्यंत) 1989 मधील पातळीवर स्थिर आहे. मूळ चीनच्या व सध्या एम.आय.टी. (मॅसॅच्युसेट्स) मधील यासेंग हुआंग यांच्या अभ्यासातीलेहा निष्कर्ष आहे. समुचित तंत्रविद्येच्या (appropriate technology) अभावामुळे हे घडले.

येथे भारतीय संदर्भ देण्याचा मोह अनावर होतो. सर्वसाधारणपणे केंद्र, राज्य सरकारे, कृषि परिव्यय व किंमत आयोग आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांनी किंमत स्थैर्याच्या नावाखाली त्यांच्या भात्त्यातील आयुधांचा (आयात-निर्यात धोरण, वायदे बाजार, सार्वजनिक वितरण व्यवस्था, विनियमित बाजार, प्रबंधित किंमत धोरण, इत्यादी) उपयोग खाद्यान्नकिंमती पाडण्यासाठी केला, म्हणजे एरवी त्यांनी जी पातळी गाठली असती तिच्या त्यांना खाली ठेवण्याचा प्रयत्न केला. याला मागील एक-दीड वर्षाचा अपवाद असू शकतो.

**कच्चे/कमकुवत दुवे :** शांघाय व भारतातील नागरी व ग्रामीण क्षेत्रे यांच्याविषयी ढोबळ व तात्पुरत्या स्वरुपाचा निष्कर्ष आपण पाहिला. परंतु येथे त्याची साधार चिकित्सा करणे जरुर आहे. सुरुवातीला आपण लीपफ्रॉग शब्दाचा अर्थ पाहिला. त्यात मागे टाकणे (surpass, skip,advance), या प्रत्येक व्यक्तिच्या उपजत वर्तनाचा (perception by mind without reasoning) गर्भित उल्लेख केला. त्याचा अटळ परिणाम म्हणजे घाई किंवा जलदबाजीची ईर्षा. तिच्यामध्ये दूरदर्शीपणा (prudence) व नीर-क्षीर विवेकाचा अभाव असतो, या फ्रॉईड यांच्या विधानाचे (proposition) आजपर्यंत टीकाकारांना संपूर्णपणे खंडन करता आले नाही. पुढील दोन उदाहरणांच्या सहाय्याने उपजत वर्तनाचा खुलासा करु.

पहिला दृष्टांत आहे नरसाळे (funnel). नरसाळ्याच तोंड पसरट असते. परंतु त्याच्या दुसऱ्या टोकाला जोडलेली नळी अरुंद असते. पुष्कळदा कळत नकळत नळीच्या क्षमतेपेक्षा जास्त द्रव पदार्थ तोंडवाटे ओतला जातो. परिणाम? सांडवण किंवा अपव्यय. त्याला नरसाळे परिणाम (funnel effect) म्हणतात. दुसरे उदाहरण आहे भारतात खेड्यात पोहोचलेल्या संगणित्राचे. संगणित्र हवेच. त्याविषयी दुमत नाही. अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे त्याच्या समुचित व पर्याप्त वापराचा. संगणित्र वीजेवर चालते. वीजेचे उत्पादन व तिची मागणी यांच्यात मोठी तूट आहे. शिवाय, गळती व चोरीमुळे तुटीत सतत भर पडते. भारनियमन अटळ ठरते. विशेषत: 12 ते 16 तासांच्या भारनियमनामुळे टेबलावरील संगणित्राकडे ठेवणीतील वस्तू म्हणून पाहिले जाते. आवश्यक वीज उत्पादनाकडे दुर्लक्ष झाल्याचा हा परिणाम आहे. म्हणून संगणित्राच्या बहुजनीकरणाची (massification) ही घाई व

जलदबाजी.

आता मागे उल्लेख केलेल्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशांच्या संदर्भातील लीपफ्रॉग तंत्रविद्येकडे परत वळू. अमेरिका व दुसरे विकसनशील देश (चीन, भारत वगैरे) यांच्या संदर्भातील वरील तंत्रविद्येची थोडक्यात पार्श्वभूमी पुढे दिली आहे. आपणास माहीत आहे की, अमेरिका डॉलरचा सुवर्णाशी असलेला संबंध 1971 मध्ये संपुष्टात आला. राजकीय मुत्सद्दीपणा व आर्थिक अवसरवाद यांचा वापर करुन अमेरिकेने डॉलरचा राखीव चलनाचा दर्जा पदरात पाडून घेतला. आज अमेरिकेवर 12.5 ट्रिलियन डॉलर कर्जाचा बोजा आहे. शिवाय, तिची महसुली तूट 442 बिलियन डॉलर (2005) होती. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की 7.5 ट्रिलियन डॉलर इतक्या जागतिक विदेशी चलननिधीतील एकट्या अमेरिकेचा हिस्सा जवळजवळ 66 टक्के आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावरील प्रतिकूल वित्तीय परिस्थितीत (कर्जाचा बोजा व महसुली तूट) अमेरिकेची आयात खंडित झाली नाही. उलट, तिच्या आयातीचे देणे चुकते करण्यासाठी डॉलरमधील राखीव चलनाचा ती लीलया वापर करु शकते. ज्यावेळी अमेरिका चीनची वस्तू खरेदी करते त्यावेळी चीन अमेरिकेचे कर्ज खरेदी करते. थोडक्यात मूळ संज्ञेचा उपयोग करुन America has leapfrogged other countries in using her reserve currency, म्हणता येईल. बेडूकउडी तंत्रविद्या (मराठी पर्याय) ती हीच. ती संज्ञा समुचित तंत्रविद्येच्या विरोधात कार्य करते. म्हणून तिला एक वित्तीय मूर्खपणा (financial folly) संबोधणे योग्य ठरेल.

**विरोधाभास** (paradox) : आज जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. दहा-पंधरा वर्षापूर्वीच्या जी-7 श्रीमंत देशांची जागा आज जी-20 देशांनी घेतली आहे. अर्थातच त्यांच्यात अमेरिकेबरोबर बऱ्याच विकसनशील देशांचा समावेश आहे. या संदर्भात पाम वूडॉल यांनी एक इशारा दिला आहे. त्याचा सारांश पुढे दिला आहे. त्या इशाऱ्यात त्यांनी "Playing leapfrog"[२] हा शब्दप्रयोग केला आहे. म्हणून त्याचा सारांश लक्षणीय ठरतो. तो सारांश असा : जी-20 देशांपुढे त्यांच्या लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी बेडूकउडी खेळाऐवजी दुसरे पर्याय उपलब्ध आहेत. त्यांचा उपयोग टाळून त्यांची बेडूकउडी खेळांतर्गत व्यापार रोध (trade barriers) वाढविले, तर तो त्यांचा सुखभ्रम असेल. कारण अखेरीस त्यांना त्याची भारी किंमत मोजावी लागेल. म्हणजे आजचे श्रीमंत देश हे उद्याचे गरीब देश असतील,असो.

लीपफ्रॉग टेक्नॉलॉजीविषयीच्या आतापर्यंतच्या चर्चेचा विचार करता वर उल्लेख केलेला बेडूकउडी तंत्रविद्या हा मराठी पर्याय सुचवून (खरे तर, भाषांतर करुन) ही चर्चा आता आटोपतो.

## संदर्भसूची


1. Huang Yasheng, 'Should Mumbai Learn from Shanghai?' EPW, July 19-26,2008, P. 45.
2. Woodall Pam, A survey of the World Economy('Playing leapfrog'), The Economist, Sept.16-22,2006, P.34.

चर्चा क्र.1 :

# अर्थ शब्दांची वाट पाहे

**शि.ना.माने,**
भूतपूर्व अध्यक्ष,मराठी अर्थशास्त्र परिषद.

आजच्या तथाकथित जागतिक आर्थिक मंदीच्या (Recession) दुय्यम स्वरूपाचे कर्ज (Prime lending) प्रमुख संशयित(Prime suspect) आहे, याविषयी वाद-प्रतिवाद सुरू झाला आहे. त्याला अनुसरून सब-प्राईम लेंडिंग संज्ञेच्या मराठी पर्यायाचा शोध घेण्यास प्रवृत्त झालो. लगेच त्यावर व 'अॅग्प्लेशन'(Agflation) या दुसऱ्या संज्ञेवर एक टिपण लिहिले. एप्रिल-जून 2008 च्या अर्थसंवादमध्ये ते प्रसिध्द झाले आणि जुलै-सप्टेंबर 2008 च्या अर्थसंवादमध्ये माझे मित्र ज.फा.पाटील यांची त्या संज्ञांविषयी प्रतिक्रिया प्रसिध्द झाली. सुरूवातीला ज.फा. पाटील यांच्या प्रतिक्रियेचे स्वागत व त्यांना धन्यवाद. स्वागत व धन्यवाद यासाठी की पाटील यांची प्रतिक्रिया अर्थसंवादामधील अर्थ शब्दांची वाट पाहे या सदरचा मूळ हेतू असलेल्या व मराठी अर्थपरिषदेच्या ....शोधचर्चाविवादार्थ.... या शब्दावर विशेष जोर देणाऱ्या बोधपर वाक्याला (Motto) अनुरूप अशीच आहे. सुरूवात सब-प्राईम लेंडिंग या संज्ञेपासून करू.

'प्रस्थापित नियमांना दुय्यम लेखणारा बेबंद कर्जपुरवठा' या मी सुचविलेल्या काहीशा पसरट पर्यायासाठी पाटील यांनी 'निकृष्ट कर्ज ', निकृष्ट, निर्लज्ज निष्काळजी या छटा ध्वनित करणारा 'निकर्ज' व 'बेकर्ज'बेजबाबदार कर्ज, असे विविध पर्याय सुचविले आहेत. ते सुचविताना त्यांनी 'कुकर्म' व 'कुचाळकी' असे समकक्ष शब्दप्रयोग केले आहेत. त्याचप्रमाणे मी सुचविलेल्या पर्यायाविषयी पाटील यांची अशी सूचना आहे की पारिभाषिक शब्दाची / संज्ञेची मांडणी करताना 'शक्यतो' (पाटील यांचा शब्दप्रयोग) एका स्वतंत्र किंवा संयुक्त शब्दाने मराठी पर्याय देण्याची गरज आहे. त्यांच्या या सूचनेविषयी दुमत होण्याचे कारण नाही. परंतु काही मूळ इंग्रजी संज्ञाच जोडशब्दांनी तयार झालेल्या असतात. उदाहरणार्थ - लीप-फ्रॉग टेक्नॉलॉजी (बेडूकउडी तंत्रविद्या), झीरो पॉप्युलेशन ग्रोथ (शून्य लोकसंख्या वृध्दि), डबल फॅक्टोरल टर्म्स ऑफ ट्रेड (द्विघटित मूल्य तुल्यता दर), इत्यादी. उलट, ऑक्सिलरेशन(त्वरण) व

मल्टिप्लायर(गुणक) अशा अल्पाक्षरयुक्त परंतु अभिव्यक्तिक्षम संज्ञांच्या संख्येवरील मर्यादा ध्यानात घेणे जरूर आहे. आणि 'शक्यतो' हा शब्दप्रयोग करून पाटील यांनाही त्या मर्यादा मान्य व्हाव्यात. ती वस्तुस्थिती आहे. असो.

या मर्यादा ध्यानात घेऊनही येथे एक गोष्ट मान्य करावयाला हवी. मी सुचविलेल्या व काहीशा पसरट पर्यायापेक्षा पाटील यांचा 'बेकर्ज' पर्याय समुचित, अभिव्यक्तिक्षम व उजवा आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे 'अल्पाक्षरता'. परिभाषा एक शास्त्र आहे. अवाढव्य मानवी व्यवहारात "भाषेचा शास्त्रीय स्वरूपाचा उपयोग" [१] अशी परिभाषेची एक व्याख्या करण्यात आली आहे,आणि परिभाषेच्या नऊ लक्षणांपैकी अल्पाक्षरता हे पाचव्या क्रमांकाचे लक्षण बेकर्ज पर्यायाला लागू पडते. तरीही 'बेकर्ज' चा दुय्यम म्हणून माझ्या पर्यायाचा विचार होवू शकतो.'बे'- कुलोत्पन्न व बेकर्ज पर्यायाशी अन्वर्थक ठरणाऱ्या शब्दांचा पुढे उल्लेख केला आहे. बेकायदेशीर (बँकांनी त्यांच्या मुलभूत तत्त्वांना / नियमांना धाब्यावर बसविले), बेशिस्त (सब-प्राईम लेंडिंगमधील सर्वच खेळाडूंकडून आवश्यक शिस्तपालन झाले नाही),बेसावध(विशेषत: गृहकर्जदार बेसावध राहिले), बेहोश (विशेषत: खतपत्रांचे प्रतिभूतीकरण करून अकारण जोखीम स्वीकारणाऱ्या संस्थांचा मूर्खपणा / वेडेपणा उघड झाला)/बेशरम (फेड व सेक्युरिटी एक्सेंज कमिशनसारख्या कर्जव्यवहाराचे विनियमन करणाऱ्या संस्थांचा बेशरमपणा प्रकट झाला),इत्यादी.

परंतु 'कु' व 'नि' उपसर्गांनीयुक्त पाटील यांच्या दुसऱ्या पर्यायांचा / शब्दांचा संसर्ग सब-प्राईम लेंडिंगच्या स्वरूपातील कर्जपुरवठ्याला सुसह्य होईल किंवा काय, याविषयी मला भीती वाटते. परिभाषा पत्रकारितेपेक्षा भिन्न आहे, व ती तशीच असावयाला हवी. म्हणूनच मी त्यांच्याशी सहमत नाही. त्याचेच स्पष्टीकरण पुढील परिच्छेदात केले आहे.

प्रत्येक शब्दाचा / संज्ञेचा स्वत:चा एक कुलवृत्तांत असतो. परिभाषाव्यवहारात तो महत्त्वाचा असतो. सब-प्राईम लेडिंग संज्ञेचाही स्वत:चा कुलवृत्तांत आहे. सब-प्राईम लेंडिंगच्या स्वरूपातील कर्जपुरवठा व्यवहारात अनेक खेळाडू भाग घेतात. निव्वळ माहितीसाठी अमेरिकेतील गहाणखत बाजारातील मागील दोन-तीन महिन्यांतील घटनाक्रमांचा संक्षिप्त (मुद्देवजा)उल्लेख करू.

अमेरिकेतील गहाणखत बाजार, बँकांचे गहाणखत व्यवहारांचे प्रतिमान.[२] त्यांची ऋणपत्रांची विक्री कमी ऐपतदार / सुमार (सब-प्राईम) व्यक्तिंना कर्जपुरवठा. भारी जोखीम म्हणून जादा व्याजदर. प्रामुख्याने घर खरेदीसाठी कर्ज. एका पती-पत्नी जोडीने 1.16 दशलक्ष डॉ.किमतीच्या घरावर 1.5 दशलक्ष डॉ.कर्ज काढले. त्या गहाणखताचे प्रतिभूतीकरण (Securitisation). त्यांच्या अधारे आणखी 3,33,000 डॉ. उचलले. गृहकर्जासाठी झुंबड. विपूल कागदी पैशातून ग्राहकवाद फसफसून वर आला. प्रत्येकाने त्या पती-पत्नी जोडीचा कित्ता गिरविला. विपूल पैशाचा अधिकतर वापर टिकावू उपभोग वस्तू (Consumer durables) खरेदीसाठी होवू लागला. ज्यावेळी अमेरिकी व्यक्ती आयात वस्तूंची खरेदी करू लागली, त्यावेळी निर्यात देश अमेरिकेचे कर्ज खरेदी करू लागले. गृह खरेदी-विक्री व्यवसायात तुफान तेजी निर्माण झाली. अखेर फसव्या तेजीचा फुगा फुटला. सुपरसॉनिक वेगाने वाढलेल्या कर्ज

व्यवहाराला एकदम ब्रेक लागला. कर्जपुरवठ्याच्या वेगाने नव्हे, तर त्याला एकदम ब्रेक लागल्यामुळे जास्त हानी / मृत्यु झाले.[३] बँका व विमा कंपन्यांचे दिवाळ निघाले आणि या व्यवहारातील फेड सेक्युरिटी एक्सेंज कमिशनसारखे खेळाडू (विनियमन करणाऱ्या संस्था) हे सर्व हताशपणे पहात होत्या. कर्जदार, बँका, विमा कंपन्या, फेड व दुसऱ्या विनियमन संस्था यांच्यापैकी प्रत्येक खेळाडू पूर्ण डार्विनवादी नाही तसा तो पूर्ण मार्क्सवादीही नाही. वास्तव हे आहे की प्रत्येकाची भूमिका क्षणोक्षणी नवा रंग व आकार धारण करणाऱ्या चित्रविचित्रदर्शकासारखी (kaleidoscope) व्यामिश्र असते. म्हणून मी मागे विधान केले की 'कु' व 'नि' कुलातील शब्द / पर्याय यांचा संसर्ग सब-प्राईम लेंडिंग व्यवहाराला सुसह्य होणार नाही. शक्यतो त्यांचा उपयोग टाळणे श्रेयस्कर.

आता ॲगफ्लेशन या दुसऱ्या संज्ञेविषयी दोन शब्द. या संज्ञेचा मी सुचविलेला पर्याय आहे. 'कृधान्यकिंमतवृध्दि'. पाटील यांनी दोन पर्याय सुचविले आहेत. 'अन्नभाववाढ' या पर्यायाला ते पहिली पसंती देतात आणि 'कृभाववाढ' या पर्यायाला ते दुसरी पसंती देतात. अशाप्रकारे माझ्या पर्यायासह तीन पर्यायांचा पुनर्विचार करून 'कृकिंमतवृध्दि' हा सुधारित पर्याय मी सुचविला आहे. येथे किंमत व भाव यांच्यासंबंधी निवड करताना किंमतीला पहिली व भावाला दुसरी पसंती योग्य ठरावी. शासनव्यवहार कोश (1973), वाणिज्य परिभाषा कोश (1985) व अर्थशास्त्र परिभाषा कोश (1987) यांच्यातही किंमतीला पहिली व भावला दुसरी पसंती देण्यात आली आहे. याचा अर्थ असा नव्हे की कृभाववाढ हा पर्याय चूक आहे. प्रश्न आहे पसंतिक्रमाचा. चूक किंवा बरोबर नव्हे.

ज.फा. पाटील यांच्या प्रतिक्रियेमुळे मला संबंधित संज्ञांविषयी परत चर्चा करण्याची संधी मिळाली. दरम्यानच्या काळात वाचनात आलेल्या काही नवीन मुद्यांविषयी मांडणी करण्यास उत्तेजन मिळाले, म्हणून ज.फा. पाटील यांना परत धन्यवाद.

**संदर्भ सूची :-**


1. शासनव्यवहारात मराठी (समस्या: स्वरूप: प्रक्रिया), भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, (प्रकाशन वर्ष नोंद नाही), पृ.104.
2. अनास्कर विद्याधर, अमेरिकेतील सब-प्राईम घोटाळा : बँकिंगमधील मूळ तत्त्वांनाच हरताळ, लोकसत्ता 08.12.08.
3. Cox Simon (ed), Economics: Making Sense of the Modern Economy, The Economist Newspaper Ltd., 2007 PP 55,197 and 218.

चर्चा क्र.2 :

# अर्थ शब्दांची वाट पाहे

## एक टिपणी

**प्रभाकर आर.जोशी.**
फोन.(022)24301801

अर्थसंवादच्या एप्रिल-जून 2008 च्या अंकात प्रा.शि.ना. माने यांनी 'अर्थ शब्दांची वाट पाहे' या सदरात Agflation या नव्यानेच उद्भवलेल्या आर्थिक घटनेसंबंधी अतिशय अभ्यासपूर्वक असे विश्लेषण केले आहे. अर्थशास्त्राच्याच काय, सर्वच अभ्यासकांनी नोंद घ्यावी अशी ही घटना होय. आगळ्या वेगळ्या अशा या घडामोडीचे भान बाळगायला हवेच.

प्रा. माने यांनी Agflation 'कृधान्य किंमत वृध्दी' हा मराठी प्रतिशब्द सुचवला आहे. त्यासंबंधी मला सुचलेला प्रतिशब्द म्हणजे शेतीजन्य भाववाद हा होय.

अर्थसंवादच्या ''जुलै-सप्टेंबर 2008'' च्या अंकात प्रा.जे. एफ. पाटील यांनी त्यावर टिपणी सादर केली आहे. त्यांनी अगफ्लेशनला 'कृभाववाढ' (अथवा अन्नभाव वाढ) असा पर्यायी प्रतिशब्द सुचवला आहे.

इकॉनॉमिस्टच्या (डिसेंबर 8-14-2007) अग्रलेखातली चर्चा आणि त्यानंतर त्याविषयी झालेले विचारमंथन लक्षात घेता Agflation मधली अभिप्रेत भाववाढ एकूणच अर्थव्यवस्थेतल्या भाववाढीसंबंधी आहे असे दिसते. केवळ अन्नधान्याच्या किंमती विषयी नाही. अन्नधान्याच्या किंमतीत झालेल्या विचित्र अशा वाढीमुळे एकूण चलनवाढीचे प्रमाण वाढते. अशा त्या संशोधनाचा निष्कर्ष काढता येईल.

मी माझ्या लिखाणात Agflation ला म्हणूनच 'शेतीजन्य भाववाढ' हा प्रतिशब्द वापरत असतो. माझा 'शेतीजन्य भाववाढ रोखणार कशी?'हा लेख लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीला 24.2.2008 मध्ये प्रसिध्द झाला. त्याकडे वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो.

***

# ग्रंथपरीक्षण
# आर्थिक संकल्पना
## (जिज्ञासूंसाठी व्यावहारिक अर्थशास्त्र)

लेखक विनायक म. गोविलकर
प्रकाशक : डायमंड पब्लिकेशन्स, पुणे पृ.110
किंमत : रू. 90/-

**एन. बी. कुलकर्णी**
निवृत्त अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
हं.प्रा.ठा.महाविद्यालय, नाशिक.

गेल्या 25 वर्षांत आर्थिक प्रश्नांवर होणारे लिखाण वाचणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे.अर्थशास्त्र या विषयाचा अभ्यास न केलेल्या लोकांचे प्रमाण या वाचकांत वाढत आहे. अर्थशास्त्र हा विषय शिकलेल्या लोकांनाही व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या सर्व आर्थिक संकल्पना माहीत नसतात. अशा सर्व वाचकांसाठी संकल्पनांचा अर्थ, त्यांचे महत्त्व, त्यातून उद्‌भवणारे प्रश्न, त्यासंबंधी प्रचलित वस्तुस्थिती आणि आर्थिक धोरणात त्यांचा वापर यांची माहिती सोप्या भाषेत, थोडक्यात व अचूकपणे मांडणाऱ्या पुस्तकाची गरज आहे. ही गरज भागविणारे एक पुस्तक नुकतेच वाचनात आले. डॉ.विनायक गोविलकर यांनी लिहिलेले 'आर्थिक संकल्पना' हे पुस्तक पुण्याच्या डायमंड पब्लिकेशन्सने प्रकाशित केले आहे. डॉ.विनायक गोविलकर स्वत: आर्थिक प्रश्नांवर लेखन करून व भाषणे देऊन आर्थिक वास्तव, समस्या व धोरण यासंबंधी लोकांचे प्रबोधन करीत असतात. नाशिकहून प्रसिध्द होणाऱ्या 'थिंकलाईन' या प्राधान्याने अर्थशास्त्रीय विषयांवर दर दोन महिन्यांनी प्रसिध्द होणाऱ्या पुस्तिका मालिकेचे संपादन ते गेली दहा वर्ष करीत आहेत. केंद्र सरकारच्या वार्षिक अर्थसंकल्पावरील त्यांची व्याख्याने ठिकठिकाणी होत असतात.

प्रस्तुत पुस्तकात प्रचलित आर्थिक समस्यांवरील लिखाणात येणाऱ्या संकल्पनांपैकी तेवीस संकल्पनांचा परिचय करून दिलेला आहे. वाचकांच्या मनात एखाद्या संकल्पनेविषयी उभे राहणारे प्रश्न मांडून त्यांची थोडक्यात उत्तरे दिलेली आहेत. यामुळे संकल्पना मनात ठसू शकते. निवडलेल्या संकल्पना

लोकांच्या दैनंदिन समस्यांशी संबंधित आहेत.

सुरूवातीलाच पेट्रोलियम क्षेत्रातील तेलरोखे या संकल्पनेची चर्चा आहे. पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमती ठरविण्याच्या पध्दतीत झालेले बदल आणि सध्याचे प्रचलित धोरण स्पष्ट करून दोन्ही पध्दतींचे गुणदोष सांगितले आहेत.सप्टेंबर 2007 पासून भडकलेल्या खनिज तेलाच्या किंमतींच्या संदर्भात हे विवेचन उपयुक्त ठरेल.

पर्यावरणाच्या प्रश्नासंबंधी शुध्द हवामानाची बाजारपेठ या संकल्पनेत प्रदूषण कमी करण्यासंबंधी विचार होऊन क्योटो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समझोत्यातून हवेत सोडले जाणारे घातक वायू कमी करण्याची कल्पना मांडली गेली. या निमित्ताने विकसित व अल्पविकसित देशांमध्ये निर्माण झालेल्या संघर्षाची कल्पना या विवेचनात दिली आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी गॅट करार, जागतिक व्यापार संघटना आणि बौध्दिक संपदा आधिकार अशा तीन संकल्पनांचे विवेचन स्वतंत्रपणे केलेले आहे.या विवेचनातून विकसित व अल्पविकसित देशांमधील मतभेद आणि प्रत्येक गटातील राष्ट्रांचे हितसंबंध यांची माहिती होते.

आंतरराष्ट्रीय व्यवहारांच्या संदर्भात विनिमय दर आणि सहभाग पत्रे किंवा पार्टिसिपेटरी नोटस् या संकल्पनांचे विवेचन केले आहे.हे विवेचन परिपूर्ण आहे. सहभागपत्रांच्या विवेचनात त्यांच्यावर ऑक्टोबर 2007 मध्ये घातलेल्या बंधनांचे विवेचन महत्त्वाचे ठरावे.

भारताच्या नवीन आर्थिक धोरणांच्या संदर्भात खाजगीकरण व निर्गुंतवणूक, उदारीकरण व जागतिकीकरण यांची चर्चा केलेली आहे. यातून या संकल्पनांचा अर्थ आणि धोरणाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व समजू शकेल.

केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यातील संबंधाच्या संदर्भात वित्त आयोगाची चर्चा केली आहे.केंद्र व राज्ये यांतील विविध पक्षांची किंवा आघाड्यांची सरकारे, राज्यांच्या हितसंबंधातील संघर्ष, राज्यांकडे निधींचे हस्तांतरण करण्यातील वाद,राजकोषीय अनुशासनाचे तत्त्व यासंबंधी असलेले वाद समजण्यासाठी वित्त आयोगासंबंधी विवेचन उपयक्त ठरेल. येथे नियोजन मंडळ, वित्त आयोग आणि त्याव्यतिरिक्त केंद्र सरकारकडून राज्यांकडे होणारे निधींचे हस्तांतरण आणि या बहुविध प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या समस्या यांचा उल्लेख केला असता तर विवेचनाची उपयुक्तता वाढली असती.

मौद्रिक व पतधोरण हा विषय मोठा असल्याने त्याचे विवेचन इतर संकल्पनांच्या विवेचनापेक्षा जास्त विस्तृत झाले आहे. याऐवजी मौद्रिक धोरण (पैशाच्या पुरवठ्याचे नियंत्रण) याचे वेगळे विवेचन करून पतनियंत्रण–संख्यात्मक आणि पतनियंत्रण–गुणात्मक अशा तीन भागात हे विवेचन वाटता आले असते. वैधानिक रोखता गुणोत्तर (स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो) याचे विवेचन स्वतंत्रपणे करता आले असते. हे गुणोत्तर प्रत्यक्ष पतनियंत्रणाचे आयुध नसून खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील बँक निधींच्या वाटपाचे साधन म्हणून वापरले गेले. मुळात बँकांची सुरक्षितता हा उद्देश होता. पतनियंत्रणाचे भारतात बऱ्याच काळ वापरले गेलेले आयुध–निवडक पतनियंत्रण (सिलेक्टिव्ह क्रेडिट कंट्रोल) याचे विवेचन समाविष्ट करता आले असते.

वित्तीय क्षेत्रासंबंधी आधारभूत प्रमुख व्याजदर,रेपो व रिव्हर्स रेपो,पतमापन,बिगर बँकिंग वित्तसंस्था व भारतातील बँकिंग संरचना अशा पाच संकल्पना समाविष्ट केल्या आहेत.त्यापैकी शेवटची संकल्पना पुस्तकातील पध्दतीपेक्षा वेगळ्या पध्दतीने

मांडलेली आहे. इतर संकल्पनांसाठी पार्श्वभूमी या दृष्टीने या मांडणीकडे बघितल्यास ते योग्य ठरेल. नवीन धोरणात बाजारयंत्रणेला महत्त्व असल्याने बँकांना व्याजदर ठरविण्यात मिळालेले स्वातंत्र्य प्रमुख कर्जव्याजदर आणि त्यांना मार्गदर्शक असे रेपो (फेर खरेदी पर्याय) व रिव्हर्स रेपो(फेरविक्री पर्याय) यांचे व्याजदर यांना महत्त्व आहे. कर्जाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच बाजारात बचत गुंतवणाऱ्या व्यक्तींसाठी पतमापन ही संकल्पना उपयुक्त आहे. बिगर बँकिंग वित्तीय संस्था विविध प्रकारची कर्जे घेणाऱ्या व्यक्तींसाठी महत्त्वाच्या ठरत आहेत. त्यांची माहिती कर्जे घेणाऱ्यांसाठी उपयोगी आहे.

सार्वजनिक अर्थकारणाशी संबंधित अर्थसंकल्प, अर्थसंकल्पातील तूट,आर्थिक सर्वेक्षण आणि अर्थसाह्य अशा चार संकल्पनांचे विवेचन पुस्तकात आले आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे या भागात डॉ.गोविलकर यांचे प्रभुत्त्व असल्याने हे विवेचन सर्वसामान्य वाचकांसाठी उपयुक्त आणि माहितीपूर्ण ठरेल. अर्थशास्त्राबद्दल लिहितांना गरिबांच्या वापरात नसलेल्या वस्तूंवर अर्थसाह्य दिले जाते. या संदर्भात डिझेल व स्वयंपाकाचा गॅस यांचा उल्लेख आला आहे. डिझेलचा वापर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत होतो व त्यावर अर्थसाह्य शेवटी सर्वसामान्य माणसालाच लाभ देते. गॅसला पर्याय केरोसीन असल्याने प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने गॅसच्या वापराला उत्तेजन देणे योग्य ठरते.

गेल्या पंचवीस वर्षात रोखे बाजारातील व्यवहारात मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गीय बचतदार रस घेत आहेत. त्यांच्यासाठी रोखेबाजारातील सहभागांच्या किंमतीचे संवेदनशील निर्देशांक (सेन्सेक्स) व इतर निर्देशांक यासंबंधी विवेचन माहितीपूर्ण ठरेल.

सध्या चर्चेत असलेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालाच्या संदर्भात वेतन आयोगासंबंधी विवेचन सोपे व सर्वंकष ठरेल.

पुस्तकाच्या शेवटी विशेष आर्थिक क्षेत्र या संकल्पनेचे स्पष्टीकरण आलेले आहे. पश्चिम बंगाल व महाराष्ट्र या राज्यात या संकल्पनेला झालेल्या विरोधाच्या संदर्भात हे स्पष्टीकरण या क्षेत्रासंबंधी सरकारी धोरणांची योग्यायोग्यता ठरविण्याबद्दल विचार करण्यात सर्वसामान्य जनतेसाठी उपयुक्त ठरू शकते.

संकल्पनांची निवड करतांना अर्थशास्त्रासंबंधी विविध नियतकालिकांत प्रसिध्द होणारे चालू घडामोडींवरील लिखाण वाचणारा पण अर्थशास्त्राचा विशेष अभ्यास न केलेला वाचक डोळ्यासमोर ठेवल्याने सैध्दान्तिक संकल्पना या पुस्तकात सापडणार नाहीत. तरीही अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासासाठी पूरक वाचन म्हणून हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल.पुस्तकाचा आकार आटोपशीर ठेवण्यासाठी मोजक्याच संकल्पना निवडल्या आहेत. अशाच आणखी काही संकल्पना निवडून नवीन पुस्तक लिहिले जाईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

***

ति वेतन
ठरेल.
र्थिक क्षेत्र
े. पश्चिम
कल्पनेला
ीकरण या
ायोग्यता
र्वसामान्य

करतांना
त प्रसिध्द
वणारा पण
ना वाचक
ल्पना या
र्थशास्त्राचा
त्यांच्या
क उपयुक्त
टोपशीर
या आहेत.
डून नवीन
ास हरकत


# नेविल वाडिया व्यवस्थापन अभ्यास आणि संशोधन संस्था

१९ कै. वि. के. जोग पथ, पुणे - ४११००१

वेबसाईट :- www.nevillewadia.com

इ-मेल :- director@nevillewadia.com

फोन : (०२०) २६१६३२७५, २६१६०७८८ फॅक्स : (०२०) २६१६३२७५

मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, पुणे (स्थापना : १९३२) या संस्थेतर्फे नेविल वाडिया व्यवस्थापन संस्था (स्थापना : १९९१) चालविली जाते. या व्यवस्थापन संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्था AICTE नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण विभाग मुंबई व पुणे विद्यापीठ यांची मान्यता आहे. एम.बी.ए., एम्.सी.एम्., एम्.पी.एम्., एम्.एम्.एम्., पी.जी.डी.एम्.एम्., पी.जी.डी.सी.एम्., पी.जी.डी.बी.एम्. व एम्.बी.एस्. अशा पदव्यांसाठी पदव्युत्तर अध्यापन करणारी ही एक अग्रगण्य संस्था आहे. तसेच एम्.फिल. आणि पीएच्.डी पदव्यांसाठी संशोधन करण्याचीही येथे सोय आहे. सध्या या संस्थेत सुमारे नऊशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**कठोर परिश्रम, उच्च दर्जाची गुणवत्ता, सामाजिक मूल्यांची जाण आणि गतिमान नेतृत्वगुण याद्वारे उद्यमशील व्यवस्था घडवणे हे संस्थेचे ध्येय !**

- अनुभवी प्राध्यापक वर्ग आणि प्रदीर्घ औद्योगिक अनुभव असणारे अभ्यागत प्राध्यापक
- सुमारे १०,००० पुस्तके, ७५ नियतकालिके, सीडी-डीव्हीडी यांनी सुसज्ज ग्रंथालय
- आधुनिक कॉम्प्युटर प्रयोगशाळा - सर्व अद्ययावत सॉफ्टवेअर्स
- माजी विद्यार्थ्यांशी सतत संपर्क आणि त्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
- प्लेसमेंटचे प्रमाण १०० %
- गेली चार वर्षे सतत A+ असे दर्जांकन

विद्यापीठीय अभ्यासक्रमाबरोबर सॉफ्टवेअर टेस्टिंग, केस स्टडीज, कम्युनिकेशन स्किल्स, इंटरव्ह्यू टेक्निक, फ्रेंच -जर्मन -जपानी भाषांच्या अतिरिक्त अध्यापनाची सोय. दरवर्षी सर्वोत्तम व्यवस्थापन विद्यार्थी आणि व्यवस्थापन विद्यार्थिनी यांची निवड करून त्यांना खास पुरस्कार दिले जातात. विद्यार्थ्यांची मानसिक आणि बौद्धिक क्षमता वाढावी म्हणून त्यांना समुपदेशन केले जाते, मार्गदर्शन दिले जाते. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा उपक्रम, क्रीडासामने यात भाग घ्यावा यासाठी उत्तेजन दिले जाते. या संस्थेतील विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सतत झळकत असतात. होतकरू विद्यार्थ्यांना शुल्कात सवलती व शिष्यवृत्या दिल्या जातात.

**डॉ. संतोष दास्ताने**

संचालक

फोन (०२०) २६१६९९४९ (कार्यालय)

इ-मेल - santosh_dastane@vsnl.net

Registration No. 31918 / 77


हिरक महोत्सवी बँक

॥ सहकाराच्या दिपज्योती
रयत सेवकांचे जीवन उजळती ॥
पगारदार नोकरांच्या सहकारी बँकामधील अग्रेसर बँक
रयत सेवकांच्या अडचणीचे वेळी सहकार्याचा हात सदैव पुढे करणारी त्यांचे
आशास्थान असणारी जिव्हाळ्याची बँक

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि.,सातारा.

मुख्य कार्यालय : ४५५/२/२० फ, पेठ सदरबझार, सातारा-४१५ ००१
फोन : २३०६३१, २३१३१३ फॅक्स (०२१६२) २३१३१३

स्थापना : १६/८/१९४०. स्थापनेपासून ऑडिट वर्ग 'अ' (सन २००६-०७ साठी ऑडिट वर्ग 'ब')
संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

## बँकेची ठळक वैशिष्ट्ये

१. ठेवीचा विमा असल्याने ठेवींची सुरक्षितता
२. सभासदांना सत्वर कर्ज पुरवठा
३. विशेष घरबांधणी कर्ज व वाहन तारण कर्ज योजना.
४. सोने तारण कर्ज योजना
५. जा. कर्ज नं.३(फेस्टिवल लोन) कर्ज योजना.
६. शैक्षणिक कर्ज योजना.
७. वाहनतारण कर्ज योजना.
८. घरतारण कर्ज योजना.
९. ज्येष्ठ नागरिकांसाठी मुदत ठेवीवर १/२ टक्का जादा व्याजदर

## बँकेच्या आकर्षक ठेव योजना

१. रयत बचत ठेव योजना
२. शुभमंगल ठेव योजना.
३. पेन्शन ठेव योजना.
४. मुदत ठेव चक्रवाढ व्याज ठेव योजना.
५. कर्मवीर कॅश सर्टिफिकेट ठेव योजना.
६. मयत सभासदांच्या वारसास रू. दोन लाख मदत.

## शाखा विस्तार

औंधगाव-पुणे, अहमदनगर, सांगली, पंढरपूर, कोपरगांव, बारामती, विटा, वाशी-मुंबई, दहिवडी, सदर बझार-सातारा, कर्मवीर समाधी परिसर-सातारा, छ. शिवाजी कॉलेज परिसर-सातारा, मंचर, श्रीरामपूर, कराड, कोल्हापूर, कर्जत, आडगांव-नाशिक, हडपसर, लोणंद.

## संचालक मंडळ

**शंकरराव चौगुले**
सरव्यवस्थापक

**श्री. आप्पासाहेब पाटील**
चेअरमन

| | |
|---|---|
| श्री. तुकाराम शिंगाडे | व्हा. चेअरमन |
| श्री. राजाराम मगदूम | संचालक |
| श्री. अंबादास शेलार | संचालक |
| श्री. अजितकुमार हेरवाडे | संचालक |
| श्री. सुरेश बोळीज | संचालक |
| श्री. प्रल्हाद पवार | संचालक |
| श्री. शिवाजी ढाळे | संचालक |
| श्री. चंद्रकांत जाधव | संचालक |
| डॉ.सौ. शारदा गंधे | संचालिका |
| श्री. मधुकर जाधव | सेवक प्रतिनिधी |
| श्री. जनार्दन जाधव | एक्स ऑफिसिओ |
| श्री. नुरा शेख | संचालक |
| श्री. गणपत तावरे | संचालक |
| सौ. अनिता निबे | संचालिका |
| श्री. संभाजी चौगुले | संचालक |
| श्री. नानासाहेब देवकर | संचालक |
| श्री. बाळू खानदेशे | संचालक |
| श्री. तात्याराम धायतोंडे | संचालक |
| श्री. राजेंद्र साबळे | सेवक प्रतिनिधी |